53

**लो. टिळक ग्रंथसंग्रहालय**
वाई (जि. सातारा)

क्रमांक ८ना८। 780
ग्रंथाचे नाव रागविलास
लेखकाचे नाव माळवे
विषय कला संगीत (४८)

# अर्पणपत्रिका.

हें पुस्तक

किर्लोसकर संगीत मंडळीचें जीवन

महाराष्ट्राचें भूषण

व

भरतखंडांतील एक अद्वितीय रत्न

कै. रा. रा.

**लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर**

यांस

त्यांच्या अप्रतिम गुणांवर लुब्ध होऊन

अर्पण केलें असे.

माळवे.

# प्रस्तावना.

॥ सुखिनि सुखनिधानं दुःखितानां विनोदः ॥
॥ सदयहृदयहारी मन्मथस्याग्रदूतः ॥
॥ अतिचतुरसुगम्यो वल्लभः कामिनीनां ॥
॥ जयति जगति नादः पंचमश्चोपवेदः ॥

**संगीत** ही एक सुंदर व मनमोहक कला आहे. तिच्या अंगीं जी एक अप्रतिम व मनोवेधक अशी नैसर्गिक शक्ति आहे ती किती आल्हादजनक आहे याची कल्पना अनुभवावांचून होणें नाहीं. ज्याला जगांतील कोणत्याही गोष्टींचें ज्ञान नाहीं, असें जें केवळ अज्ञान बालक तेंही रडत असलें तरी गायन ऐकून हर्षित होतें. तसेंच तृणभक्षक पशुसुद्धां गानलुब्ध होऊन कधीं कधीं प्राणासही मुकतात. येवढेंच नव्हे पण सर्पासारखे दुष्ट व विषारी प्राणीसुद्धां मधुर ध्वनी ऐकून तटस्थ होतात हें सर्व श्रुतच आहे. त्याचप्रमाणें कित्येक पक्षीसुद्धां फार गानलुब्ध असतात. **सर उइलियम् जोन्स** यास त्याच्या एका विद्वान मित्रानें पुढील हकिकत सांगितली होती, तीं अशी–"प्रसिद्ध बीनकार **मिरझा महंमद** एके वेळीं शिराजजवळील एका उपवनामध्यें आपल्या मित्रांच्या रंजनार्थ वीन वाजवीत असतां जवळच्या एका झाडावर 'बुल्बुल्' नांवाचे पक्षी पुष्कळ जमा झाले व मुखांतून मधुर ध्वनी काढून त्या गवय्याची साथ करण्याचा प्रयत्न करीत आहेत असें दिसलें. ते एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर फडफडत जात व जेथून मधुर ध्वनी निघत होता त्या वाद्याजवळ जाण्याचा प्रयत्न करीत व त्या सभोंवती घिरट्या घालीत व शेवटीं अगदीं मोहित

---

१ "Music hath charms to soothe the savage breast,
"To soften rocks or bend a knotted oak,
"I have read the things inanimate have moved,
"And as with living souls, have been informed,
"By magic numbers and persuasive sound".—*Congreve*.

२ ॥ दोलायां शायितो बालो रुदन्नास्ते यदा क्वचित् ॥
॥ तदा गीतामृतं पीत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥
॥ मृगः सोऽपि तृणाहारो विचरन्नटवी सदा ॥
॥ लुब्धकादपि संगीतं श्रुत्वा प्राणान्प्रयच्छति ॥
॥ क्रुद्धो विषं वमन्सर्पः फणामान्दोलयन्मुहुः ॥
॥ गानं जांगलिकाच्छ्रुत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥ सं. पारिजात

होऊन जमिनीवर पडत, पण वाद्याचा स्वर बदलला कीं पुनः उडून जात." तसेंच "**सुराजउद्दवला** हा नेहमीं आपल्या गवय्यांना घेऊन अरण्यांत जात असे व तेथें गायन करवीत असे. त्या ठिकाणीं दोन हरिण येऊन मोठ्या आनंदानें गायन ऐकत असत. एके वेळीं ते हरिण गायन ऐकण्यांत तल्लीन झाले आहेत असें पाहून त्या दुष्टानें एका हरिणास तीरानें ठार मारलें."

गायन हें जसें मनोरंजक तसेंच फार उपयोगीही आहे. शरीरसौख्यासाठीं गायनानें आत्म्यास नेहमीं संतुष्ट ठेवावें अशी **मिल्टन्** व **जोन्स** यांनीं शिफारस केली आहे. ज्ञानतंतु क्षुब्ध झाल्यामुळें होणाऱ्या यातना व तज्जन्य रोग बरे करण्याकडे हल्लीं युरोपखंडांत कित्येक डॉक्टरलोक गायनाचा उपयोग करीत असतात.

दुसरें, ईश्वराची आराधना करण्यास गायन हें एक उत्तम साधन आहे. व आपले लोक याच साधनाचा फार प्रेमळपणानें उपयोग करून ईश्वराची भक्ति करीत आले आहेत. पूर्वीं **ग्रीक** व **रोमन** लोकही ईश्वरभजनाकडे गायनाचा उपयोग करीत असत. श्रीविष्णूनीं नारदासही असेंच उत्तर दिलें आहे कीं—

**॥ नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये न च ॥**
**॥ मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥**

'ज्याचें मन गायनाच्या योगानें द्रवत नाहीं त्याच्यापेक्षां क्रूर जगांत दुसरें कोणीच नाहीं' असें जें म्हटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं. अशा मनुष्याची मनुष्यकोटींतील अगदीं शेवटल्या वर्गांतच गणना केली पाहिजे. असो.

अशा या **संगीतशास्त्रा**चीं मूलतत्वें काय आहेत हें जाणण्याविषयीं इच्छा उत्पन्न झाल्यामुळें या विषयाचें ज्ञान करून देणारे ग्रंथ मराठी भाषेंत मिळाल्यास पहावे म्हणून तपास केला पण त्यांत निराशाच झाली. नंतर या विषयावरील इतर भाषेंतील कांहीं ग्रंथ मागविले व त्या सर्वांचें थोडक्यांत सार काढून एक निराळेंच टिपण तयार केलें. या माझ्या श्रमाचा लाभ माझ्यासारखे जे इतर जिज्ञासु असतील त्यांनाही करून द्यावा या हेतूनें ती सर्व माहिती या पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली आहे. हें पुस्तक सन १८९२ सालीं तयार केलें. पण तें कांहीं कारणांमुळें अद्याप प्रसिद्ध करितां आलें नाहीं. तारीख १४ मार्च १८९३ रोजीं मी हें पुस्तक बडोद्याचे दरबारगवई प. प्रोफेसर

---

१ ॥ साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः ॥

२ १९०२ च्या ऑगस्ट महिन्यांत बडोद्याच्या ग्रंथप्रसारक मंडळीनें हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें रा. रा. **दामोदर सावळाराम यंदे** यांचें मार्फत कबूल केलें व त्या प्रमाणें मी हें पुस्तक त्यांच्या स्वाधीन केलें. पण पुढें त्यांनीं तें दोन वर्षें ठेवून घेऊन न छापतां तसेंच परत केलें. असें करण्यांत त्यांचा हेतू काय होता हें ईश्वरालाच ठाऊक! हा प्रकार त्यांच्या दृष्टीनें कदाचित् योग्य असेल परंतु दुसऱ्यास मात्र नुकसानकारक आहे.

**मौलाबक्ष** यांना दाखविलें होतें तेव्हां ते म्हणाले 'ही सर्व माहिती बरोबर आहे व तिचा विद्यार्थ्यांना तसाच गवय्यांनाही फार उपयोग होईल.' त्यानंतर यांत पुष्कळ सुधारणा केली आहे. या अवधींत प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखित प्रत पुष्कळांच्या नजरे-खालून गेली आहे.

आपलें संगीत कित्येक बाबतींत पाश्चिमात्य लोकांच्या संगीतापेक्षां श्रेष्ठ व विशेष खुबीदार आहे पण त्यांत एक मोठी उणीव आहे ती **रागलेखन** अथवा ज्याला इंग्रजींत **नोटेशन** म्हणतात ती होय. युरोपियन लोकांचें गायन साधें असल्यामुळें त्याचें लेखन सहज होऊं शकतें व त्या वरून कोणीही तो राग हुबेहूब लेखनाप्रमाणें गाऊं शकतो. आपल्या देशांत जे नामांकित गवई होऊन गेले व हल्लीं आहेत त्यांचें गायन जर हुबेहूब लिहून ठेवितां येतें तर फार उत्तम झालें असतें. पण रागलेखनपद्धतीच्या अभावामुळें कसाही उत्तम गवई असो त्याच्या मृत्युनंतर आपला व त्याच्या गायनजन्य आनंदाचा कायमचा वियोग होतो. साध्या गाण्याचें लेखन करतां येईल पण तान, पलटा, आलाप गमक, खटका, पुकार इत्यादिकांच्या योगानें जें सुंदर काम करण्यांत येतें त्याचें संपूर्ण लेखन फारच अवघड होणार आहे. मला वाटतें एखाद्या उत्तम गवय्याच्या दोन तीन चीजांचें जर लेखन करतां आलेंच तर त्याचें एक लहानसें पुस्तक होईल. बडोद्याचे प. प्रो. **मौलाबक्ष** यांनीं रागलेखन करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. परंतु त्याहीपेक्षां हिंदुस्थानाच्या सर्व भागांतील गवय्यांना मान्य होईल अशी एखादी रागलेखनपद्धत सर्वानुमतें तयार करण्याचा प्रयत्न झाल्यास उत्तम होईल. हा विषय आपल्या विद्वान् लोकांनीं हातीं घेतल्याशिवाय या कलेस ऊर्जित दशा येणार नाहीं. मधून मधून कांहीं प्रयत्न होतात पण ते नेटानें व आस्थापूर्वक होत नसल्यामुळें त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. एक विद्वान गृहस्थ आपल्यामध्यें 'तालाची खटपट फार आहे' म्हणून नाखूष होतात, व इंग्लिश 'बँड' ऐकतांना आपलें पाऊल व हातांतील छडी त्याच्या ठेक्यावर आपोआप पडूं लागली म्हणून त्याची फार तारीफ करतात. परंतु असें म्हणणें म्हणजे एखाद्या तात्या पंतोजीनें **एम्. ए.** चे विषय फार कठीण आहेत म्हणून त्या परीक्षेचा तिरस्कार करण्यासारखेंच आहे. हातपाय आपोआप उडूं लागणें यांतच जर सर्व खुबी असेल तर तेंच काम बँडपेक्षां 'ढोलकी–तुणतुणें' कांहीं कमी करील असें नाहीं. हे विचार निराशा व खेद उत्पन्न करणारे आहेत. या कलेचा अभ्यास करणें कोणत्याही प्रकारें गैर नाहीं हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. पूर्वी राजेलोकसुद्धां आपल्या मुलांमुलींस ही कला

---

१ गेल्या वर्षी माझे मित्र रा. रा. **शिवराम सदाशिव मनोहर** ( मौलाबक्ष स्कूलचे माजी प्रिन्सिपाल ) यांनींही हें पुस्तक समग्र वाचून पाहिलें व यांतील विषयांची जुळणी व योजना त्यांना पसंत व अनुकरणीय वाटली.

शिकवीत असत. अर्जुनानें अज्ञातवासांत असतां विराटाच्या मुलीला नृत्यगायन शिकविल्याचें प्रसिद्धच आहे. हल्लीं या कलेस राजाश्रय मुळींच नाहीं; तेव्हां विद्वान लोकांशिवाय तिचें पुनरुज्जीवन होणें कठीण आहे. कारण हल्लीं ही कला बहुतेकअंशीं तिजवरच उपजीविका करणाऱ्या कांहीं विशिष्ठ वर्गाच्या हलक्या लोकांच्या हातीं असल्यामुळें तिची वाढ खुंटली आहे. या कलेस आपल्या महाराष्ट्रापेक्षां उत्तरेकडे विशेष उत्तेजन मिळत आलें आहे. पण गुजरातेंत मात्र विपरीत प्रकार सुरू आहे. या लोकांत नाटकें अलिकडेच होऊं लागलीं आहेत व त्यांनां गायनाची गोडीही अलिकडेच विशेष लागूं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचीं बहुतेक नाटकें 'नखशिखांत' संगीत (?) असतात. तें नाटक म्हणजे रागांचे खून, तालाची त्रेधा व अभिनयाचा फजिता यांची रणभूमीच आहे म्हटल्यास हरकत नाहीं. त्यांतील संगीत म्हणजे बहुतेक उर्दु व इंग्रजी गाणें व हलकट लोकांची 'छक्कड' यांचें मिश्रण होय. या गोष्टीचा येथें उल्लेख करण्याचें कारण येवढेंच कीं या 'पोरक्या' सोंगाची नक्कल महाराष्ट्रांतील नाटककारही करूं लागले आहेत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. कारण संगीतनाटकमंडळ्या बहुतेकअंशीं या बाबतींत लोकांच्या अभिरुचीला वळण देणाऱ्या आहेत. सबब त्यांनीं या कलेचें नैसर्गिक सौंदर्य अशा प्रकारें नष्ट करूं नये. येथें दुसऱ्या एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें अवश्य आहे. आपल्या गवय्यांना लोकांपुढें गात असतां 'सारिगम' व 'तिल्लाना' गाण्याची फारच हौस असते. पण हे प्रकार म्हणजे ताल-सुराची माहिती करून घेण्यासाठीं करावी लागणारी एक प्रकारची तालीम होय. लोकांपुढें तिचें प्रदर्शन करणें निरर्थक व अस्थानीं आहे, व त्याचप्रमाणें तबला-तंबोरा लावण्यांत मंडळीला तासतास तिष्ठत बसविणें हे प्रकार लोकांना फार कंटाळवाणे वाटतात. तसेंच कित्येक गवय्यांना गातेवेळीं अनेक प्रकारचा विलक्षण अंगविक्षेप व हातवारे करण्याची फार संवय असते. हा अभिनयाचा भयंकर अतिरेक होय. याच्या योगानें उलट गायनाचा विरस होतो.[२] गवय्यांनीं गाणारांचे गुणदोष लक्षांत असूं देणें बरें.

---

१ हा प्रकार त्यांच्यामध्यें जे थोडे जुने गवई आहेत त्यांना मुळींच पसंत नाहीं. **रास्तगोफ्तार** नांवाच्या गुजराती पत्राचे एडिटर प. मि. **काब्राजी** (जे या कलेचे मर्मज्ञ होते) त्यांनीं वारंवार आपल्या पत्रांत यावर फारच मार्मिक व कडक टीका केली आहे पण तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

२ ही झाली गाणाराची गोष्ट; पण ऐकणारांमध्यें सुद्धां एखादेवेळीं मोठा रसिक (?) मनुष्य दृष्टीस पडतो. त्याला 'वाहवा'चें फोनोग्राफ म्हणण्यास हरकत नाहीं. गवई गाऊं लागल्यापासून याचें अभिनययुक्त वाहवा सुरू होतें, तें त्याच्या प्रत्येक शब्दावरच नव्हे पण त्याच्या प्रत्येक हालचालीवरसुद्धां याचें 'वाहवा' आहेच. असें करून आपली मर्मज्ञता (?) प्रगट करण्याचा प्रयत्न करणें फार त्रासदायक होतें.

**गाणाराचे गुण—**

॥ सुस्वरं सुरसं चैव सुरागमधुराक्षरं ॥ सालंकारं प्रमाणंच षड्विधं गीतलक्षणं ॥
॥ स्वरेण पदसंयुक्तं छंदसाच सुसंयुतं ॥ सुपात्रंच सुतालंच सुगीतं तेन गण्यते ॥

**गाणाराचे दोष—**

॥ कंपितं भीतमुद्घष्टमव्यक्तमनुनासिकं ॥ काकस्वरं शिरस्थं च तथा स्थानविवर्जितं ॥
॥ विस्वरं विरसं चैव विश्लिष्टं विषमाहते ॥ व्याकुलं तालहीनं च गातुर्दोषाश्चर्तुदश ॥

प्रत्येक कला संपादन करण्याचे दोन मार्ग असतात. एक त्या विषयाचें शास्त्रीय ज्ञान, व दुसरें त्याचें व्यावहारिक ज्ञान अथवा प्रत्यक्ष अनुभव. यांस अनुक्रमें **विद्या** व **कला** म्हणतात, त्याप्रमाणें संगीताचेही दोन मार्ग आहेत. राग, ताल, स्वर, नायिका, रस व समय इत्यादिकांच्या नियमानुसार एखादी चीज तयार करणें ही **संगीतविद्या** आणि त्याबरहुकूम गाणें, वाजविणें व नृत्य करणें ही **संगीतकला** होय. **संगीताची** व्याख्या अशी आहे—

**॥ गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते ॥**

म्हणजे गाणें, वाजविणें व नाचणें या सर्वांस **संगीत** म्हणतात. कारण गायनाच्या योगानें **राग**, वाद्याच्या योगानें **ताल,** व नृत्याच्या योगानें **भाव** यांचें स्वरूप प्रगट होतें. प्रस्तुत पुस्तकांत त्यापैकीं फक्त **गीतं** म्हणजे **गाणें** अर्थात् **राग** याचाच विचार केला आहे. मी स्वतः कांहीं संगीतशास्त्रवेत्ता किंवा मोठा गवई नाहीं व तसें म्हणवून घेण्याची माझी तिलप्राय योग्यता किंवा इच्छाही नाहीं. तेव्हां हें पुस्तक त्या उद्देशानें मुळींच प्रसिद्ध केलें नसून तें केवळ **एका संगीतशास्त्राच्या विद्यार्थ्यानें अनेक ग्रंथांवरून परिश्रमानें मिळविलेली माहिती त्याच्याचसारख्या इतर विद्यार्थ्यांकरितां** म्हणूनच प्रसिद्ध केलें आहे, मला जेवढी माहिती मिळाली ती सर्व यथामति जुळवून प्रसिद्ध केली आहे. ती अव्यवस्थित असण्याचा संभव आहे, व त्यांत चुकाही असतील, तसेंच कित्येक बाबतींत मतभेदही असूं शकेल, पण त्या सर्वांबद्दल क्षमा करून ज्यांना जो भाग उपयुक्त दिसेल तो त्यांनीं घ्यावा अशी विनंति आहे.

---

१ संगीतरत्नाकर.

२ असें आहे तरी या पुस्तकाची हाकीकत ऐकतांच येथील एका गुणज्ञ म्हणविणाऱ्या भल्या गृहस्थानें आपल्या जिवाचा फार संताप करून घेतला. त्याचा सारांशः—'माझ्या हातून होत नाहीं तें काम दुसऱ्यांनीं काय म्हणून करावें?' याच गृहस्थानें येथील एका संगीत शाळेच्या 'चालत्या गाड्यास खीळ' घालण्याचा प्रयत्न केला होता पण त्यांत त्याला यश आलें नाहीं, असा विघ्न संतोषीपणा फार घातुक आहे.

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें या पुस्तकाचे तीन भाग न करतां थोडा फेरफार करून त्याचीं **पांच प्रकरणें** केलीं आहेत. पहिल्या प्रकरणांत **संगीताचा संक्षिप्त इतिहास**, दुसऱ्यांत **स्वरविचार**, तिसऱ्यांत **रागविचार**, चवथ्यांत **साहित्यविचार**, व पांचव्यांत **विविध विषयां**चा समावेश केला आहे. तसेंच ५०० ग्राहक आगाऊ मिळाल्यास त्यांचीं नांवें पुस्तकांत देण्याविषयीं पूर्वी जाहीर केलें होतें पण फारच थोडीं नांवें आल्यामुळें तसें करतां आलें नाहीं.

प्रस्तुत पुस्तकाचीं प्रुफें तपासण्यांत माझे मित्र रा. रा. **कृष्णराव वासुदेव कबीर** यांनीं जी मला मदत केली तिजबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

शेवटीं ज्या माझ्यासारख्या जिज्ञासु लोकांसाठीं मीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांनां याचा थोडाबहुत तरी उपयोग झाल्यास परमेश्वरकृपेनें माझ्या श्रमाचें चीज झालें असें मी समजेन.

मुंबई,<br>
सोमवार श्रावण वद्य १३ शके १८२७.<br>
तारीख २८ ऑगस्ट सन १९०५.

अनंत संतराम माळवे.

प्रस्तुत पुस्तकास पुढील ग्रंथांचा आधार घेतला आहे:—


१ एसियाटिक् रिसर्चिस्—सर उइलियम् जोन्स.

२ हिंदु म्यूझिक्—रा. रा. सहस्रबुद्धे.

३ बंसीरागमाला—कवि लोकनाथ पंडित.

४ संगीतादित्य— प्रो. आदितरामजी.

५ संगीतानुभव—प्रो. मौलाबक्ष.

६ नादलहरी—रा. रा. गणपतराव बर्वे.

७ रागस्तान.

८ चयमन्-ए—बेनज़ीर.

९ गुन्चय्-ए—राग.

१० गायनदर्पण—रा. रा. नरहरराम मुन्शी.

११ सकलशास्त्रनिरूपण—कवि दलपतराम.

१२ रसप्रबोध—रा. रा. माकोडे.

ॐ

॥ श्रीगणेशायनमः ॥

# रागविलास.

## प्रकरण पहिलें.

### संगीतशास्त्राचा संक्षिप्त इतिहास.

प्राचीनकाळीं या भरतखंडांतील ऋषींना संगीतशास्त्राची चांगली माहिती होती, हें त्या वेळच्या हल्लीं उपलब्ध असलेल्या ग्रंथांवरून दिसून येतें. वेदोच्चारसुद्धां गायनाच्या नियमांप्रमाणें करण्यांत येत असे. सामवेद हा गायनमय आहे. त्यांत संगीताची हकिकत दिली आहे. त्याला **गंधर्ववेद** अथवा **नादवेद** म्हणतात. हा ब्रह्मदेवापासून सरस्वतीस, तिच्यापासून नारदास व नारदापासून भरतास प्राप्त झाला व त्यानें याचा सर्वत्र प्रसार केला. पूर्वीं गाण्याचे तीन प्रकार होते. अर्चिक, गाथिक, व सामिक. **अर्चिक** हा एक स्वर घेऊन गाण्याचा प्रकार. **गाथिक** दोन स्वरांनीं व **सामिक** तीन स्वरांनीं गाण्याचा प्रकार होय. पुढें **स्वरांतर** म्हणून चार स्वरांनीं गाण्याची व त्यानंतर **सामगान** म्हणून ( सा-री-ग-ध-नी ह्या ) पांच स्वरांनीं गाण्याची पद्धत निघाली व शेवटीं सप्त स्वरांची योजना करण्यांत आली, आणि उदात्त, अनुदात्त व स्वरित या तीन प्रकारच्या स्वरांत एकंदर स्वरांचा समावेश करण्यांत आला. निषाद व गांधार हे **उदात्त** स्वर, ऋषभ व धैवत हे **अनुदात्त** आणि षड्ज, मध्यम व पंचम हे **स्वरित** स्वर होत असें **पाणिनी** यानें आपल्या व्याकरणसूत्रांत म्हटलें आहे. प्रथम षड्ज, मग पंचम व त्यानंतर ( दुसऱ्या षड्ज स्वराची योजना करून ) बाकीचे पांच स्वर कायम करण्यांत आले. या गंधर्व वेदाचे सामवेदांत चार प्रकार सांगितले आहेत. **गेयगान, अरण्यगान, ऊहगान** व **उह्यगान**. गंधर्व वेदावर पुढें **शैलाली, भूषस्व, ईश्वर, पवन, कालीनाथ,** व **नारद** या ऋषींनीं ग्रंथ लिहिले. यांपैकीं पहिल्या दोन ऋषींच्या ग्रंथांवर **संकुक, भट्टलोलट, भट्टनायक, अभिनवगुप्ताचार्य** व **आनंदवर्धाचार्य** यांनीं भाष्यें लिहिलीं. याशिवाय **मतंग, कोहल, दंतिल, सोमेश्वर,** व **कीर्तिधर** यांनीं या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले.

तसेंच **सारजदेव** व **सारंगदेव** यांनींही कांहीं ग्रंथ लिहिले. या नंतर **स्वर-रागसुधारस, श्रुतिरंजनी, नारदीयरत्नाकर, सोमनाथाध्याय, स्वरमेल-कलानिधी, संकलितरत्नाकर,** व **रागमंजुषा** हे ग्रंथ झाले.

काश्मीरच्या सारंगदेवानें इसवीसनाच्या चवथ्या शतकांत **संगीतरत्नाकर** नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत त्यानें **शिव, गौरी, ब्रह्मा, माधव, नंदिकेश्वर, दंतिल, कोहल, रावण, हनुमान्, याज्ञवल्क्य, गणेश, नारद, तुंबर, हाहा, हूहू, षण्मुख, बृहस्पति, अर्जुन** व बाणासुराची कन्या **उषा** वगैरे मोठमोठ्या संगीत-शास्त्रवेत्त्यांचा उल्लेख केला आहे. संगीतरत्नाकरानंतर **रागविबोध**[१] नांवाचा एक उत्कृष्ट ग्रंथ तयार झाला. त्याचा कर्ता **सोम** होता. सोम हा एक विद्वान् कवी व उत्तम गवई होता. यानंतर सातव्या व आठव्या शतकांत संगीतावर बरींच भाष्यें झालीं. संस्कृतामध्यें जे ग्रंथ प्रसिद्ध झाले त्यांच्या नांवांची यादी या पुस्तकाच्या शेवटीं पांचव्या प्रकरणांत दिली आहे. पुढें दोन शतकांनंतर म्हणजे अकराव्या शतकाच्या आरंभीं इराणांत मुसलमान लोकांनीं पंडितांची मदत घेऊन संगीतशास्त्रावरील बऱ्याच संस्कृत ग्रंथांचें **फार्सी** भाषेंत भाषांतर केलें. **अजमशहाचे** वेळीं **मिरझाखान** यानें **रागार्णव, रागदर्पण** व **सभाविनोद** या ग्रंथांवरून फार्सीमध्यें **तोहफेतुल्-हिंद** नांवाचा ग्रंथ तयार केला. **बेजुबेगबावरा** यानें **संगीत दर्पणा**वरून **ओक्देगोषा** नांवाचा ग्रंथ लिहिला. तसेंच **शिराजचा** तत्ववेत्ता **महमूदबेने मशहूदबेने** यानें **दौरतोल्ताज** नामक ग्रंथ लिहिला. **आलीबेने महमद** यानेंही **निजामुद्दीनअल्लीशेर** बादशहाच्या आज्ञेवरून फार्सीमध्यें संगीतावर एक ग्रंथ लिहिला. या शिवाय संस्कृत ग्रंथांवरून **शमशुल्आश्वात्** व **तालीफेआलखान्** हे दोन ग्रंथ फार्सीमध्यें प्रसिद्ध झाले. याप्रमाणें संगीतशास्त्राचा भरतखंडांतून **इराणांत** प्रसार झाला. पुढें ही कला इराणांतून **अरबस्थानांत** व तेथून **युरोपखंडांत** प्रथम[२] दाखल झाली. इ. स. १४५० मध्यें **इंग्लंडांत** व सन १७०० मध्यें **फ्रान्समध्यें**

---

१ “ कर्नल ब्लेअर यानें एकदां वाण्याचे येथून कांहीं वस्तु मागविली होती. ती ज्या कागदांत बांधिली होती त्याकडे त्याचें सहज लक्ष गेलें तों तो कागद एका संस्कृत ग्रंथाचें पान आहे असें त्याला दिसून आलें. त्यावरून तो नेहमीं वाण्यांच्या दुकानीं जाऊन असे रद्दी (!) कागद खरीद करीत असे. त्यांतच त्याला **रागविबोध** हा ग्रंथ मिळाला !” **सर उ. जोन्स.**

२ “The Hindu Scale of Music and regular system of notation had been worked out before the age of “Pâṇini” (350 B. C.), and the seven notes were distinguished by their initial letters. This passed to Arabia through the Persians, and was thence introduced into Europe at the beginning of the eleventh century.”

—*Dr. Hunter's “Indian Empire.”*

प्रथमच संगीत सुरू झालें. ते वेळीं **डॉ. नॅथेनियल जाईल्स, टॉमस टॉम्किन्स, हेन्री पर्सेल,** व **पेलहॅम हंफ्रे** हे पहिले गवई होते. इंग्लंडांतील पहिल्या **जेम्स** राजाच्यावेळीं **ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी**मध्यें प्रथमच गायनविद्या दाखल करण्यांत आली; व पहिल्या **चार्लस** राजाच्यावेळीं **दरबारगवय्या**ची पदवी स्थापन करण्यांत आली. पुढें इंग्लंडांत लोकांना गाण्याची इतकी गोडी लागली कीं त्यांनीं जे अशक्त व वृद्ध गवई होते त्यांच्या पोषणार्थ १७३८ मध्यें एक फंड गोळा केला होता.

आपल्याइकडे सोळाव्या शतकापर्यंत या कलेंत कांहीं विशेष भर पडली नाहीं. परंतु **अकबराचे** वेळेपासून मात्र तिला बरेंच उत्तेजन मिळूं लागलें. त्याचे पदरीं अनेक गवई होते, त्यांत **तानसेन, सुरतसेन, रामदास, गोपालनायक, मदनराय लालादेवी, चांदखान, सुरजखान, तानतरंगखान, बेजुबेगबावरा, मिर्झा-आकेल** व **झुलिफकार फिरंगी** वगैरे फारच नामांकित होते. पूर्वी बौद्ध गवय्यांनीं तसेंच पुढें मुसलमानांनीं ही कला वाढविण्याचे बरेच प्रयत्न केले. त्यांनीं हिंदुलोकांच्या **धृपदा**[२]वरून **ख्याल** व **टप्पा** हे प्रकार काढिले. भरतखंडांत आल्यावर त्यांनीं येथील विद्या व कला यांचा शोध सुरू केला. त्यांत **संगीत**कला पाहून त्यांना फारच आनंद झाला, व त्या विद्येचा ते अभ्यास करूं लागले. परंतु **कुराणांत** गायनाचा निषेध केला आहे अशी त्यांच्या धर्मगुरूंनीं तक्रार केल्यामुळें त्यांनीं तो अभ्यास करण्याचें सोडून दिलें. परंतु त्यांना या कलेची फार गोडी लागली असल्यामुळें त्यांनीं गायन ऐकण्यासाठीं **नायकिर्णीं**ना आश्रय दिला व त्यांना जी प्रजा होई त्यांनासुद्धां संगीताचा अभ्यास करणें भाग पडूं लागलें. पण यामुळें ह्या लोकांचें त्यांच्या दरबारांत बरेंच वजन पडूं लागलें व त्याचा ते फायदाही घेऊं लागले. इतर लोक जे संगीताचा अभ्यास करीत त्यांना ते **कलावंत** म्हणत. हे लोक बहुतकरून कुलीन असत परंतु त्यांना नायकिर्णींना शिकविणें भाग पडूं लागलें, व कधीं कधीं तर त्यांना जबरदस्तीनें बाटवून मुसलमान करण्यांत येत असे. यामुळें चांगल्या लोकांनीं या कलेचा अभ्यास करणेंच सोडून दिलें. याचा परिणाम असा झाला कीं ही कला सर्वस्वी हलक्या लोकांच्या हातीं गेली, व पुढें तर ही कला शिकणें हें हलकेपणाचें काम आहे असें लोक समजूं लागले.

अशा वेळीं लोकांच्या मनांतील हा चुकीचा समज दूर करून या कलेचा उत्कर्ष करण्यासाठीं कोणी व कसे प्रयत्न केले याविषयीं **कवी रामेश्वर** आपल्या **गायन-**

---

१ "Theory of Indian Music" by Mr. S. E. Gopâlchârlu.

२ "*Dhrupad* is the highest form of our music; its voice is deep, its airs are grave, its singing is solemn and time slow and complex. It is not only difficult to sing but difficult to appreciate."

—*Hindu Music.*

**सागरा** मध्यें येणेंप्रमाणें लिहितात—"पुढें कित्येक वर्षांनीं **नृपचक्रचूडामणी श्रीमंत महाराजाधिराज शिवाजी छत्रपती** हे स्वप्रराक्रमानें साताऱ्याचे गादीवर आरूढ झाले तेव्हां त्यांनीं या कलेचा आर्य लोकांनीं कां निषेध केला याचा शोध करून प्राचीन ग्रंथांचें शोधन करविलें. तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं संगीत हा गंधर्व वेद आहे. त्याला उपवेदाची संज्ञा असून त्याचे आचार्य भरतमुनी होत, व ही कला शिकण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं. अशा प्रकारें खात्री झाल्यावर महाराजांनीं आर्य लोकांत या कलेचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं गायनशाळा स्थापन केल्या व आपल्या प्रजेस संगीत कला शिकविण्याची तजवीज केली व लोकांनींही यांत कांहींच निषिद्ध नाहीं असें पाहून तिचा अभ्यास करण्यास सुरवात केली." कवी रामेश्वर यांनीं दिलेल्या वरील हकिकतांविषयीं तपास होऊन कांहीं शोध लागल्यास उत्तम होईल. असो. पुढें इंग्रज लोक हिंदुस्थानांत आल्यावर त्यांना असें आढळून आलें कीं संगीतशास्त्राचें आद्य-स्थान भरतखंडच होय, आणि म्हणून त्यांच्यापैकीं कांहीं शोधक गृहस्थांनीं बऱ्याच परिश्रमानें या शास्त्राच्या मूलतत्वांची माहिती मिळवून ती आपल्या लोकांच्या माहिती-साठीं प्रसिद्ध केली. सन १७९८ मध्यें **डॉक्टर गिल्खिस्ट** यानें कलकत्ता येथें प्रसिद्ध केलेल्या **ओरिएंट्ल् लिंग्विस्ट ॲंड इंडियन ग्रामर**मध्यें तो म्हणतो— "प्राचीनकाळीं हिंदुलोकांस गाणें, बजावणें व नाचणें यांची चांगली माहिती होती. पुढें मुसलमान लोकांनीं हिंदु संगीतशास्त्राचें रक्षण करून त्यांतील नियमांचें अवलंबन केलें. ते आपल्या गवय्यांस कलावंत, कवाली व डहारी म्हणत. त्यांचे गवई (इराणी लोकांचा) रेख्ता, गजल, मरसिया, ख्याल, टप्पा, कोल, तराना, व (हिंदुलोकांचे) धृपद, गीत व करका वगैरे गात असत." प्रसिद्ध विद्वान **सर उइलियम जोन्स** यानें हिंदुस्थानांत आल्यावर या शास्त्राचें बरेंच लक्षपूर्वक मनन करून सन १७८४ मध्यें त्यावर आपल्या **एशिआटिक् रिसर्चिस्**मध्यें एक उत्तम निबंध प्रसिद्ध केला. त्याची दुसरी आवृत्ती १७९९ मध्यें लंडन येथें काढण्यांत आली. हें पुस्तक इंग्रज लोकांस इतकें प्रिय झालें कीं १८०७ पर्यंत त्याच्या पांच आवृत्त्या निघाल्या. त्यानें येथील प्रसिद्ध हिंदु व मुसलमान गवय्यांच्या गांठी घेऊन त्यांचें गायन व त्यांचीं वाद्यें ऐकिलीं; व त्यांची युरोपियन गाण्याशीं व वाद्यांशीं प्रत्यक्ष तुलना करून पाहिली तेवेळीं त्याजबरोबर **इंग्रज** व **जर्मन** गवई होते. त्याचे गवई येथील राग व वाद्यें यांची रचना पाहून फार खुष झाले. पाश्चिमात्य स्वरांच्या रचनेशीं आमच्या **स्वरांचें**

---

१ यंत्राच्या साह्यानें युरोपियन लोकांनीं असें ठरविलें आहे कीं एका सेकंदांत हवेच्या परमाणूमध्यें २६४ कंप ( vibrations ) झाले असतां षड्जस्वर उत्पन्न होतो. आर्य लोकांनीं ६५५३६ क्षणांत मंद्रषड्ज उत्पन्न होतो असें प्रमाण बसविलें आहे. याप्रमाणें सर्व स्वरांचे प्रमाण बसविलें आहे. ८१९२० क्षण = १ सेकंद.

व श्रुति[1] वगैरेचें पुष्कळ साम्य आहे, तसेंच कित्येक बाबतींत आमचें संगीत श्रेष्ठ व खुबीदार आहे हें जेव्हां **जोन्स** साहेबांच्या लक्षांत आलें तेव्हां त्याला या प्राचीन शास्त्राच्या मार्मिकपणाबद्दल फार आनंद व आश्चर्य वाटलें.

आपलें संगीतशास्त्र व पाश्चिमात्य लोकांचें संगीतशास्त्र यांत काय फरक आहे याबद्दलची माहिती जरी संगीतशास्त्राच्या इतिहासांत येत नसली तरी ती देणें बरें वाटल्यावरून यापुढें ती थोडक्यांत दिली आहे.

पाश्चिमात्य गायनाचा मुख्य मुद्दा म्हणजे **स्वरैक्य** ( Harmony ) होय. आणि आमच्या गायनाचा मुख्य मुद्दा **स्वरानुक्रममाधुर्य** ( Melody ) हा होय[2], **स्वरैक्य** म्हणजे एकाच वेळीं अनेक स्वर घेऊन स्वरमेलन करणें. युरोपियन लोकांचा बँड ऐकिला असतां हें तेव्हांच लक्षांत येईल. आपल्या गायनांत अनुक्रमानें स्वर घेऊन मधुरपणाकडे लक्ष देण्यांत येतें. तरी त्यांत स्वरैक्यही होतेंच. कारण एखाद्या तंतुवाद्याच्या एका तारेवर आघात केला असतां प्रथम एक ध्वनी निघतो पण ती तार त्या आघातामुळें कंपित होऊन त्याच स्वराचा हळूहळू उच्चार होत जाऊन शेवटीं तो स्वर नाहींसा होतो. याप्रमाणें अनेक स्वरांवर अनुक्रमानें आघात करीत गेल्यास प्रत्येक स्वराच्या मागच्या ध्वनींचें संमीलन होऊन फारच मधुर ध्वनी उत्पन्न होतो. हेंच **स्वरैक्य.** त्याचप्रमाणें कर्णेंद्रियाची रचनाही अशी आहे कीं कोणताही स्वर प्रथम कानीं पडला कीं तो एकदम नाहींसा न होतां हळूहळू नाहींसा होत जातो. याप्रमाणें एकामागून एक स्वर कानीं पडत गेल्यास त्यांचें स्वरैक्य होतें.[3] हें स्वरैक्य अनेक स्वर एकदम उच्चारिले असतां जें स्वरैक्य होतें त्यापेक्षां फारच मधुर व आनंददायक असतें.

---

१ "श्रुति" पहा.

२ "The dominant factor in the Hindu System is melody and that in the European System is harmony. Harmony arises from the agreeable concord of simultaneous notes, whereas melody is produced by the combination of successive notes into a relation of harmony."—*Hindu Music.*

३ "The mechanism of the human ear is such that the first note which one hears lingers for some time in the ear, and blends readily with successive notes into a harmonious relation, so as to create pleasure."
—*H. Music.*

दुसरें पाश्चिमात्य संगीतामध्यें **राग** म्हणून असें मुळींच कांहीं नाहीं[1]. तसेंच रागांचे **शृंगारस्वरूप[2], नायिका, ऋतु** व **वेळ** वगैरे गोष्टींचाही त्यांत अभाव आहे. ऋतुपरत्वें नेहमीं सृष्टीमध्यें तसाच मनुष्याच्या मनोवृत्तीमध्येंही फेरफार होत असतो. प्रत्येक ऋतुमध्यें मनाची वृत्ति कशी असते, कोणते मनोविकार उत्पन्न होतात व कोणते नष्ट होतात, कोणत्या वस्तूवर प्रीति बसते व कोणती आवडेनाशी होते, सृष्टिवैचित्र्याचा व सौंदर्याचा मनावर परिणाम होऊन कसकसे विचार बदलतात, व कोणत्या ऋतुमध्यें कोणते स्वर चांगले उच्चारितां येतात[3] या सर्व गोष्टींचा विचार करून रागांची रचना केली असल्यामुळें देशी गायन अधिक मधुर व खुबीदार झालें आहे. त्याचप्रमाणें मनास तल्लीन करून सोडणारे रागांचे **अलंकार** व ते दर्शविणाऱ्या **तान आलापा**दिकांचाही पाश्चिमात्य गायनांत अभावच आहे. आणि म्हणून भैरव, मालकंस, श्री, ललत, परज, कानडा, असावरी व बिभास वगैरे अनेक सुंदर रागांचें माधुर्य व खुबी युरोपियन लोकांस कळणें अशक्य आहे.

सूक्ष्म विचार केला असतां युरोपियन लोकांचीं **हार्मोनियम** वगैरे वाद्यें हिंदुराग गाण्यास योग्य नाहींत असें आढळून येईल[4]. कारण त्या वाद्यांमध्यें स्वरांची रचना

---

१ "In the European music there is no such thing as a system of Râg whereas a Hindu, who has an elementary knowledge of music, will at once recognize the Râg, which the artist sings, and a single misplaced note jars on his ear."—*H. Music.*

२ " रागांच्या शृंगारस्वरूपांचीं चित्रें कोणीतरी मार्मिक कारागिरानें तयार करावींत " अशी **सर उ. जोन्स** यानें शिफारस केली आहे. तो म्हणतो "हे राग कवी **शेक्सपिअर** यानें आपल्या शब्दांनीं व प्रसिद्ध चित्रकार **आल्बन** यानें आपल्या कलमानें उत्तम प्रकारें शृंगारिले असते." **रागमालेंत** दिलेल्या रागांच्या चित्रांपैकीं उत्तम चित्रें **जॉन्सन** व हे यांच्या संग्रहीं होतीं असें म्हणतात.

३ " वातावरणांत ऋतुपरत्वें ( हवेचें घन अथवा पातळ होणें असा ) फेरफार होत असतो. त्यामुळें स्वरामध्येंही फरक होतो. जसें, हिंवाळ्यापेक्षां उन्हाळ्यांत स्वर अधिक वेगानें कंपित अथवा आंदोलित होतात. **हनुमानानें** ऋतुपरत्वें रागांची योजना केली ही मोठ्या खुबीची गोष्ट आहे. "—**सर उ. जोन्स.**

४ "In the Piano and the several keyed English instruments the natural scale is dreadfully abused and distorted by the method of what is called "equal temperament." They divide the scale into 12 equal semi-tones; it is this that accustoms the ear to false notes; and many singers of note try to sing without the Piano. This limited scope of English instruments disqualifies them to perform many of the beautiful airs of Hindu music."—*H. Music.*

**अचलथाटा**ची असते. उदाहरणार्थ हार्मोनियमवर एक राग गाणें आहे. गायनास **षड्ज** स्वरापासून आरंभ केला पाहिजे. कारण तो **मूळस्वर** ( key note ) आहे. परंतु कोणत्याही ग्रामांतील कोणत्याही स्वरास षड्ज समजून तेथून गाण्यास आरंभ करण्यास हरकत नांहीं. हें गाणाऱ्याच्या खुषीवर व आवाजावर अवलंबून आहे. त्या प्रमाणें असें समजा कीं हार्मोनियमच्या पहिल्या सप्तकांतील **मध्यम** स्वरापासून गाण्यास आरंभ केला, म्हणजे हा **मध्यम** स्वर **षड्ज** झाला. षड्ज स्वरास चार श्रुति पाहिजेत, त्या या मध्यम स्वरास आहेत. पुढें दुसरा स्वर ऋषभ; त्याला तीन श्रुति पाहिजेत, पण या नव्या सप्तकांतील ऋषभ स्वरास ( म्हणजे मूळसप्तकांतील मध्यमच्या पुढचा स्वर जो पंचम त्याला ) तर चार श्रुति आहेत. म्हणून येथून अशुद्ध स्वर निघूं लागतील. तसें देशी वाद्यांत होत नाहीं. कारण त्यांतील स्वरांची रचना फिरवून पाहिजे ते शुद्ध स्वर घेतां येतात. तेव्हां एकतर गाणाऱ्याच्या आवाजाकडे अगर खुषीकडे लक्ष न देतां वाद्यांतील सुराप्रमाणें गावें, अगर अशुद्ध स्वर घेऊन अशुद्ध गाणें गावें. देशी संगीतांत जसे **कोमल, कोमलतर, शृंगारिक, शुद्ध, तीव्र, तीव्रतर व तीव्रतम**[२] असे प्रत्येक स्वराचे सूक्ष्म भाग केले आहेत तसे युरोपियन संगीतांत नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं, कारण प्रत्येक सप्तकांत ते १२ पेक्षां अधिक स्वर घेत नाहींत. असें आहे तरी आपलें संगीत शास्त्र पूर्णत्वास पोहोंचलें आहे असें युरोपियन लोकांस वाटत आहे. हे पहिल्यापासून लागलेल्या अभिरुचीचे परिणाम होत. असो.

संगीतशास्त्रांत गायनाचे दोन प्रकार सांगितले आहेत. **मार्गी** व **देशी.**[३] धृपदाची सुरवात होण्यापूर्वींची प्राचीन काळच्या ऋषींची जी गाण्याची पद्धत ती **मार्गी.** ही हल्लीं बहुतेक नष्ट झाली आहे. त्यानंतर निरनिराळ्या देशच्या लोकांच्या चालीरिति,

---

१ "सूर" पहा.

२ "In the Hindu system there are half notes, quarter notes, and minute and delicate shades, as in a painting by a master artist. The vocalist or the instrumentalist under the Hindu system often glides over a whole or half gamut, backward and forward on one unbroken easy flow."—*H. Music.*

३ ॥ यो मार्गितो विरिंचाद्यैः प्रयुक्तो भरतादिभिः ॥
॥ देवस्य पुरतः शंभोर्नियतोभ्युदयप्रदः ॥
॥ देशेदेशे जनानांच यत् स्याद्धृदयरंजकम् ॥
॥ गानंच वादनं नृत्यं तद्देशीत्यभिधीयते ॥

—संगीत रत्नाकर.

स्वभाव व आवड यांना अनुसरून जी गाण्याची पद्धत निघाली ती **देशी.** हीच हल्लीं प्रचारांत आहे. यांस **निबद्ध** व **अनिबद्ध** ही म्हणतात.

याशिवाय दक्षिण हिंदुस्थानांत **कर्नाटकी** व उत्तर हिंदुस्थानांत **हिंदुस्थानी** म्हणून निराळीच पद्धत प्रसिद्ध आहे. **कर्नाटकी**मध्यें पल्लवी, कीर्तन, पद, तानवर्ण, चौकवर्ण, जवाली गीत व रागमालिका इत्यादि प्रकार आहेत. तसेंच, हिंदुस्थानीमध्यें धृपद, तिल्लाना, सुरावर्तन, ख्याल, टप्पा, ठुंबरी, गजल, होरी, रेख्ता, दादरा, चतुरंग व लावणी वगैरे गाण्याचे प्रकार आहेत. महाराष्ट्रांत **हिंदुस्थानी**चा विशेष प्रसार आहे.

---

१ ॥ निबद्धश्चानिबद्धश्च मार्गोयं द्विविधो मतः ॥
॥ आलापादि निबद्धो यः स च मार्गः प्रकीर्तितः ॥
॥ आलापादि विहीनस्तु स च देशी प्रकीर्तितः ॥

—मतंग.

# प्रकरण दुसरें.

## स्वरविचार.

**स्वर**[1] म्हणजे शब्द, **ध्वनी**[2] अथवा **नाद**[3]. हे शब्द दोन प्रकारचे आहेत. **ध्वन्यात्मक** आणि **वर्णात्मक**. सतार, मृदंग, इत्यादि वाद्यांपासून निघणारे व ज्यांचा कांहीं अर्थ होत नाहीं ते **ध्वन्यात्मक** शब्द. तसेंच संस्कृत, प्राकृत इत्यादि भाषारूपी जे शब्द व ज्यांचा कांहीं अर्थ होतो ते **वर्णात्मक**.

हे स्वर साधारणपणें तीन प्रकारचे आहेत. **ऱ्हस्व, दीर्घ** आणि **प्लुत**. एक मात्रेचे जे शब्द ते **ऱ्हस्व**, दोन मात्रांचे **दीर्घ** व तीन मात्रांचे **प्लुत**[4]. मुख्य स्वर सात आहेत.

**षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत** व **निषाद**. या सप्तस्वरांचीं संक्षिप्त रूपें येणेंप्रमाणें—

**सा-री-ग-म-प-ध-नी.**

या सात स्वरांच्या समूहास **सप्तक** म्हणतात.

हीं सप्तकें तीन आहेत. **षड्ज, मध्य** आणि **तार** ( अथवा **टीप** ). यांस अनुक्रमें **मंद्र, मध्य** आणि **तार**, अथवा **अनुदात्त, स्वरित** आणि **उदात्त** असेंही म्हणतात. **मंद्र** स्वरापेक्षां **मध्य** दुप्पट व **मध्य** स्वरापेक्षां **तार**स्वर दुप्पट उंच होतें[5].

---

१ ॥ स्वतो रंजयति श्रोतृचित्तं स स्वर उच्यते ॥

२ ॥ आत्मा विवक्षमाणोऽयं मनः प्रेरयते मनः ॥
॥ देहस्थं वन्हिमाहन्ति स प्रेरयति मारुतम् ॥
॥ ब्रह्मग्रन्थिस्थितः सोऽथक्रमादूर्ध्वपथे चरन् ॥
॥ नाभिहृत्कण्ठमूर्द्धास्येष्वाविर्भावयते ध्वनिम् ॥ ( संगीत रत्नाकर. )

३ ॥ नकारं प्राणनामानं दकारमनलं विदुः ॥
॥ जातः प्राणाग्निसंयोगात्तेन नादोऽभिधीयते ॥ ( संगीत रत्नाकर. )

४ कुक्कुट जो शब्द करतो त्यांत अनुक्रमें १, २ व ३ मात्रांचें अंतर असतें;
॥ चाषस्तु वदते मात्रां द्विमात्रत्वेव वायसः ॥
॥ शिखी रौति त्रिमात्रं नकुलस्त्वर्धमात्रकं ॥ ( नारदीशिक्षा. )

५ ॥ व्यवहारे त्वसौ त्रेधा हृदि मन्द्रोऽभिधीयते ॥
॥ कण्ठे मध्यो मूर्ध्नि तारो द्विगुणश्चोत्तरोत्तरः ॥ ( संगीत रत्नाकर. )

स्वर=Notes. मंद्र=Bass notes. तार=Acute notes.

१ **षड्ज ( अथवा खरज ) सप्तक**–हें नीच स्वरांचें सप्तक होय. एक नीच स्वर घ्यावा व त्याला "षड्ज" समजून दुसरा म्हणजे "ऋषभ" स्वर त्यापेक्षां उंच घ्यावा. तसेंच "ऋषभा"पेक्षां "गांधार"उंच घ्यावा. याप्रमाणें "निषादा" पर्यंत आरोह केला असतां, म्हणजे स्वर चढवीत गेलें असतां जें सप्तक होतें त्याला **खरजसप्तक** म्हणतात. जसें,–सा–री–ग–म–प–ध–नी.

२ **मध्य (अथवा मध्यम) सप्तक**–हें फार उंच नाहीं व फार नीचही नाहीं अशा मध्यम स्वरांचें सप्तक होय. खरजसप्तकांतील निषाद स्वरापेक्षां उंच स्वर घेऊन त्याला षड्ज समजावें व तेथून दुसऱ्या निषादापर्यंत स्वरांचा आरोह केला असतां जें सप्तक होतें त्याला **मध्यमसप्तक** म्हणतात.

३ **तारसप्तक**–मध्यसप्तकांतील निषाद स्वरापेक्षां उंच स्वर घेऊन त्याला षड्ज समजावें व तेथून तिसऱ्या निषादापर्यंत स्वरांचा आरोह केला असतां जें सप्तक होतें त्याला **तार** अथवा **टीपसप्तक** म्हणतात.

तीनपेक्षां अधिक सप्तकांचा खुलासा येणें प्रमाणें:—

**साडेतीन सप्तकें**–खरजसप्तकांतील षड्ज स्वरापासून पंचमापर्यंत अवरोह केला असतां, म्हणजे षड्ज स्वरापासून ( सा–नी–ध–प याप्रमाणें ) पंचमापर्यंत मागें उतरते स्वर घेतले असतां अर्धें सप्तक होतें, तें व पूर्वींचीं तीन मिळून साडेतीन सप्तकें होतात.

**चार सप्तकें**–तारसप्तकांतील निषाद स्वरापासून पुढें पंचमापर्यंत आरोह केला असतां अर्धें सप्तक होतें. तें व पूर्वींचीं साडेतीन मिळून चार सप्तकें* होतात.

स्वरमंडळ व पियानो वगैरे वाद्यांत पांचपासून सातपर्यंत सप्तकें घेतां येतात. परंतु गाण्यांत बहुतकरून अडीच सप्तकांपेक्षां अधिक सप्तकें घेतां येत नाहींत.

## स्वरांचे भेद.

स्वरांचे दोन भेद आहेत. **अविकारी** आणि **विकारी**. यांस अनुक्रमें **स्थायि** व **अस्थायि**ही म्हणतात.

***४ सप्तकें.**

| | |
|---|---|
| प ध नी | **अर्धें सप्तक.** |
| **सा** री ग म प ध नी | **षड्ज सप्तक.** |
| **सा** री ग म प ध नी | **मध्य सप्तक.** |
| **सा** री ग म प ध नी | **तार सप्तक.** |
| **सा** री ग म प | **अर्धें सप्तक.** |

१ **अविकारी स्वर.**—ज्या स्वरांचें कोमल तीव्रादि रूपांतर होत नाहीं ते. हे स्वर दोनच आहेत. षड्ज व पंचम.

२ **विकारी**—ज्या स्वरांचें कोमल तीव्रादि रूपांतर होतें ते. हे स्वर पांच आहेत. ऋषभ, गांधार, मध्यम, धैवत व निषाद. विकारी स्वरांत जो फेरफार होतो तो साधारणपणें दोन प्रकारचा आहे. **कोमल**[१] **व तीव्र**[२]. मात्र मध्यमाचें **शुद्ध** व **तीव्र** असें रूपांतर प्रचलित आहे.

**शुद्ध स्वर.**–फार उंच नाहीं व फार नीचही नाहीं असा स्वाभाविकपणें निघणारा स्वर.

**तीव्र स्वर**–शुद्ध स्वरापेक्षां उंच स्वर.

**कोमल स्वर**–शुद्ध स्वरापेक्षां नीच स्वर.

याप्रमाणें दोन अविकारी व दहा विकारी स्वर मिळून एकंदर बारा स्वर होतात. ते–

| | | |
|---|---|---|
| १ | षड्ज | |
| २ | ऋषभ... ... ... | ...कोमल–तीव्र. |
| २ | गांधार... ... ... | ...कोमल–तीव्र. |
| २ | मध्यम... ... ... | ...शुद्ध–तीव्र. |
| १ | पंचम | |
| २ | धैवत ... ... ... | ...कोमल–तीव्र. |
| २ | निषाद... ... ... | ...कोमल–तीव्र. |
| १२ | | |

या बारा स्वरांमध्यें री–ग–ध–नी या प्रत्येकाचा एकएक शुद्ध स्वर मिळविला म्हणजे एकंदर सोळा स्वर होतात. ते—

| | | |
|---|---|---|
| १ | षड्ज | |
| ३ | ऋषभ... ... ... | ...कोमल–शुद्ध–तीव्र. |
| ३ | गांधार... ... ... | ...कोमल–शुद्ध–तीव्र. |
| २ | मध्यम... ... ... | ...शुद्ध–तीव्र. |
| १ | पंचम | |
| ३ | धैवत ... ... ... | ...कोमल–शुद्ध–तीव्र. |
| ३ | निषाद... ... ... | ...कोमल–शुद्ध–तीव्र. |
| १६ | | |

उत्तरहिंदुस्थानांत बारा व दक्षिणहिंदुस्थानांत सोळा स्वर घेण्याचा प्रघात आहे.

१ Flat. २ Sharp.

## स्वरांचे वर्ण.[1]

हे वर्ण चार प्रकारचे आहेत. स्थायि, आरोही, अवरोही व संचारी.

१ **स्थायि**—एकाच स्वराचा एकसारखा उच्चार करणें यास **स्थायि** म्हणतात जसें:—सा-सा-सा.

२ **आरोही**—पहिल्या स्वरापेक्षां दुसरा स्वर उंच व दुसऱ्यापेक्षां तिसरा उंच याप्रमाणें स्वर चढवीत जाणें[2] यास **आरोह** म्हणतात. जसें-सा-री-ग-म-प-ध-नी

३ **अवरोही**—एका स्वरापेक्षां दुसरा स्वर नीच व दुसऱ्यापेक्षां तिसरा नीच याप्रमाणें स्वर उतरीत जाणें यास **अवरोह** म्हणतात. जसें—नी-ध-प-म-ग-री-सा.

४ **संचारी**—वर सांगितलेल्या तीन वर्णांच्या मिश्र स्वरांस **संचारी** म्हणतात. जसें—सा-सा-सा-नी-म-म-नी-म-प-नी-री-री-प-प-नी-ध, वगैरे.

### स्थायि.




**आरोह** आणि **अवरोह** यांस अनुक्रमें **चढती** व **उतरती** असेंही म्हणतात.

## स्वरांचे अलंकार.[3]

वर्णांतील सप्तस्वरांचा निरनिराळ्या प्रकारचा जो संयोग त्यास **अलंकार** म्हणतात. अलंकार हा रागांचा शृंगार होय. अलंकाराचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत स्थायीचे सात, आरोहीचे बारा, अवरोहीचे बारा, संचारीचे पंचवीस व इतर बारा मिळून एकंदर ६८ प्रकार मुख्य आहेत. ते—

१ **स्थायि अलंकार ( ७ )**-भद्र, नंद, जित, सोम, ग्रीव, भाल व प्रकाश.

---

१ Manipulations of notes.

२ "सप्तक" पट्टा.

३ Permutations of Varnas ( वर्ण ).

२ **आरोही अलंकार** ( १२ )–विस्तीर्ण, निष्कर्ष, बिंदु, अभ्युच्छ्रय, ह्रसित, प्रेङ्खित, आक्षिप्त, संधिप्रच्छादन, उद्गित, उद्वाहित, त्रिवर्ण व पृथग्वेणी.

३ **अवरोही अलंकार** ( १२ )–आरोही अलंकारांचीं जीं नांवें तींच अवरोही अलंकारांचींही होत.

४ **संचारी अलंकार** ( २५ )–मंद्रादि, मंद्रमध्य, मंद्रांत, प्रस्तार, प्रसार, व्यावृत, चस्खलित, परिवर्त, आक्षेप, बिंदु, उद्वाहित, ऊर्मि, सम, निष्कूजित, श्येन, क्रम, उद्घाटित, रंजित, सन्निवृत्त, प्रवृत्तक, वेणु, ललितस्वर, हुंकार, आल्हादमान व अवलोकित.

५ **इतर अलंकार** ( १२ )–इंद्रनील, महावज्र, निर्दोष, सीर, कोकिल, आवर्त, सदानंद, चक्राकार, जव, शंख, पद्माकार व वारिद.

प्रचारांतील कांहीं अलंकार खालीं दिले आहेत—

१ **आरोह**–सासा-रीरी-गग-मम-पप-धध-नीनी-सासा.
**अवरोह**–सासा-नीनी-धध-पप-मम-गग-रीरी-सासा ( निष्कर्ष )

२ **आ०**–सारी-रीग-गम-मप-पध-धनी-नीसा.
**अ०**–सानी-नीध-धप-पम-मग-गरी-रीसा ( प्रेङ्खित )

३ **आ०**–सारीग-रीगम-गमप-मपध-पधनी-धनीसा.
**अ०**–सानीध-नीधप-धपम-पमग-मगरी-गरीसा ( संधीप्रच्छादन )

४ **आ०**–साग-रीम-गप-मध-पनी-धसा.
**अ०**–साध-नीप-धम-पग-मरी-गसा ( अभ्युच्छ्रय )

५ **आ०**–सारीसा-रीगरी-गमग-मपम-पधप-धनीध-नीसानी-सारीसा.
**अ०**–सानीसा-नीधनी-धपध-पमप-मगम-गरीग-रीसारी-सानीसा ( भद्रा )

६ **आ०**–सासासा-रीरीरी-गगग-ममम-पपप-धधध-नीनीनी-सासासा.
**अ०**–सासासा-नीनीनी-धधध-पपप-ममम-गगग-रीरीरी-सासासा ( गात्रवर्णा )

७ **आ०**–सारीगम-रीगमप-गमपध-मपधनी-पधनीसा.
**अ०**–सानीधप-नीधपम-धपमग-पमगरी-मगरीसा ( सदानंद )

८ **आ०**–सागमरी-रीमपग-गपधम-मधनीप-पनीसाध-धसारीनी-नीरीगसा-सागमरी.
**अ०**–साधपनी-नीपमध-धमगप-पगरीम-मरीसाग-गसानीरी-रीनीधसा ( परिवर्त )

९ **आ०**–सासासारी-रीरीरीग-गगगम-मममप-पपपध-धधधनी-नीनीनीसा-सासासारी.
**अ०**–रीरीरीसा-सासासानी-नीनीनीध-धधधप-पपपम-मममग-गगगरी-रीरीरीसा
( बिंदुत्रिवनी )

१० आ०–सारीसारीग-रीगरीगम-गमगमप-मपमपध-पधपधनी-धनीधनीसा.

अ०–सानीसानीध-नीधनीधप-धपधपम-पमपमग-मगमगरी-गरीगरीसा

( पंचावली )

११ आ०–सारीगमप-रीगमपध-गमपधनी-मपधनीसा.

अ०–सानीधपम-नीधपमग-धपमगरी-पमगरीसा. ( पंचानन )

१२ आ०–सारीसारीगम-रीगरीगमप-गमगमपध-मपमपधनी-पधपधनीसा.

अ०–सानीसानीधप-नीधनीधपम-धपधपमग-पमपमगरी-मगमगरीसा ( निर्दोष )

१३ आ०–सारीगमपध-रीगमपधनी-गमपधनीसा.

अ०–सानीधपमग-नीधपमगरी-धपमगरीसा ( षडानन )

१४ आ०–सारीग सारीग सारी सारी गम, रीगम रीगम रीग रीगमप, गमप गमप गम गमपध, मपध मपध मप मपधनी, पधनी पधनी पध पधनीसा.

अ०–सानीध सानीध सानी सानीधप, नीधप नीधप नीध नीधपम, धपम धपम धप धपमग, पमग पमग पम पमगरी, मगरी मगरी मग गगरीसा.

१५ आ०–सारी सारी नी सारीग, रीग रीग सारीगम, गम गम रीगमप, मप मप गमपध, पध पध म पधनी, धनी धनी प धनीसा.

अ०–सानी सानी रीं सानीध, नीध नीध सा नीधप, धप धप नी धपम, पम पम ध पमग, मग मग प मगरी, गरी गरी म गरीसा.

१६ आ०–सारी सारी साग, रीग रीग रीम, गम गम गप, मप मप मध, पध पध पनी, धनी धनी धसा.

अ०–सानी सानी साध, नीध नीध नीप, धप धप धम, पम पम पग, मग मग मरी, गरी गरी गसा.

१७ आ०–सासासासा, रीरीरीरी, गगगग, मममम, पपपप, धधधध, नीनीनीनी, सासासासा.

अ०–सासासासा, नीनीनीनी, धधधध, पपपप, मममम गगगग, रीरीरीरी, सासासासा.

१८ आ०–सारीग सारीग सारी सारी गमपधनीसा.

अ०–सानीध सानीध सानी सानी धमपगरीसा.

१९ आ०–सासासा रीरी सारीग रीरीरी गग रीगम गगग मम गमप ममम पप मपध पपप धध पधनी धधध नीनी धनीसा.

अ०-सानीध नीनी धधध नीधप धध पपप धपम पप ममम पमग मम गगग मगरी गग रीरीरी गरीसा रीरी सासासा.

२० आ०-सासा सारी साग साम साप साध सानी सासा.

अ०-सासा नीसा धसा पसा मसा गसा रीसा सासा.

२१ आ०-सा री ग म प ध नी सा.

अ०-सा नी ध प म ग री सा.

२२ सारीसा, सारी गरीसा, सारी गमगरीसा, सारी गमपमगरीसा, सारी गमपध पमगरीसा, सारीगमपधनी धपमगरीसा ( जव )

२३ पधनीसा पधनीसा पधनीसा, मगरी मगरी मगरी, गरीसा गरीसा गरीसा, सागम सागम सागम.

२४ सानीसा, सानीधनीसा सानीधप धनीसा सानी धपम पधनीसा, सानीधपमग मपधनीसा, सानीधपमगरी गमपधनीसा सानी धपमगरीसा रीगमपधनीसा, सानी धपमगरीसा.

२५ सासासा नीनी सानीध नीनीनी धध नीधप धधध पप धपम पपप मम पमग ममम गग मगरी गगग रीरी गरीसा.

अलंकार हे गमक, तान, आलाप, लाग, डाट इत्यादिकांच्या रूपानें निरनिराळ्या रागांचें स्वरूप दाखवितात.

**गमक**—स्वरास कंप देऊन त्याचा उच्चार करणें याला गमक म्हणतात. जसें- सा-आ-आ-आ, री-ई-ई-ई, ग-अ-अ-अ इत्यादि.

याप्रमाणें सप्त स्वरांस कंप देणें तो प्रत्येक स्वरास अमुक वेळां द्यावा असा नियम नाहीं. निरनिराळ्या रागांच्या स्वरूपांप्रमाणें त्यांतील स्वरांस कंप देण्यांत येतो. गमकेचे **स्फुरित, कंपित, लीन, स्तिमित, आंदोलित, आहत,** व **त्रिकभिन्न**[1] असे सात प्रकार सांगितले आहेत. पण हल्लीं **गमक, तान, मींढ, घसीट, खटका** व **पुकार** वगैरे नांवें प्रचारांत आहेत. एका स्वराची गमक होते, त्याचा प्रकार वर सांगितलाच आहे.

**तान**[2]-सप्तस्वर अथवा त्यांपैकीं विशिष्ट स्वरांचा आरोह करणें यास तान म्हणतात.

---

१ "सकलशास्त्र निरूपण."

२ ॥ आरोहावरोहक्रमयुक्तः स्वरसमुदायो मूर्च्छनेत्युच्यते ॥
॥ तानस्तु आरोहणं भवतीतिभेदः ॥ मतंग.

मुख्य तानसंख्या ४९ आहे. त्यांस कूटतान अथवा कोटतान म्हणतात. सप्तस्वरांपैकीं प्रत्येक स्वरास षड्ज समजून तेथून आरोह करीत गेलें असतां सात प्रकार होतात व या प्रत्येकाचे आणखी सात सात मिळून एकंदर ४९ प्रकार होतात. तान सात जातींची आहे. एक स्वराची तान, दोन स्वरांची तान, तीन स्वरांची तान या प्रमाणें तानेंतील स्वरांच्या संख्येवरून यांचे सात भेद होतात, ते–

| नांव. | | स्वरसंख्या. |
|---|---|---|
| संपूर्ण | ... ... ... ... ... | ७ |
| षाडव | ... ... ... ... ... | ६ |
| ओडव | ... ... ... ... ... | ५ |
| सुरतर | ... ... ... ... ... | ४ |
| सामिक | ... ... ... ... ... | ३ |
| गाथिक | ... ... ... ... ... | २ |
| आर्चिक | ... ... ... ... ... | १ |

आंदोलित स्वरानें आरोह करणें याला **मेंढ**[1] आणि त्याचप्रमाणें अवरोह करणें याला **घसीट** म्हणतात. दोन स्वरांची जी गमक तिला **खटका** म्हणतात. एकाच स्वराचा उंच ध्वनी करणें यास **पुकार** म्हणतात[2]. गातांना एकदम एक स्वर सोडून दुसरा स्वर घेणें याला **लाग** म्हणतात. तसेंच एखाद्या स्वरास मधेंच मुग्ध ठेवणें याला **डाट**[3][4] म्हणतात.

**आलाप**–कोणत्याही रागांतील प्रधान स्वराचा त्या रागाच्या नियमाप्रमाणें विस्तार करून पुनः त्याला त्याच रागाच्या अनेक शुद्ध स्वरांत मिळवून त्या रागाचें निखालस स्वरूप दाखविणें याला आलाप म्हणतात. याचे चार भाग करून प्रत्येक भागास मुकाम अथवा **स्थान** म्हणतात.

प्रथम प्रधानस्वर घेऊन नंतर पहिल्या षड्ज स्वरावर येणें हें आलापाचें **पहिलें स्थान**. षड्ज स्वरावरून प्रधान स्वरावर येणें हें दुसरें स्थान, याला **रूपक** म्हणतात.

---

१ जसें, सतारीच्या षड्ज स्वराच्या पडद्यावर डाव्या हाताचें बोट ठेवून उजव्या हातानें तारेवर आघात करावा व तत्क्षणींच डाव्या हाताच्या बोटानें तार पलीकडे ओढून पुढचे म्हणजे ऋषभ, गांधार वगैरे स्वर उत्पन्न करणें यास मेंढ म्हणतात.

२ "सकलशास्त्र निरूपण."

३ "संगीतादित्य."

४ जसें, सतारीच्या षडज स्वरावर बोट ठेऊन तारेवर आघात करावा व लागलींच तें बोट तारेवरून न उचलतां तसेंच गांधार स्वरावर आणावें. येथें ऋषभ स्वराचा डाट झाला.

पुनः पहिल्या षड्ज स्वरावर येऊन तारसप्तकांतील षड्ज स्वरावर येणें हें तिसरें स्थान, याला **चिकस्वर** म्हणतात. नंतर पुनः पहिल्या षड्ज स्वरावर यावें आणि तेथून दुसऱ्या व तिसऱ्या सप्तकांतील स्वरांवर येऊन नियमित स्वरांचा आरोहावरोह करून त्या रागाची छाया दाखविणें हें चवथें स्थान, याला **विश्रामक** म्हणतात[1].

**आलापाचा आरंभ**–प्रथम मध्यसप्तकांतील षड्ज व पंचम हे स्थायिस्वर घेऊन नंतर तारसप्तकांतील षड्ज घ्यावा व तेथून पुनः पंचमावर व पंचमावरून मूळ षड्ज स्वरावर यावें म्हणजे आलापास आरंभ झाला.

एखाद्या रागांतील ठरीव स्वरांत आलाप घेणें, अगर इतर स्वर घेऊन त्या रागाचें स्वरूप बदलणें, किंवा त्वरित अथवा मंद आलाप घेणें इत्यादिकांवरून आलापाचे **रूपालीट, वरतिलंग, रूपसंजी, स्थायिभंजी, समालीट, रागालीट** व **राकाकलीट** असे सात प्रकार होतात[2].

## ग्राम[3].

सप्तस्वरांच्या समूहास ग्राम म्हणतात. हे ग्राम तीन आहेत. **षड्जग्राम, मध्यमग्राम** आणि **गांधार[4]ग्राम.** यांना अनुक्रमें **आदि, मध्य** व **अवसान,** अथवा **नंद्यावर्त, जीमूत** व **सुभद्र** असेंही म्हणतात. तान-मुर्च्छनांचा मुख्य आधार ग्राम आहे.

१. **षड्जग्राम** म्हणजे षड्ज स्वरापासून निषादापर्यंत आरोह केला असतां होणारें सप्तक. तें असें–ज्या स्वरापेक्षां नीच स्वराचा उच्चारच करतां येणार नाहीं अशा अतीशय नीच स्वराचा प्रथम उच्चार करावा आणि त्याला षड्ज स्वर समजून तेथून आरोहास आरंभ करून पंचम स्वरापर्यंत यावें. नंतर या पंचम स्वरास षड्ज समजून ( म्हणजे हा पंचमस्वर जितका उंच असेल तितकाच उंच षड्ज घेऊन ) तेथून आरोहास आरंभ करून निषादापर्यंत यावें म्हणजे एक सप्तक होईल. हें सप्तक मूळच्या दुसऱ्या सप्तकांतील मध्यम स्वरावर पूर्ण होईल. हें जें पहिल्या सप्तकांतील पंचम स्वरापासून दुसऱ्या सप्तकांतील मध्यम स्वरापर्यंत एक सप्तक झालें यास **षड्जग्राम** म्हणतात.

२. **मध्यमग्राम**–मध्यम स्वरास षड्ज समजून तेथून निषादापर्यंत आरोह केला असतां होणारें सप्तक. म्हणजे ज्या मध्यम स्वरावर षड्जग्राम पूर्ण झाला त्या मध्यम

---

१ "रागस्तान."

२ "सकलशास्त्र निरूपण."

३ Gamut or Scale.

४ ॥ **षड्जमध्यमगांधारास्त्रयो ग्रामाः प्रकीर्तिताः** ॥
॥ **भूर्लोकाज्जायते षड्जो भुवर्लोकाच्च मध्यमः** ॥
॥ **स्वर्गान्नान्यत्र गांधारो नारदस्य मतं यथा** ॥ नारदीशिक्षा ॥

स्वरास षड्ज समजून तेथून आरोहास आरंभ करून निषादापर्यंत गेलें असतां एक सप्तक होईल. हें दुसरें सप्तक मूळच्या तिसऱ्या सप्तकांतील गांधारस्वरावर पूर्ण होईल. या दुसऱ्या सप्तकास **मध्यमग्राम** म्हणतात.

३. **गांधारग्राम**–गांधार स्वरास षड्ज समजून तेथून निषादापर्यंत आरोह केला असतां होणारें सप्तक. म्हणजे ज्या गांधारस्वरावर मध्यमग्राम पूर्ण झाला त्या गांधारस्वरास षड्ज समजावें व तेथून आरोहास आरंभ करून निषादापर्यंत एक सप्तक पूर्ण करावें. हें तिसरें सप्तक मूळच्या चवथ्या सप्तकांतील ऋषभस्वरावर पूर्ण होईल. या तिसऱ्या सप्तकास **गांधारग्राम** म्हणतात. या ग्रामांत गाणें फार अवघड आहे, कारण यांतील स्वर फार उंच आहेत.

ही ग्रामांची रचना नीट लक्षांत यावी म्हणून त्यांचें चित्र पुढें दिलें आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १ सा | | |
| | | री | | |
| | | ग | | |
| | | म | | |
| | | प | सा | |
| | | ध | री | |
| | | नी | ग | १ |
| | | २ सा | म | षड्जग्राम. |
| | | री | प | |
| | | ग | ध | |
| | सा | म | नी | |
| | री | प | | |
| २ | ग | ध | | |
| मध्यमग्राम. | म | नी | | |
| | प | ३ सा | | |
| | ध | री | | |
| | नी | ग | सा | |
| | | म | री | |
| | | प | ग | ३ |
| | | ध | म | गांधारग्राम. |
| | | नी | प | |
| | | ४ सा | ध | |
| | | री | नी | |

१ रागस्तान.

कित्येकांच्या मतें षड्ज, मध्यम व तार अशीं जीं तीन सप्तकें आहेत तेच तीन ग्राम होत.

जरी याप्रमाणें तीन ग्राम अथवा सप्तकें ठरीव आहेत तरी कोणत्याही सप्तकांतील वाटेल त्या स्वरास षड्ज समजून तेथून गाण्यास आरंभ करण्यास कांहीं हरकत नाहीं. हें गाणाऱ्याच्या स्वर उंच चढविण्याच्या शक्तीवर अथवा मर्जीवर अवलंबून आहे.

## मूर्च्छना.

सप्तस्वरांचा अनुक्रमें आरोह व अवरोह करणें त्यास अथवा त्या स्वरसमुदायास **मूर्च्छना** म्हणतात. ही एक मूर्च्छना झाली. याप्रमाणें प्रत्येक ग्रामांतील दरएक स्वरावर एक याप्रमाणें तीन ग्रामांत एकंदर एकवीस मूर्च्छना होतात. ग्रामपरत्वें यांचीं नांवें वगैरे पुढील कोष्टकांत दिलीं आहेत.

### षड्जग्राम.

| मूर्च्छनांचीं नांवें. | मूर्च्छनांचा स्वरविस्तार. | | मूर्च्छनांच्या देवता. |
|---|---|---|---|
| | आरोह. | अवरोह. | |
| उत्तरमंद्रा | सा-री-ग-म-प-ध-नी | नी-ध-प-म-ग-री-सा | यक्ष |
| रंजनी | नी-सा-री-ग-म-प-ध | ध-प-म-ग-री-सा-नी | राक्षसी |
| उत्तरायता | ध-नी सा-री-ग-म-प | प-म-ग-री-सा-नी-ध | नारद |
| शुद्धषड्जा | प-ध-नी-सा-री-ग-म | म-ग-री-सा-नी-ध-प | ब्रह्मदेव |
| मत्सरीकृता | म-प-ध-नी-सा-री-ग | ग-री-सा-नी-ध-प-म | नाग |
| अश्वक्रांता | ग-म-प-ध-नी-सा-री | री-सा-नी-ध-प-म-ग | अश्विनीकुमार |
| अभिरुद्गता | री-ग-म-प-ध-नी-सा | सा-नी-ध-प-म-ग-री | वरुण |

१ ॥ क्रमात्स्वराणां सप्तानामारोहश्चावरोहणम् मूर्च्छनेत्युच्यते ॥
॥ ग्रामस्था एताः सप्त सप्त च ग्रामत्रयेऽपि प्रत्येकं सप्त सप्त च मूर्च्छनाः ॥

## मध्यमग्राम.

| मूर्च्छनांचीं नांवें. | मूर्च्छनांचा स्वरविस्तार. | | मूर्च्छनांच्या देवता. |
|---|---|---|---|
| | आरोह. | अवरोह. | |
| सौवीरी | म-प-ध-नी-सा-री-ग | ग-री-सा-नी-ध-प-म | ब्रह्मदेव |
| हरिणाश्वा | ग-म-प-ध-नी-सा-री | री-सा-नी-ध-प-म-ग | इंद्र |
| कलोपनता | री-ग-म-प-ध-नी-सा | सा-नी-ध-प-म-ग-री | वायु |
| शुद्धमध्या | सा-री-ग-म-प-ध-नी | नी-ध-प-म-ग-री-सा | गंधर्व |
| मार्गी | नी-सा-री-ग-म-प-ध | ध-प-म-ग-री-सा-नी | सिद्ध |
| पौरवी | ध-नी-सा-री-ग-म-प | प-म-ग-री-सा-नी-ध | ब्रह्मदेव |
| हृश्यका | प-ध-नी-सा-री-ग-म | म-ग-री-सा-नी-ध-प | भानु |

## गांधारग्राम.

| मूर्च्छनांचीं नांवें | मूर्च्छनांचा स्वरविस्तार. | |
|---|---|---|
| | आरोह. | अवरोह. |
| नंदा | ग-म-प-ध-नी-सा-री | री-सा-नी-ध-प-म-ग |
| विशाला | री-ग-म-प-ध-नी-सा | सा-नी-ध-प-म-ग-री |
| सुमुखी | सा-री-ग-म-प-ध-नी | नी-ध-प-म-ग-री-सा |
| विचित्रा | नी-सा-री-ग-म-प-ध | ध-प-म-ग-री-सा-नी |
| रोहिणी | ध-नी-सा-री-ग-म-प | प-म-ग-री-सा-नी-ध |
| सुरवा | प-ध-नी-सा-री-ग-म | म-ग-री-सा-नी-ध-प |
| आलापी | म-प-ध-नी-सा-री-ग | ग-री-सा-नी-ध-प-म |

## श्रुति.[1]

सप्तस्वरांतील प्रत्येक स्वरास जो काल नियमीत केला आहे त्याचे सूक्ष्म विभाग करून त्या प्रत्येक विभागास **श्रुति** ही संज्ञा आहे. मागें जे कोमलतीव्रादि स्वरांचे प्रकार

१ ॥ प्रथमं श्रवणाच्छब्दः श्रूयते ह्रस्वमात्रकः ॥
॥ सा श्रुतिःसंपरिज्ञेया स्वरावयवलक्षणा ॥

१ Intervals or particles of sound.

सांगितले आहेत त्या मिश्रश्रुतीच होत. सतारीच्या कोणत्याही दोन पडद्यांच्या मधें आणखी कांहीं पडदे बांधून त्या प्रत्येक पडद्यावर बोट ठेवून तारेवर आघात करीत गेलें असतां जो ध्वनी निघेल तो प्रत्येक ध्वनी श्रुति होय. उदाहरणार्थ, याप्रमाणें षड्ज व ऋषभ या दोन पडद्यांच्यामधें कांहीं पडदे बांधावे, व त्यांपैकीं कोणत्याही पडद्यावर बोट ठेवून तारेवर आघात करावा म्हणजे जो ध्वनी निघेल ती श्रुति. किंवा एक सतार घेऊन तिजवर ५।६ तारा बांधाव्या, व त्या अनुक्रमें एकापेक्षां एक उंच स्वरावर अशा रीतीनें लावाव्या कीं पहिल्या तारेवर षड्ज व शेवटल्या तारेवर ऋषभ उत्पन्न होऊन बाकींच्या तारांवर या दोन स्वरांच्या मधले स्वर उत्पन्न व्हावे. यांतील पहिल्या व शेवटल्या तारेवर आघात केला असतां ध्वनीचा जो टणत्कार ( किंवा जें रणन ) उत्पन्न होईल व जो बराच वेळ ऐकूं येऊन हळूहळू नाहींसा होईल त्याला **अनुरणनात्मक नाद** किंवा **स्वर** म्हणतात. तसेंच मधल्या तारांवर आघात केला असतां जें रणन उत्पन्न होईल व जें लागलीच नाहींसें होईल त्याला **रणनात्मक नाद** किंवा **श्रुति** म्हणतात. वर सांगितलेल्या षड्ज व ऋषभ या दोन तारांमधें ३।४ तारांऐवजीं जर पुष्कळ तारा बांधल्या तर त्यांपैकीं शेवटल्या तारेचा ध्वनी अनुरणनात्मक ऐकूं येईल. व मधल्या तारांपैकीं २।३ तारांचा ध्वनी रणनात्मक ऐकूं येईल. परंतु बाकीच्यांचा ध्वनी अति सूक्ष्म असल्यामुळें स्पष्ट ऐकूं येणार नाहीं. परंतु याप्रमाणें श्रुतींची संख्या अनियमीतपणें फार मोठी होऊन ते स्वरही स्पष्ट ऐकूं येणार नाहींत म्हणून आणि "कर्णेंद्रियाला ग्राह्य जो ध्वनी तीच श्रुति[1]" असें असल्यामुळें "रणनात्मक ध्वनी ती श्रुति व अनुरणात्मक ध्वनी तो स्वर" असें संगीतशास्त्रकारांनीं ठरवून श्रुतींची संख्या २२ नियमीत केली आहे. याचें स्पष्टीकरण असें—एक वीणा घेऊन त्यावर २२ तारा लावाव्या त्यांत पहिली तार अति नीच स्वरावर लावून दुसरी त्यापेक्षां थोड्या उंच स्वरावर आणि तिसरी त्याहीपेक्षां उंच, या प्रमाणें २२ तारा लावाव्या. परंतु अशा रीतीनें कीं, कोणत्याही दोन तारांच्या मधें तिसरा ध्वनी साधारणपणें स्पष्ट होऊं नये व हे दोन स्वर तर स्पष्ट व भिन्न ऐकूं यावेत. यांपैकीं चवथ्या तारेवर षड्ज स्पष्ट ऐकूं येईल, सातवीवर ऋषभ, नववीवर गांधार, तेरावीवर मध्यम, सतरावीवर पंचम, विसावीवर धैवत आणि बाविसावीवर निषाद स्पष्ट ऐकूं येईल. याप्रमाणें प्रत्येक स्वराच्या अनुक्रमें ४, ३, २, ४, ४, ३, २ श्रुति होतात[2].

या प्रत्येक श्रुतीच्या श्रवणानें अंतःकरणावर तीव्रता, कोमलता, उद्दीपन, आनंद, कारुण्य वगैरे अनेक परिणाम होतात. त्यावरून त्यांच्या जाति ठरवून त्यांचा नऊ रसामध्यें अंतर्भाव केला आहे.

---

१ ॥ श्रवणेन्द्रियग्राह्यत्वाद्ध्वनिरेव श्रुतिर्भवेत् ॥
२ नादलहरी.

## जातीपरत्वें श्रुतींचीं नांवें वगैरे—

| | श्रुतींच्या जाति. | श्रुतिसंख्या. | श्रुतींचीं नांवें. | रस. |
|---|---|---|---|---|
| १ | दीप्ता. | ४ | तीव्रा, रौद्री, वज्रिका, उग्रा. | वीर, अद्भुत, रौद्र. |
| २ | आयता. | ५ | कुमुद्वती, क्रोधा, प्रसारिणी, संदीपनी, रोहिणी. | हास्य. |
| ३ | करुणा. | ३ | दयावती, आलापिनी, मदंती. | करुण, बिभत्स, भयानक. |
| ४ | मृदु. | ४ | मंदा, रतिका, प्रीति, क्षिति. | शृंगार. |
| ५ | मध्या. | ६ | छंदोवती, रंजनी, मार्जनी, रक्ता, रम्या, क्षोभिणी. | हास्य, शृंगार. |

## स्वरांच्या श्रुति, त्यांची संख्या व नांवें वगैरे*—

| स्वर. | श्रुति-संख्या. | श्रुतींचीं नांवें. |
|---|---|---|
| षड्ज | ४ | तीव्रा, कुमुद्वती, मंदा, छंदोवती. |
| ऋषभ | ३ | दयावती, रंजनी, रतिका. |
| गांधार | २ | रौद्री, क्रोधा. |
| मध्यम | ४ | वज्रिका, प्रसारिणी, प्रीति, मार्जनी. |
| पंचम | ४ | क्षिति, रक्ता, संदीपनी, आलापिनी. |
| धैवत | ३ | मदंती, रोहिणी, रम्या. |
| निषाद | २ | उग्रा, क्षोभिणी. |

* वरील श्रुति व पाश्चिमात्य श्रुति यांची तुलना—

| | आपले स्वर व त्यांचीं संक्षिप्त नांवें. | | पाश्चिमात्य स्वर व त्यांचीं सांक्षिप्त नांवें. | | पाश्चिमात्य श्रुति. | आर्य श्रुति. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | षडज | सा | Do | C | ५·३ | ४ |
| २ | ऋषभ | री | Re | D | १·१६ | ३ |
| ३ | गांधार | ग | Mi | E | २·३ | २ |
| ४ | मध्यम | म | Fa | F | ३·९ | ४ |
| ५ | पंचम | प | Sol | G | ३·१२ | ४ |
| ६ | धैवत | ध | La | A | ३ १२ | ३ |
| ७ | निषाद | नी | Si | B | १·५ | २ |

## श्रुति, स्वर व ग्राम यांचें कोष्टक.

| | श्रुतींचीं नांवें.* | स्वर | मंद्रसप्तकांतील श्रुति.† | मध्यसप्तकांतील श्रुति.† | तारसप्तकांतील श्रुति.† |
|---|---|---|---|---|---|
| १ | तीव्रा | | मन्द्रा | नादान्ता | ईश्वरी |
| २ | कुमुद्वती | | अतिमंद्रा | निष्कला | कौमारी |
| ३ | मंदा | | घोरा | गूढा | सवराली |
| ४ | छन्दोवती | सा | घोरतरा | सकला | भोगवीर्या |
| ५ | दयावती | | मण्डना | मधुरा | मनोरमा |
| ६ | रंजनी | | सौम्या | गली | सुस्निग्धा |
| ७ | रतिका | री | सुमना | एकाक्षरा | दिव्यांगा |
| ८ | रौद्री | | पुष्करा | भृंगजा | सुललिता |
| ९ | क्रोधा | ग | शंखिनी | रसगीती | विद्रुमा |
| १० | वज्रिका | | नीला | सुरंजिका | महार्का |
| ११ | प्रसारिणी | | उत्पला | पूर्णा | शंखिनी |
| १२ | प्रीति | | अनुनासिका | अलंकारिणी | राका |
| १३ | मार्जनी | म | घोषवती | वांशिका | लज्जा |
| १४ | क्षिति | | नीलनादा | वैणिका | काली |
| १५ | रक्ता | | आवर्त्ता | त्रिस्थाना | सूक्ष्मा |
| १६ | सन्दीपनी | | रणदा | सुस्वरा | अतिसूक्ष्मा |
| १७ | आलापिनी | प | गंभीरा | सौम्या | पुष्टा |
| १८ | मदन्ती | | दीर्घतरा | भाषांगी | सुपुष्टिका |
| १९ | रोहिणी | | नादिनी | वार्तिका | विष्पटा |
| २० | रम्या | ध | मन्द्रजा | संपूर्णा | कराली |
| २१ | उग्रा | | सुप्रसन्ना | प्रसन्ना | विस्फुटा |
| २२ | क्षोभिणी | नी | निनदा | सर्वव्यापिनिका | भेदिनी |

* हीं नांवें नारदानें दिलीं आहेत.

† तीन सप्तकांतील एकंदर ६६ श्रुतींचीं निरनिराळीं नांवें पार्श्वदेवानें आपल्या " संगीत समय-सारांत " दिलीं आहेत.

## विकृतस्वर[1]

वर जे श्रुतिरूपानें स्वरांचे विभाग सांगितले आहेत ते फार सूक्ष्म असल्यामुळें एका स्वराच्या श्रुतींचें दुसऱ्या स्वराच्या श्रुतींशीं मिश्रण होऊन त्यापासून जे मिश्र स्वर उत्पन्न होतात त्यांस विकृतस्वर म्हणतात.

साधारणपणें २२ श्रुतींपैकीं सप्तस्वर हे शुद्धस्वर व त्यांशिवाय बाकीच्या मिश्र श्रुति हे विकृत स्वर असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शुद्धस्वर जर मागच्या श्रुतीवर जाईल तर त्याचें स्वरूप **कोमल** होईल, तसेंच पुढच्या स्वरावर गेल्यास **तीव्र** होईल. जसें, सातव्या ( रतिका ) श्रुतीवर **ऋषभ** स्पष्ट होतो तो जर मागें म्हणजे रंजनीवर जाईल तर तो **कोमलऋषभ** होईल व दयावतीवर **अतिकोमल** होईल. तसेंच नवव्या ( क्रोधा ) श्रुतीवर **गांधार** स्पष्ट होतो. तो दहाव्या ( वज्रिका ) श्रुतीवर **तीव्र**, अकराव्या ( प्रसारिणी ) श्रुतीवर **तीव्रतर** व बाराव्या ( प्रीति ) श्रुतीवर **तीव्रतम गांधार** होईल.[2]

स्वरांचे इतर पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ वगैरे खालीं दिला आहेः—

**शुद्ध, कोमल,** व **तीव्र** स्वरांची माहिती मागें दिलीच आहे.

**अतिकोमल** स्वर=कोमल स्वरापेक्षां जो मधुर व नीच स्वर त्यास अतिकोमल स्वर म्हणतात.

**शृंगारिक** स्वर=अतिकोमल स्वरापेक्षां मधुर स्वर.

**तीव्रतर**=तीव्र स्वरापेक्षां उंच स्वर.

**तीव्रतम**=तीव्रतर स्वरापेक्षां उंच स्वर. याचा खुलासा येणें प्रमाणेंः—

| |
|---|
| शृंगारिक. |
| अतिकोमल. |
| कोमल. |
| शुद्ध. |
| तीव्र. |
| तीव्रतर. |
| तीव्रतम. |

---

1 Modified notes. २ विकारी व अविकारी स्वर पहा.

**उदात्त**=उंचस्वर ( नी-ग. ).

**अनुदात्त**=नीचस्वर ( री-ध. ).

**स्वरित**=मध्यमस्वर ( सा-म-प. ).

**कल**=मधुर व अस्फुटस्वर.

**काकली**=कलस्वरापेक्षां मधुरस्वर.

**प्रधानस्वर**=कोणत्याही रागांत जो स्वर वारंवार घेण्यांत येतो व ज्यावर त्या रागाची छाया दाखविण्याचा आधार असतो त्या स्वरास **प्रधान**स्वर म्हणतात.

**ग्रह**=कोणत्याही रागाचा ज्या स्वरापासून आरंभ होतो त्या स्वरास **ग्रह** म्हणतात. यास **पकड** असेंही म्हणतात.

**न्यास**=कोणत्याही रागाचा ज्या स्वरावर शेवट होतो म्हणजे ज्या स्वरावर येऊन थांबलें असतां त्या रागाची समाप्ति होते त्या स्वरास **न्यास** म्हणतात. त्यास **अटक** असेंही म्हणतात.

**अंशस्वर**=कोणत्याही रागांत जो मधुरस्वर वारंवार घेण्यांत येतो अथवा ज्या एका विशिष्ट स्वरावर थांवण्यांत येतें त्या स्वरास **अंशस्वर** म्हणतात. हा **न्यास** नव्हे कारण या स्वरावर रागाची समाप्ति होत नाहीं.

**सूर**=प्रथमस्वर जो षड्ज त्याला **सूर** म्हणतात. हा स्वर प्रत्येक रागाचा मूळ पाया आहे. सप्तस्वरांपैकीं कोणताही स्वर **सूर** होऊं शकतो म्हणजे कोणत्याही स्वरास सूर[३] ( षड्ज ) समजून तेथून आरोहास अगर गाण्यास आरंभ करण्यास हरकत नाहीं.[४]

निरनिराळ्या प्रकारचे राग रचितां यावे व त्यांचें एकमेकांपासून भिन्नत्व कळावें म्हणून सप्तस्वरांमध्यें चार भेद केले आहेत. त्यांना **वादी, संवादी, अनुवादी** व **विवादी** स्वर म्हणतात. यांना अनुक्रमें **राजा, प्रधान, सेवक** व **शत्रु** असेंही म्हणतात.

१ **वादी**=हा प्रधानस्वर होय. यावर रागाचें स्वरूप दाखविण्याचा आधार असतो.

---

१ राग भैरव पहा.

२ राग भैरव पहा.

३ Key-note. "A singer may start with any keynote and the succeeding notes will be affected accordingly."—*H. Music.*

४ सप्तक व ग्राम पहा.

**२ संवादी**—ज्या दोन स्वरांमध्यें १२ किंवा ८ श्रुतींचें अंतर असेल किंवा जे समश्रुतिक असतील ते परस्पर संवादीस्वर होत. जसें, षड्ज व पंचम यांच्यामध्यें १२ श्रुतींचें अंतर असून दोन्ही समश्रुतिक ( ४।४ श्रुतींचे ) स्वर आहेत म्हणून पंचम हा षड्जाचा संवादी स्वर होय. रागाची छाया दर्शविणाऱ्या सहायकारी स्वरांमध्यें हा मुख्यस्वर आहे.

**३ विवादी**—ज्या दोन स्वरांच्या श्रुतिसंख्येंत एकाचें अंतर असेल ते स्वर. जसें, ऋषभाच्या ३ श्रुति व गांधाराच्या २ श्रुति असल्यामुळें ऋषभस्वराचा विवादी-स्वर गांधार होय. यास **वर्ज्यस्वर**ही म्हणतात. एखाद्या रागांत कांहीं स्वर वर्ज्य असतात म्हणजे ते त्या रागांत येत नाहींत आणि आलेच तर ते त्या रागाचें मूळचें स्वरूप अगदीं बदलून टाकतात म्हणून त्यास **शत्रु** म्हणतात. जसें, मालकंस रागांत ऋषभ व पंचम स्वर वर्ज्य आहेत, म्हणून ते त्या रागांत येणार नाहींत आणि आलेच तर मालकंसाचें खरें स्वरूप बदलून जाईल.

**४ अनुवादी**—संवादी व विवादी स्वरांशिवाय जे इतर स्वर ते अनुवादी किंवा ज्या दोन स्वरांमध्यें एक श्रुतीचें अंतर नसेल ते स्वर. जसें, षड्जाचे ऋषभ व गांधार वगैरे अनुवादी स्वर होत. हा स्वर रागामध्यें साधारण सहायकारी स्वर आहे. राग परिपूर्ण होण्यास संवादी व अनुवादी स्वरांची फार अवश्यकता आहे.

सप्तस्वरांच्या परस्परसंबंधाचें स्पष्टीकरण असें—

| **वादी.** | **संवादी.** | **अनुवादी.** | **विवादी.** |
|---|---|---|---|
| षड्ज | प-म | री-ग-ध-नी | ० |
| ऋषभ | ध | स-म-प-नी | ग |
| गांधार | नी | स-म-प-ध | री |
| मध्यम | सा | री-ग-प-ध-नी | ० |
| पंचम | सा | री-ग-म-ध-नी | ० |
| धैवत | री | स-ग-म-प | नी |
| निषाद | ग | स-री-म-प | ध |

सप्तस्वरांचें पशुपक्ष्यांच्या आवाजाशीं साम्य दाखविलें आहे. कोणताही पशु अथवा पक्षी नेहमीं स्वाभाविकपणें कोणत्या स्वरांत शब्द करितो ते पुढें दिलें आहे.

| स्वर. | | पशुपक्ष्यांचा ध्वनी. |
|---|---|---|
| षड्ज | — | मोर. |
| ऋषभ | — | गाय अथवा चातक पक्षी. |
| गांधार | — | मेंढरूं. |
| मध्यम | — | क्रौंच अथवा कलिंगपक्षी. |
| पंचम | — | कोकिला. |
| धैवत | — | घोडा अथवा बेडूक. |
| निषाद | — | हत्ती. |

सप्तस्वरांपैकीं प्रत्येक स्वर वयाच्या कितवे वर्षी स्पष्ट व पूर्णपणें उच्चारितां येतो[2] याविषयीं पुढें लिहिल्याप्रमाणें सांगितलें आहे.

| स्वर. | | वयवर्ष. |
|---|---|---|
| षड्ज | — | ऐशीं. |
| ऋषभ | — | सत्तर. |
| गांधार | — | साठ. |
| मध्यम | — | चाळीस. |
| पंचम | — | तीस. |
| धैवत | — | वीस. |
| निषाद | — | दहा. |

सप्तस्वरांच्या शृंगारस्वरूपाचें वर्णन कोष्टक रूपानें पुढें दिलें आहे.

---

१ ॥ षड्जं वदेन्मयूरोहि ऋषभं चातको वदेत् ॥
॥ अजा वदति गांधारं क्रौंचो वदति मध्यमं ॥
॥ पुष्पसाधारणे काले कोकिलः पंचमं वदेत् ॥
॥ दर्दुरो धैवतं चैव निषादं च वदेद्गजः ॥ नारद.

॥ अशीतिः सप्ततिः षष्टिश्चत्वारिंशच्चत्रिंशतिः ॥
॥ विंशतिर्दशवर्षाणि षड्जादीनां वयः क्रमात् ॥

| स्वर. | स्थान (द्वीप) | वंश. | जाति. | वर्ण. | देवता. | गोत्र | ऋषि. | छंद. | उत्पत्ति. | रस | पुत्र (राग.) | वार. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| षड्ज | जंबु | देव | ब्राह्मण | रक्त | वन्हि | अग्निवेश्य | अग्नि | अनुष्टुप् | नाभी | अद्भुत, रुद्र, वीर | भैरव | रवि |
| ऋषभ | शाक | ऋषि | क्षत्रिय | पीत | ब्रम्हा | काश्यप | ब्रम्हा | गायत्री | हृदय | अद्भुत, रुद्र, वीर | करनाट | सोम |
| गांधार | कुश | देव | वैश्य | सुवर्ण | शशी | गौतम | मृगांक | त्रिष्टुप् | वक्षस्थळ | करुण, | हिंदोल | मंगळ |
| मध्यम | क्रौंच | देव | ब्राह्मण | श्वेत | विष्णु | आंगिरस | लक्ष्मीपति | बृहति | कंठ | हास्य, शृंगार | वसंत | बुध |
| पंचम | शाल्म | पितृ | ब्राह्मण | शाम | नारद | भार्गव | नारद | पंक्ति | मुख | हास्य, शृंगार | मल्हार | गुरु |
| धैवत | श्वेत | ऋषि | क्षत्रिय | पीत | तुंबर | कौशिक | तुंबर | उष्णिक | तालु | भयानक, बीभत्स | श्री | शुक्र |
| निषाद | पुष्कर | असुर | वैश्य | विचित्र | तुंबर | वशिष्ठ | धनद | जगती | नासिक | करुण. | श्री | शनी |

# प्रकरण तिसरें.

## रागविचार[1].

॥ योऽयं ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः ॥
॥ रंजको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः ॥

श्रवणें करून मनास द्रव उत्पन्न करणारी जी सप्तस्वरांची विशिष्ट रचना व जिचा ध्वनी कानीं पडतांच मनरूपी नेत्रासमोर जो चित्ताकर्षक आभास होतो अथवा जी मनोरंजक छाया पडते तिला **राग** म्हणतात.

प्रत्येक रागांत सप्तस्वर आले पाहिजेत असा नियम नाहीं. कित्येक रागांत एक अथवा अधिक स्वर वर्ज्य असतात. परंतु आदिस्वर जो षड्ज हा कोणत्याही रागांत वर्ज्य होत नाहीं. बाकीचे सर्व स्वर वर्ज्य होऊं शकतात. या वर्ज्यावर्ज्य स्वरामुळें रागांच्या **षाडव, ओडव** आणि **संपूर्ण** अशा तीन जाती झाल्या आहेत.

**षाडव**–ज्या रागांत सप्तस्वरांपैकीं एक स्वर वर्ज्य असतो त्याला षाडवजातीचा राग म्हणतात. या जातीच्या रागांत सप्तस्वरांपैकीं फक्त सहा स्वर येतात. जसें, राग मारवा. या रागांत पंचम स्वर वर्ज्य आहे.

**ओडव**–ज्या रागांत सप्तस्वरांपैकीं दोन स्वर वर्ज्य असतात त्याला ओडवराग म्हणतात. हे पांच स्वरांचे राग होत. जसें, राग सारंग. यांत गांधार व धैवत हे दोन स्वर वर्ज्य आहेत.

**संपूर्ण**–या जातीचे राग सात स्वरांचे असतात म्हणजे यांत कोणताही स्वर वर्ज्य नसतो. जसें, राग भैरव.

रागांच्या स्वरूपांवरून त्यांच्या मुख्य तीन जाती झाल्या आहेत. **शुद्ध, सालंग** ( अथवा छायालग ), आणि **संकीर्ण**.

१ **शुद्ध**–हा दोन प्रकारचा आहे. **महाशुद्ध** व **शुद्ध**.

---

१ ॥ सामवेदात् स्वरा जाताः स्वरेभ्यो ग्रामसंभवः ॥
॥ ग्रामेभ्यो जातयो जाता जातिभ्यो रागसंभवः ॥ १ ॥
॥ सप्तस्वरास्त्रयो ग्रामा ग्राममूर्च्छनाश्चैकविंशतिः ॥
॥ द्वाविंशतिश्च श्रुतय एतेभ्यो रागसंभवः ॥ २ ॥

१ Air.

H 7/6 आवक १२

(१) **महाशुद्ध**–ज्या रागाचें स्वरूप दुसऱ्या रागाशीं मिळत नाहीं व ज्यामध्यें विकृतस्वर येत नाहींत व ज्यांत दुसऱ्या रागाची छाया मुळींच येत नाहीं तो राग महाशुद्ध होय. जसें, राग सारंग व राग कानडा.

(२) **शुद्ध**–याचें स्वरूप महाशुद्ध रागाप्रमाणेंच आहे. पण यामध्यें विकृत स्वर येतात. जसें, शुद्धतोडी व शुद्धगुर्जरी.

२ **सालंग**–हा दोन प्रकारचा आहे. **शुद्धसालंग** व **सालंग.**

(१) **शुद्धसालंग**–शुद्ध रागांत जेव्हां विकृतस्वर येतात तेव्हां त्याला शुद्धसालंग म्हणतात. जसें, तोडी व गुर्जरी.

(२) **सालंग**–ज्या रागांत दुसऱ्या रागाची छाया येते त्याला सालंग अथवा खरा सालंग म्हणतात. जसें, श्रीराग. यांत गौरी रागिणीची छाया येते.

३ **संकीर्ण**–याचेही दोन प्रकार आहेत. **लघुसंकीर्ण** व **महासंकीर्ण.**

(१) **लघुसंकीर्ण**–ज्या रागाची उत्पत्ती दोन शुद्ध रागांपासून होते व ज्याचे स्वर विस्तृत असतात तो लघुसंकीर्ण होय. जसें, राग भैरव. हा तोडी व कानडा यांपासून उत्पन्न होतो.

(२) **महासंकीर्ण**–याचे तीन पोटभेद आहेत. सुरसा, स्वरसा व सारसा.

१ **सुरसा**–याचे दोन प्रकार आहेत. लघुसुरसा व गुरुसुरसा.

(१) **लघुसुरसा**–हा शुद्ध व सालंग रागांपासून उत्पन्न होतो. जसें, अडाणा. हा राग सोरठ आणि कानडा यांपासून झाला आहे.

(२) **गुरुसुरसा**–हा शुद्ध व संकीर्ण यांपासून उत्पन्न होतो. जसें, भैरवी. ही रागिणी तोडी व रामकली यांपासून झाली आहे.

२ **स्वरसा**–याचेही दोन प्रकार आहेत. लघुस्वरसा आणि गुरुस्वरसा.

(१) **लघुस्वरसा**–हा दोन सालंग रागांपासून उत्पन्न होतो. जसें, राग विषहरा. हा श्रीराग व धनाश्रीपासून झाला आहे.

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र. 4716
वाई जि. सातारा



( २ ) **गुरुस्वरसा**—हा सालंग व संकीर्ण रागांपासून होतो. जसें, राग कल्याण. हा धनाश्री व जेतश्रीपासून झाला आहे.

३ **सारसा**—याचेही दोन प्रकार आहेत. लघुसारसा व गुरुसारसा.

( १ ) **लघुसारसा**—हा दोन संकीर्ण रागांपासून व क्वचित् दोन संकीर्ण व एक शुद्ध राग यांपासून उत्पन्न होतो. जसें, राग पंचम. हा हिंदोल व वसंत यांपासून झाला आहे.

( २ ) **गुरुसारसा**—हा शुद्ध, सालंग व संकीर्ण या तीन जातींच्या रागांपासून उत्पन्न होतो. जसें, राग हिंदोल. हा लीलावती, ललत व भैरव या तीन रागांपासून झाला आहे.

मुख्य राग सहा आहेत. तसेंच वर्षाचे ऋतुही सहा आहेत. कोणत्या ऋतूंत कोणता राग गाणें उचित आहे त्याचें कोष्टकः—

| राग. | हिंदोल | दीपक | मेघ | भैरव | श्री | मालकंस |
|---|---|---|---|---|---|---|
| ऋतु. | वसंत | ग्रीष्म | वर्षा | शरद् | हेमंत | शिशिर |

प्रत्येक रागाच्या पांच रागिण्या, आठ उपराग व आठ उपरागिण्या असे पोट भेद आहेत. रागांस पुरुष, रागिण्यांस त्यांच्या स्त्रिया, उपरागांस त्यांचे पुत्र व उपरागिण्यांस त्यांच्या स्नुषा अशी अलंकारिक उपमा दिली आहे. याप्रमाणें सहा राग, तीस रागिण्या, ४८ उपराग व ४८ उपरागिण्या मिळून १३२ मुख्य राग होतात. या शिवाय आणखी अनेक राग व रागिण्या आहेत. रागांचीं नांवें व त्यांचे पोटभेद याविषयीं बराच मतभेद आढळून येतो. पुढें दिलेलें कोष्टक बहुमतानें तयार केलें आहे.

---

१ प्रकरण पांचवें पहा.

२ उपरागांत कांहीं नांवें पुनः आलीं आहेत.

| भैरव. | | | मालकंस. | | | हिंदोल. | | | दीपक. | | | श्री. | | | मेघ. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रागिण्या | उपराग | उपरागिण्या | रागिण्या | उपराग | उपरागिण्या | रागिण्या | उपराग | उपरागिण्या | रागिण्या | उपराग | उपरागिण्या | रागिण्या | उपराग | उपरागिण्या | रागिण्या | उपराग | उपरागिण्या |
| भैरवी | हर्ष | बिलावली | ककुभ | मारू | धनाश्री | पटमंजरी | मंगल | पार्वती | कमोदी | कलिंग | जयजयवंती | मालश्री | सिंधु | सरस्वती | देशकारी | गजधर | मांढ |
| वैराटी | तिलक | सोहा | खंबावती | मेवाडा | जेतश्री | बिलावली | शोभा | पूर्वी | देशी | कुंतल | मंगलगूजरी | धनाश्री | मालव | विजया | भूपाली | गंधार | कन्नडनट |
| मधुमाधवी | पूरिया | कुंभारी | गुणकली | प्रबल | कामोदी | ललिता | विभास | चैती | कानडी | कमल | मनोहरा | मालवी | गौड | कुंभी | गुर्जरी | जालंधर | कदंबनट |
| सिंधवी | माधव | फलगूजरी | गौरी | बडहंस | गंधारी | देशाख्य | विनोद | सरस्वती | केदारी | कुसुम | अहीरी | असावरी | कुंभ | सिरो | मल्हारी | सारंग | गौरी |
| बंगाली | सोहु | पटमंजरी | तोडी | भ्रमर | सुघराई | रामकली | गौरा | देवगिरी | नट | चंपक | यमन | वसंती | गुणसागर | सोहनी | टंकल | नटनारायण | बिहारी |
| | बलनेह | सोरठी | | चंद्रक | दुर्गा | | प्रधान | तरुणी | | राम | हमीर | | गंभीर | क्षेम | | शहाना | परज |
| | मधु | अनदाही | | खोकर | भीमपलासी | | चंद्रबिंब | केरवी | | लहल | मालगूजरी | | संकर | सहस्रशीर्षा | | कल्याण | नटमंजरी |
| | पंचम | भैरवी | | नंद | मालश्री | | आनंद | लीलावती | | हिमाल | भोपाली | | विहागडा | ध्यानजी | | शंकराभरण | शुद्धनट |

वर सांगितलेल्या रागांपैकीं सहा राग व तीस रागिण्या यांची सविस्तर माहिती यापुढें दिली आहे. त्याचा उपक्रम असा आहे कीं प्रथम प्रत्येक रागाचें श्रृंगारस्वरूप देऊन नंतर त्यांतील वर्ज्यावर्ज्य व कोमलतीव्रादि स्वरांची माहिती दिली आहे. त्या नंतर बहुतेक रागांची ( त्यांच्या स्वरविस्तारासह ) एकएक चीज दिली आहे. राग गाण्याचा समय व ऋतुही दिला आहे.

## १ रागभैरव.

**शृंगारस्वरूप**[1]–याचें स्वरूप शंकराच्या स्वरूपासारखें आहे. शरीर भव्य व विभूतिचर्चित, वस्त्र शुभ्र, मस्तकीं जटा, व हातीं त्रिशूल असून नदीचे तटाकीं वास्तव्य केलें आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. गांधार **ग्रह** व धैवत **न्यास** आहे. मध्यम **अंशस्वर** आहे. धैवत **प्रधानस्वर** असून त्यावरच **मूर्च्छना** आहे.

### स्वरविस्तार–धृपद.

॥ ग-म-नी-ध-प-ध, म-ग-री, ग-प-म-ग-री, ग-प-म-ग-री-सा, ध-सा-नी-सा, ध सा, नी-ध, नी-प-ध-ध-म-ग, प-म, ध-नी, ध-नी-ध-प ॥

### ॥ राग भैरव–चौताल. ॥

॥ सघन घन छा[2]यो द्रुमवेली मध्यभूवन, अति प्रकाश बरन बरन पुष्परंग लायो ॥
॥ सघन० ॥ कोकिला खंजन कीर कपोत हय् आनंदकारी, चौंठोर झर बरसायो ॥
॥ सघन० ॥ सप्तसूर तीन ग्राम यक्कीस मूर्च्छनायुक्त जुक्त लाग डाट कर देखायो ॥
॥ तानसेन कहे सुनो शहा अकबर प्रथम राग भैरव गायो ॥ सघन० ॥

**समय**–हा राग शरदृऋतूंत प्रातःकाळीं शांतरसांत गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत. भैरवी, वैराटी, मधुमाधवी, सिंधवी, व बंगाली.

### ( १ ) रागिणी भैरवी.

**शृंगारस्वरूप**–सुंदर, सुकुमार, वर्ण श्याम, वस्त्र श्वेत, कंचुकी रक्तवर्ण, केश मुक्त, कंठीं चंपकपुष्पाचा हार, हातीं शिरसपुष्प व वीणा धारण केला आहे व पर्वताचे कड्यावर बसून शंकराचें ध्यानपूर्वक गायन करीत आहे.

---

१ स्वरूप, अलंकार, समय व रस इत्यादिकांच्या नियमानुसार बनविलेली एखाद्या रागाची चीज गाइली असतां जी आकृति उत्पन्न होते ती त्या रागाचें श्रृंगारस्वरूप होय. विचाराला आकार आहे, त्यालाच विचाराकृती ( Thought forms ) म्हणतात. या आकृती दिव्यदृष्टी ( clairvoyance ) असणाराला तर प्रत्यक्ष दिसतातच, पण यंत्राच्या सहाय्यानें या आकृतींचे फोटोग्राफसुद्धां घेतां येतात, असें हल्लीं युरोपांत चालू असलेल्या प्रयोगावरूनही सिद्ध होतें.

२ "छा" या अक्षरावर सम आहे.

**जाति**—संपूर्ण. मध्यम शुद्ध व बाकीचे स्वर कोमल आहेत. मध्यम किंवा धैवत प्रधान-स्वर आहे. गांधार ग्रह व धैवत न्यास आहे. कित्येकांच्या मतें ऋषभ ग्रह व मध्यम न्यास आहे. गांधार, मध्यम व धैवत यांजवर मूर्च्छना आहे. धैवत अंशस्वर आहे. मध्यम अंशस्वर केल्यास सिंधभैरवी होते. या रागिणीची उत्पत्ति गांधार ग्रामापासून आहे. फक्त हीच रागिणी गांधारग्रामाचा नमुना आहे. या रागिणींतील गांधार स्वराच्या कोमलतेकडे लक्ष दिलें असतां टोडीचा भास होतो. पण टोडीमध्यें मध्यम तीव्र आहे व या रागिणींत शुद्ध आहे. तसेंच टोडीमध्यें दोन्ही निषाद येतात व या रागिणींत फक्त कोमल निषाद येतो.

### ॥ भैरवी-चौताल. ॥

॥ चं[1]चल चपलनार चंदन चढायो अंग, कंचनकी चौकीपर चंद्रमासी ठारी हय् ॥ चंचल० ॥ छोटी छोटी छतियनपर रोम रोम रेख रही, त्रिवेणीके संग मानु रती सुख पायो हय् ॥ चं० ॥ सीसफूल सीर सोहे कजरा सब नय्ननमो, ऊरपर हार मोतियन गंगा सीर धरी हय् ॥ कहे मिया तानसेन बरन न जात छबी, हेम रस मारचली घुंगटकी घोडी हय् ॥ चंचल० ॥

या रागिणीचे मुख्य उपराग हर्ष व तिलक होत.

**समय**—शरद्‌ऋतु. प्रातःकाल.

## ( २ ) रागिणी वैराटी.

**शृंगारस्वरूप**—अप्सरेप्रमाणें. केश कुरळे असून मुक्त, वस्त्र श्वेत, सर्वांगावर पारिजातकपुष्पांचे अलंकार धारण केले असून पतीसह अभिनययुक्त क्रीडा करण्यांत निमग्न झाली आहे.

**जाति**—संपूर्ण. निषाद कोमल असून बाकीचे स्वर शुद्ध आहेत. या रागिणींत बिभास रागाचा भास होतो.

मुख्य उपराग—माधव.

**समय**—संध्याकाल.

### ॥ वैराटी—धृपद. ॥

॥ यमुनातीरीं रुक्मिणीवल्लभ वेणु वाजवी मंजुल, नादें सुरवर मुनी किन्नर मोहिले नारद तुंबर, गोविंद पूर्ण कृपाल ॥ य० ॥ मधुर ध्वनी वाजवुनी अस्थिर जाहली यमुनाजीवन दीन श्यामचरणीं गीतछंद परिसुनिया, सानी सानी सासारीमगमपम मपमप पम मपपपप धनीसा, गोविंद पूर्ण कृपाल ॥ य० ॥

---

१ "चं" या अक्षरावर सम आहे.

## ( ३ ) रागिणी मधुमाधवी.

**शृंगारस्वरूप**–सुकुमार, सुंदर, कांती सतेजश्यामवर्ण, वस्त्र पिंवळें, नेत्रीं कज्जल धारण केलें आहे, सर्वांगास केशराची उटी लाविली असून पतीसह विलास करण्यांत निमग्न झाली आहे.

**जाति**–ओडव. गांधार व धैवत वर्ज्य. निषाद कोमल व न्यास आहे. मध्यम व निषाद प्रधानस्वर आहेत. या रागिणीचें व वृंदावनीसारंगाचें स्वरूप बहुतेक सारखें आहे.

॥ **मधुमाधवी**–त्रिताल* ॥

नी[1] नी सारेसा नी सारेमपनी नी पम रिम रिमप नी नी सारे सानीपम रे सा नी पांचो मिलाय ॥ नी० ॥ गंधार धैवत बिना, लेहो लाग ओडव, आदितराम उंनचास कोटी तान सो, श्री ब्रजपति, लेहो रिझाय ॥ नी० ॥

**समय**–ग्रीष्म व शरदृतूंत प्रातःकाळीं अगर दोनप्रहरीं वीर व शृंगाररसांत गातात.

## ( ४ ) रागिणी सिंधवी.

**शृंगारस्वरूप**–सुंदर परंतु भव्य आणि क्रोधयुक्त, वस्त्र लाल, कर्णीचे ठायीं पुष्पांचे अलंकार घातले आहेत, एका हातीं त्रिशूल व दुसरे हातीं जपमाळ धारण केली असून पतीच्या भेटीविषयीं आतुर होत्साती शंकराचें ध्यान करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. आरोहांत तीव्र व अवरोहांत कोमल निषाद घेतात. मध्यम ग्रह व प्रधानस्वर आहे. कित्येकांच्या मतें धैवत प्रधानस्वर आहे.

॥ **सिंधवी**[2]–नागताल ॥

॥ पपधा मग मप नी[3] धा प नी नीसा पनी पध मप मगारि रेसा सारे मप धसा रेसा नी धप ॥ धा मग मपनी ॥ नित उठि नित उठि जपूंरी तेरो नाम प्यारी आदित उदित राधे राधे ॥ धा मग मपनी ॥

**समय**–ग्रीष्मऋतूंत दिवसास तिसरे प्रहरीं वीररसांत गातात.

मुख्य उपराग–मधु व बलनेह.

---

* संगीतादित्य.

१ "**नी**"वर **सम** आहे.

२ संगीतादित्य.

३ "नी"वर सम आहे.

## (५) रागिणी बंगाली·[१]

**शृंगारस्वरूप**–भाल विशाल–विभूति व कस्तुरीतिलकयुक्त–हास्य मंद, वेणी वांकडी, सर्वांग चंदनचर्चित, स्वरूप जोगिणीप्रमाणें, मंत्रतंत्रातें जाणणारी, वस्त्र केशरी, डावे हातीं त्रिशूल व उजवे हातीं कमलपुष्प धारण केलें असून लतामंडपाखालीं बसली आहे.

**जाति**–ओडव. ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. मध्यम दोन्ही येतात.

**॥ बंगाली**–धृपद ॥

॥ पगा सासासा[२] गम पप मगम पगा सासासा गा पप मग गग पप नी पमगग्गसा ॥ पगा सासासा० ॥ पप नी नी सा सासा गगसा सानी पप आदितराम बंगाली सासा॥ पगा सासासा० ॥

**समय**–ग्रीष्मऋतूंत दिवसास पहिले अथवा चवथे प्रहरीं वीररसांत गातात.

## २ राग मालकंस[३]·

**शृंगारस्वरूप**–याचें स्वरूप विष्णूच्या स्वरूपासारखें आहे, शरीर भव्य व श्यामवर्ण, वय तरुण, चतुर, हास्यविनोदी, शृंगारप्रिय, वस्त्र पिंवळें, मस्तकीं सुवर्णाचा मुकुट, कंठीं मौक्तिकहार व हातीं गुलछब्बूचें ( निशागंध ) पुष्प धारण केलें असून स्त्रियांसह अनेक प्रकारच्या क्रीडा व विलास करीत आहे.

**जाति**–ओडव. ऋषभ व पंचम वर्ज्य असून बाकीचे स्वर कोमल आहेत. गांधार अगर मध्यम ग्रह व धैवत न्यास आहे. यांत धैवत व निषाद हे स्वर मारु रागाचे आहेत. कित्येकांच्या मतें हा राग संपूर्ण जातीचा आहे व ऋषभ कोमल आहे. पण कोमल ऋषभ व कोमल गांधार यांचें स्वरूप पाहिलें असतां कानड्याचा भास होतो. म्हणून ऋषभ व पंचम वर्ज्य केले पाहिजेत म्हणजे शुद्ध मालकंस होईल.

**॥ स्वरविस्तार**–धृपद ॥

॥ सा–नी, ध–नी–ध–म–ध–सा–नी–सा, ग–नी–सा–नी–ध–सा–नी–म–ग–म–ग–म–ग–सा–नी–ध, सा–सा–सा–नी–सा–नी–सा–नी–ध–म–ग–सा–नी–सा–ग–म. ॥

**॥ राग मालकंस**–धृपद ॥

॥ तेरी गत अपोर मोसे बरन न जात, निरंजन नारायन ॥ तेरी० ॥ तूही चांद तूही सूरज तूही पवन तूही पानी, तूही उरगन तूही नारायन ॥ तेरी० ॥ तूही ब्रह्मा

---

१ संगीतादित्य·

२ "सा" वर सम आहे.

३ यास मालकोश अथवा कौशिकही म्हणतात.

४ "पा" या अक्षरावर सम आहे.

तूही बिश्नु तूही अगम तूही निगम, तूही सुजतपरायन ॥ तानसेन कहे प्रभू तूही-कीधावन, सुमर सुमर भये परायन ॥ तेरी० ॥

**समय**–शिशिरऋतूंत उत्तर रात्रीं वीररसांत गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत. तोडी, गोडी, गुणकली, खंबावती व ककुभ.

## ( १ ) रागिणी तोडी ( टोडी ).

**शृंगारस्वरूप**–कुमारी, हास्य मंद व कटाक्षयुक्त, वर्ण गौर, वस्त्र श्वेत, कंचुकी श्याम, अंगास कर्पुर व केशर यांची उटी लाविली आहे, उपवनाचे ठायीं लतामंडपाखालीं बसली आहे, रुद्रविणा वाजवून गायन करीत आहे, समोर गायनाच्या माधुर्यानें लुब्ध होऊन मृग तटस्थ झाले आहेत.

**जाति**–संपूर्ण. मध्यम तीव्र व बाकीचे स्वर कोमल आहेत. आरोहांत शुद्ध व अवरोहात कोमल निषाद घेतात. गांधार प्रधानस्वर आहे. गांधारापासून धैवता-पर्यंत ग्रह[१] व न्यास आहे. गांधार व मध्यम अंशस्वर आहेत. या रागिणींत गांधार हा "समा"चा स्वर आहे म्हणून ज्या भैरवीमध्यें गांधारावर सम असतो त्या भैरवीला तोडीभैरवी म्हणतात.

### ॥ टोडी–धृपद. ॥

॥ शुभकर चं[२]द्रवदनी मृगलोचनी, हंसगमनी चली पूजन महादेव ॥ शुभ० ॥ करलिये अग्रथाल फुलनको गुथे हार एकपाये पूजा करे संग ज्युगतसे ॥ कहत मिया तानसेन सुनो महादेव, दीजे मोकु ग्यान अटल दान ॥ शुभ० ॥

**समय**–शरद् व हेमंतऋतूंत पहिल्या व दुसऱ्या प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–मारू व मेवाड.

## ( १ ) रागिणी गोडी ( गौरी ).

**शृंगारस्वरूप**–ज्ञातयौवना. वर्ण श्याम, स्वर कोकिलेसारिखा, भाषण मिष्ट, वस्त्र श्वेत, कानीं कर्णफूल, हातीं आम्रमंजरी, अभिनय इतका प्रेमभरित कीं किंचित् मद्यपान केल्याचा भास व्हावा, मानसिक श्रमामुळें गात्रें शिथिल होऊन गायन करण्यास जी असमर्थ झालीशी दिसत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम तीव्र. आरोहांत गांधार वर्ज्य असून धैवत प्रधानस्वर आहे. ऋषभापासून धैवतापर्यंत ग्रह व न्यास[३] आहे. पंचमा-

---

१ "मध्यम" ही ग्रह होतो.

२ "चं" या अक्षरावर **सम** आहे.

३ कित्येकांच्यामतें निषाद ग्रह व ऋषभ न्यास आहे.

स्वर थांबून धैवतावरून ऋषभाचा लाग घ्यावा. या रागिणींत कांहींशी सोहिनीची छाया आहे असा भास होतो.

॥ **गोडी**–चौताल ॥

॥ बन्सीधर पीनाकधर, गीरधर गंगाधर नरहरी, नरोत्तम हो हरीहर ॥ बन्सी० ॥ खेडाधर बरखाधर धरनीधर शेषधर, गले[illegible]मालाधर हो शिवशंकर ॥ बन्सी० ॥ चक्रधर त्रिशुलधर वरूधर शंखधर, [illegible] विभूतधर परमेश्वर ॥ तानसेनको कीजे कृपा ओ जगदोद्धर, हो ओ तुमही विद्याधर ॥ बन्सी० ॥

**समय**–दिवसास चवथे प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–बडहंस.

## ( ३ ) रागिणी गुणकली.

**शृंगारस्वरूप**–विरहिणी. वस्त्र मलीन, केश मुक्त, व शरीर शुष्क असून शृंगारभूषणें अस्ताव्यस्त झालीं आहेत. पतिविरहानें उत्पन्न झालेली उदासीनता व निराशा यांहींकरून कष्टी होत्साती उपवनाचे ठायीं वृक्षाखालीं बसून रूदन करीत आहे. अश्रूंनीं कंचुकी आर्द्र झाली असून हृदय श्वासभरित झालें आहे.

**जाति**–ओडॅव. गांधार व निषाद वर्ज्य. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम शुद्ध.

॥ **गुणकली-धृपद** ॥

॥ बेनी बनी मृगनयनीकी अंग ते कंचन, खंबपर नागन कागन काली ॥ बेनी० ॥ गरहपर कपोत वारू, नयनपर सावग सारू, नासिकापर कीरवारू, दसन चोप उजारी॥ बेनी० ॥

**समय**-शरद्‌ऋतूंत दिवसास पहिले प्रहरीं गातात.

मुख्य उपराग–चंद्रक व भ्रमर.

## ( ४ ) रागिणी खंबावती[3].

**शृंगारस्वरूप**–सुकुमार, मृगाक्षी, हंसगामिनी, लज्जावती, वर्ण गौर, स्वर कोकिलेप्रमाणें, वस्त्र हिरवें, कंचुकी लाल, कंठ अलंकारांनीं सुशोभित, ललाटाचे ठायीं ऊर्ध्व कुंकुमरेषा रेखिली असून आनंदानें नृत्य व गायन करण्यांत तल्लीन झाली आहे.

**जाति**–संपूर्ण. आरोहांत शुद्ध व अवरोहांत कोमल निषाद घेतात. गांधार तीव्र व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. आरोहांत ऋषभ व धैवत येत नाहींत. गांधार ग्रह व प्रधानस्वर आहे. निषाद न्यास[4] आहे.

---

१ "पी" या अक्षरावर **सम** आहे.

२ अन्यमतें जाति षाडव समजून शुद्ध गांधार घ्यावा.

३ स्तंभावती अथवा खमाच.

४ अन्यमतें गांधार किंवा पंचम न्यास आहे.

## ॥ खंबावती–चौताल ॥

॥ प्रथममुनी ओंकार, देवमुनी महादेव, ज्ञानमुनी गोरख बेदमुनी ब्रह्मा ॥ प्रथम० ॥ बिद्यामुनी सरस्वती नदीमुनी गंगा, भक्तमुनी नारद नृत्यमुनी रंभा ॥ प्र० ॥ साजगीतकी संगीतमुनी सूरकी अच्छरमुनी तारीलगंवा ॥ कहे बेजुबावरा सुनोहो गोपाल नायक दीनमुनी सूरज रैनमुनी चंदा ॥ प्रथम० ॥

**समय**–शरदृतूंत दिवसाचे तिसरे प्रहरापासून रात्रींचे तिसरे प्रहरापर्यंत शृंगाररसांत गातात.

मुख्यउपराग–नंद, मीन व द्रग.

## ( ५ ) रागिणी ककुभ ( कोकबा ).

**शृंगारस्वरूप**–विलासिनी. जागरणानें नेत्र आरक्त व जड दिसत आहेत, वस्त्र विगलित, केश व कंचुकीची ग्रंथी मुक्त असून कपोलावर दंतचिन्ह दिसत आहे, कंठींचा पुष्पहार तुटलेला, शृंगारभूषणें अस्ताव्यस्त झालीं असून शरीरावर सुरतचिन्हें दिसत आहेत, श्रमानें गात्रें शिथिल व जड झाल्यामुळें गति मंद झाली असून विनयाचा त्याग करून पतीच्या मुखाकडे टक लावून पहात आहे.

**जाति**–संपूर्ण आहे तथापि धैवत क्वचित् घेतात. निषाद कोमल व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. ऋषभ प्रधानस्वर आहे. आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य आहेत.

## ॥ ककुभ–धृपद ॥

॥ तोहे समजावत हूं पनेहारी ॥ तोहे० ॥ दूधदही माखन बोहोतेरे तेरेतैं लेजात गमारी ॥ तोहे० ॥ नीतउठ देन उरानो आवत, चोरीकीबात तें नाही बिसारी, सुरके प्रभुको बिहा करुंगी, तन मन धन तोपे बलिहारी ॥ तोहे० ॥

**समय**–शरदृतूंत मध्यरात्रीनंतर शृंगाररसांत गातात.

मुख्यउपराग–खोखर व प्रबल.

## ( ३ ) राग हिंदोल.

**शृंगारस्वरूप**–विलासी, आनंदी, वर्ण श्याम, वस्त्र पिंवळें, मस्तकीं मुकुट धारण केला आहे, हिंदोळ्यावर बसून स्त्रियांसह क्रीडा करीत आहे, व मंद आणि गंभीर स्वरानें गायन करीत आहे. याची उत्पत्ति ब्रह्मदेवापासून सांगितली आहे.

**जाति**–ओडव. ऋषभ व पंचम वर्ज्य. मध्यम तीव्र व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. निषाद ग्रह व गांधार न्यास आहे, तसेंच निषाद व गांधार प्रधानस्वर आहेत. आरोहांत निषाद क्वचित् येतो. या रागांतील स्वरांची गति समुद्राच्या गंभीर व मंद गतीनें वहाणाऱ्या तरंगाप्रमाणें आहे.

कित्येकांच्या मतें हा राग संपूर्ण जातीचा असून याची उत्पत्ति भैरव, मालकंस, ललित व बिलावल या रागांपासून झाली आहे. याचा स्वरविस्तार येणें प्रमाणें:—

( ललितबिलावलाचे स्वर ) ध-सा-ध-प-म, ( मालकंस ) ध-सा-नी-ध-सा, ( भैरव ) री-नी-सा-ग-री-सा, ( ललित ) नी-ग-री-सा, ( बिलावल ) ग-प-ध-प, ( भैरवबिलावल ) ग-री-ग-प-म-ग-म-ग-री-सा-ध-म-ग-री-ग-म-री-सा, ( मालकंस ) ध-सा-ध-नी, ( भैरवललित ) री-सा-नी-री-नी-ध-प-ध-प, ( बिलावलभैरव ) ध-प-नी-ध-प-म-ध-ग-म, ( भैरव ) ग-री-सा-नी-री-सा, ( बिलावल ) ग-म-ध-प, ( मालकंस ) ध-सा-नी-ध-सा, ( बिलावल ) ध-म-ग-म-री-सा, ( भैरवललित ) ग-म-ध-नी-प-म.

## ॥ हिंदोल–धृपद ॥

॥ झुलत सखी हिंदोले कारो कहान, बलभद्रजीको भय्या ॥ चंद्रतेज अंग झलके मोर मुगुट लटकन सोभय्या ॥ मोहन छब झपक देख जिया बिरह बान लगय्या ॥ झुलत.॥

**समय**–वसंतऋतूमध्यें दुसेरे अथवा तिसरे प्रहरीं शृंगाररसांत गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत–रामकली, देशाख्य, ललित, बिलावल व पटमंजरी.

## ( १ ) रागिणी रामकली.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गौर, भाल विशाल व कस्तुरीच्या ऊर्ध्व रेषेनें सुशोभित, दृष्टी अभिनय व कटाक्षयुक्त, वस्त्र हिरवें, शृंगारभूषणें धारण करून पतीच्या आगमनाची उत्कंठेनें वाट पहात आहे ( अधिरनायिका ) इतक्यांत तो येतांच त्याच्या अंगावरील सुरतचिन्हें पाहून खिन्न व संतप्त होत्साती गर्वानें त्याचा धिःकार करीत आहे ( रतिखंडिता ).

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल, व गांधार तीव्र आहे, शुद्ध मध्यम ग्रह व धैवत न्यास आहे. आरोहांत गांधार व निषाद वर्ज्य आहेत. अवरोहांत ऋषभ क्वचित् घेतात. धैवत प्रधानस्वर आहे.

कित्येकांच्या मतें ऋषभ व धैवत कोमल, गांधार व निषाद तीव्र, व मध्यम तीव्रतर आहे. आरोहांत मध्यम व निषाद वर्ज्य असून धैवतावर मूर्च्छना आहे.

## ॥ रामकली–झुमरा ॥

॥ कहां जो रहे तुम रात हो नंदसूत ॥ कंहा० ॥ सगरी रय्न मोहे तलपत वीती, तुम जो आये प्रभात, हो नंदसूत ॥ कहां० ॥

**समय**–वसंतऋतूंत पहाटेस करुणरसांत गातात.

मुख्यउपराग–चंद्रबिंब व मंगल.

## ( २ ) रागिणी देशाख्य.

**शृंगारस्वरूप**–आकृति वीराप्रमाणें मर्दानी, वस्त्र श्याम, शरीर मल्लाप्रमाणें पीळदार व भव्य असून विभूतिचर्चित, वाघिणीप्रमाणें क्रुद्ध, नागिणीप्रमाणें चंचल, हातीं नग्न खड्ग धारण केलें आहे, जिला पहातांच शत्रूंच्या मनांत भय उत्पन्न झालें आहे, स्वरूप असें गंभीर कीं जें पहातांच प्रीतीपेक्षां पूज्य बुद्धीच अधिक उत्पन्न व्हावी, पतीचे ठायीं पूर्ण प्रेम ठेवून प्रफुल्लित व उल्हासवृत्तीनें रहाणारी.

**जाति**–संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. आरोहांत गांधार व अवरोहांत धैवत वर्ज्य. गांधार न्यास असून त्यावर मूर्च्छना आहे. कधींकधीं दोन्ही निषाद घेतात.

॥ **देशाख्य**–धृपद ॥

॥ हूंतो अनबोलीरी आली तेरेकहान मोसु ऐसी कीनी ॥ हूंतो० ॥ मथुरा जाय उलट आवतही, बिंद्रावन झक झोरी, रसकी कुसुंबी चोली मसकी ॥ हुंतो० ॥

**समय**–वसंतऋतूंत दिवसा तिसरे प्रहरीं वीररसांत गातात.

**मुख्य उपराग**–शोभा व आनंद.

## ( ३ ) रागिणी ललिता.

**शृंगारस्वरूप**–अनुकूला. वर्ण गौर, वस्त्र केशरी, स्वभाव आनंदी, भाषण शृंगारयुक्त व विनोदी, हास्य मंद, ग्रीवा हंसाप्रमाणें, स्वर कोकिलेप्रमाणें मधुर, चापल्य विद्युल्लतेप्रमाणें, तारुण्यानें प्रफुल्लित, स्वरूप सुंदर असून नेत्राचे ठायीं कज्जल धारण केलें आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम शुद्ध असून प्लुतस्वर आहे. ऋषभ अथवा गांधार ग्रह व धैवत न्यास आहे.

कित्येकांच्या मतें ही रागिणी गौरीपासून उत्पन्न झाली असून षाडव जातीची आहे व पंचम वर्ज्य आहे. ऋषभ व धैवत कोमल असून मध्यम तीव्र आहे. आरोहांत निषाद वर्ज्य आहे. षड्ज ग्रह व शुद्धमध्यम न्यास आहे.

कित्येक ही रागिणी ओडव जातीची समजून ऋषभ व पंचम वर्ज्य करितात. या रागिणीमध्यें गमकांची विशेष खुबी आहे. गमक घेण्याचे गांधार व धैवत हे दोन स्वर मुख्य आहेत.

॥ **ललित**–चौताल ॥

॥ भलेजी भले[1] आये ओ मनभाये लाल, रयन् क्युं न दुलाये ॥ भले० ॥ सब रस दे आये, अधर अंजन धुमावे, कहाना तुम जाये ठगाये ॥ भले० ॥ तुम नही जानत हमही

१ "भ" या अक्षरावर सम आहे.

जानत, धाडो छेल बिछुआं बनाय लाये ॥ तानसेन कहे प्रभु अरुण उदये आये, कहां तुम रयन् गुमाये ॥ भले० ॥

**समय**–वसंतऋतूंत उत्तररात्रीं अथवा दिवसास पहिले प्रहरीं करुणरसांत गातात.

मुख्य उपराग–प्रधान व विनोद.

## ( ४ ) रागिणी बिलावल.

**शृंगारस्वरूप**–अभिसारिका. वर्ण श्याम, वसन लाल, कंचुकी नीलवर्ण, पूर्ण शृंगार करून लतामंडपाखालीं पतीची मार्ग प्रतिक्षा करीत बसली आहे.

**जाति**–संपूर्ण. आरोहांत शुद्ध व अवरोहांत कोमल निषाद येतो. कधींकधीं अवरोहांत दोन्ही निषाद येतात. गांधार तीव्र असून प्रधानस्वर आहे. बाकीचे स्वर शुद्ध आहेत. आरोहांत ऋषभ वर्ज्य आहे. कधींकधीं मध्यम व निषाद हेहीं आरोहांत वर्ज्य होतात.

॥ **बिलावल**–चौताल ॥

॥ मैय्यां ले[1] तोरी लकरी ले तोरी कांवरी बछियां चरावन मैं न जाऊं ॥ मैय्यां० ॥ संगके ग्वाल बलीभद्र क्युं न भेजो, एकलो बनमें डराऊं ॥ मैय्यां० ॥ सघन घनमें कछु खबर नाही परे, संगके ग्वाल सब मोहे डरावे ॥ मैं० ॥ माखन तो बलिभद्रको खिलायो हमको पिलाइ खाटी छाच री ॥ मैं० ॥ बिंद्रावनके मारग जात, पाऊंमें चुबत झीनी कांकरी ॥ मीरा कहे प्रभु गिरधर नागर, चरन कमल तोरी आंखरी ॥ मैय्यां० ॥

**समय**–वसंतऋतूंत दिवसास दुसरे प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–सोहु.

## ( ५ ) रागिणी पटमंजरी.

**शृंगारस्वरूप**–वस्त्र श्वेत, ज्ञातयौवना, विरहिणी, शरीर शुष्क झालें असून शृंगारभूषणाविषयीं जिला अप्रीति उत्पन्न झाली आहे, कंठींचा पुष्पहार सुकून गेला आहे, श्वासानें हृदय उडत आहे, विरहानें उदास व खिन्न होऊन पतीच्या दर्शनाविषयीं आतुर होत्साती त्याचा शोध करीत आहे पण त्याचें लवकर दर्शन होईना म्हणून जी व्याकुल झाली आहे.

**जाति**–संपूर्ण. गांधार व निषाद कोमल आहेत. पंचम प्रधानस्वर असून ग्रह व न्यास आहे. निषाद अंशस्वर आहे. या रागिणीमध्यें धनाश्री, पलाशी व शंकरा या रागांच्या छायेचा भास होतो.

---

१ "ले" या अक्षरावर सम आहे.

## ॥ पटमंजरी–धृपद ॥

॥ चढत प्रबल दल बली रामचंद्रजीको, छूट गये जल थल अरूणके जागते ॥ चढत० ॥ सुकत नदी और फुटत पहाड, शेष फुल कलमलानो गरूड गगन रही छांयके ॥ चढ० ॥ रथ गज हस्ती पियादा लेके सन्मुख आयो मेघनाद धायके ॥ च० ॥ तानसेनके प्रभु लछमनको लिये साथ, हनुमान अंगद दोहु ज्योद्धा बनायके ॥ चढ० ॥

**समय**–वसंतऋतूंत मध्यरात्रीं गातात.

मुख्य उपराग–बिभास अथवा भास्कर.

## (४) राग दीपक[१].

**शृंगारस्वरूप**–स्वरूप अग्नीप्रमाणें आरक्तवर्ण. केश मुक्त, वस्त्र लाल, हत्तीवर आरूढ होणारा, विलासी, स्त्रियांसह नानाप्रकारच्या क्रीडा करीत आहे व मधुर स्वरानें गायन करीत आहे. याची उत्पत्ति सूर्यतेजापासून झाली असून याच्या गायनानें आपोआप दीप प्रदीप्त होतात असें सांगितलें आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ, गांधार व निषाद कोमल आहेत. मध्यम तीव्र आहे. या शिवाय यांत शुद्धगांधार, शुद्धधैवत व शुद्धनिषादही येतात. हा राग काफी, केदार, बिहाग, भीमपलासी व शंकराभरण या रागांपासून उत्पन्न होतो. त्याचा स्वरविस्तार येणेंप्रमाणें:–

( काफी रागाचे स्वर )—सा-नी-ध-प, ( केदार )—नी-ध-सा-ना, ( काफी )—री-सा-नी-ध-सा, ( बिहाग )—नी-ग-री-म-ग, ( भीमपलासी )—री-सा-नी-सा-री-म, ( केदार )—ग-री-ग-सा, ( शंकराभरण )—प-सा-नी-सा-नी, ( केदार )—री-सा-नी-ध, ( काफी )—नी-ध-प-म-प, ( बिहाग )—ग-री-सा-री-म, ( शंकराभरण )—ग-री-ग-री, ( भीमपलासी )—ग-प-ध-प-म, ( बिहागकेदार )—प-नी-सा-नी-ध-नी-प-म-ग-री, ( काफी )—सा-री-सा-नी, ( केदार )—सा-म-ग-री, ग-सा-नी-ध-प, ( बिहागशंकराभरण )—नी-सा-प-नी-सा-नी-ध-प-ध-प, ( भीमपलासी )—म-प-ग-सा.

---

१ यास **दीपराग** अथवा **नटनारायण**ही म्हणतात.

२ या विषयीं अकबराचे वेळची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे ती अशी:—" एके वेळीं प्रसिद्ध तानसेन यानें दीपराग गातांच सर्व दीप आपोआप प्रदीप्त झाले. पण त्या योगानें त्याच्या शरीराचा मनस्वी दाह होऊं लागला तो कोणत्याही उपायानें शमन होईना. तेव्हां " शोरी " नें मल्हारराग गाऊन त्याजवर पर्जन्याची वृष्टी केली तेव्हां त्याचा दाह शांत झाला. " तानसेनाचें धृपद तसाच शोरीचा टप्पा प्रसिद्ध आहे.

## ॥ राग दीपक–धृपद ॥

॥ हे तन बनाय बरसत अमी तरसत रोम रोम दीपक दरसन कर देख उज्याले अनंत अपरंपार ॥ हे० ॥ जगत गगन झलकत झलकार सहस्रसे तार जे तेजसे कोटी कोटी बनीहय् मिसाल ग्यान समज अंगार ॥ हे० ॥ निसदिन सिलगत रहत महान अग्नी ओंकार पृथ्वी पाताल आकाश उन्के वसन दरसन प्रकाश आधार ॥ हे० ॥ सकल ज्योत अग्नीसागर ज्वाला मेरू मकार तूं बिचार अगम निगम प्रथम अग्नी उपजावन अंधःकार ॥ कहे मिया तानसेन सुन गुनी अकबरशाह हे धरत्रीउद्धार मंगल दीपक मान ग्यान ब्रह्मावतार ॥ हे० ॥

**समय**–ग्रीष्मऋतूमध्यें दिवसास दोनप्रहरीं अथवा संध्याकाळीं शृंगार अथवा करुणरसांत गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत. नट, केदारी, कानडी, देशी व कामोदी.

### ( १ ) रागिणी नट ( नाटिका ).

**शृंगारस्वरूप**–अप्सरेप्रमाणें सुंदर व तरुण. हंसगामिनी, वर्ण गुलाबी, वस्त्र लाल, आकृति वीराप्रमाणें, अश्वारूढ होऊन हातीं खड्ग धारण केलें आहे व शत्रूंच्या मध्यभागीं उभी असून वीरश्रीयुक्त युद्धास सज्ज झाली आहे.

**जाति**–षाडव. निषाद वर्ज्य असून सर्व स्वर शुद्ध आहेत. कित्येकांच्या मतें ही रागिणी संपूर्ण जातीची आहे.

## ॥ नट–ख्याल ॥

॥ सुरत बिसार डारीरे सजनारे जब ॥ हम तुम्हारी रीत तबही पहेछानी ॥ सुर० ॥ औरनके संग बतियां करन लागे, हमारी प्रीत न कछुही जानी ॥ सुरत० ॥

**समय**–ग्रीष्म अथवा हेमंतऋतूमध्यें दिवसास तिसरे प्रहरीं वीररसांत गातात.

मुख्य उपराग–चंपक व कुसुम.

### ( २ ) रागिणी केदारी ( केदारा ).

**शृंगारस्वरूप**–तपस्विनीप्रमाणें. केश मुक्त, वस्त्र भगवें, अंग भस्मचर्चित, कंठीं सर्पमाला असून मुखानें मंत्रोच्चार करीत आहे, नेत्र अर्धोन्मीलित झाले आहेत, गायनामध्यें ग.र्क होऊन महादेवाचें चिंतन करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल आहेत. मध्यम शुद्ध व तीव्र दोन्ही येतात. आरोहांत ऋषभ व निषाद वर्ज्य आहेत. गांधार अथवा मध्यम ग्रह व पंचम न्यास आहे. कित्येकांच्यामतें ही रागिणी षाडवजातीची असून ऋषभ वर्ज्य आहे. व कोणी ओडवजाति समजून ऋषभ व धैवत वर्ज्य करितात व निषाद दोन्हीं घेतात.

॥ केदारी-झमक ॥

॥ नींद गढ सुघड गढ बांकोही किल्लो, उंच्यासकोटी तान कंगुराखाई ॥नाद०॥ सप्त सूर तीन ग्राम यक्कीस मूर्च्छना, बाईस सुरथा च्यार बुरुज चार तोफा लगाई ॥ नाद० आरोही अवरोही अस्ताई संचाई, ऐसा बिकट कोट बिधना रचाई ॥ कहे मिया तान-सेन सुनोहो गुनीजन, आपबल भूजबलबिन लियेहू न ज्याई ॥ नाद० ॥

**समय**-दोन प्रहर रात्रीं शांतरसांत गातात. ईश्वराची आराधना करण्यास ही रागिणी उत्तम आहे.

मुख्य उपराग-**राम**.

## ( ३ ) रागिणी कानडी ( कर्नाटकी ).

**शृंगारस्वरूप**-वर्ण श्याम, हास्य मंद, वस्त्र शुभ्र, रविपूजनीं सदा तत्पर, आकृति भव्य व मर्दानी, उजवे हातीं खड्ग व डावे हातीं हस्तीदंत धारण केला असून पुढें भाट स्तुतिपाठ गात आहेत.

**जाति**-संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. मध्यम शुद्ध. ऋषभ व धैवत तीव्र. निषाद प्रधान स्वर असून ऋषभ ग्रह व गांधार न्यास आहे. शुद्धनिषादही येतो.

॥ **कानडी**-चौताल ॥

॥ कहानडा कल्यान[२] गान, केदारा हिंदोल तान, गोडी तोडी मालकंस मालवा धनासरी ॥ कहान० ॥ सारंग देवगंधार गुर्जरी गोडी मल्हार, ललित बिभासहुमें थोरी थोरी असावरी ॥ कहान० ॥ मोहे सब सुर नर मुनी नारदसे ब्रह्मादिक, टपक टपक वांकी आंखनमें आंसुरी ॥ क० ॥ नटमें बजावे श्रीरागमें सुनावे कहान इते इते रागनमें बाजत हय् बांसरी ॥ कहानडा० ॥

**समय**-दोन प्रहर रात्रीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग-विहल व हिमाल.

## ( ४ ) रागिणी देशी.

**शृंगारस्वरूप**-विलासिनी. तारुण्यानें प्रफुल्लित, वर्ण गौर, स्वर कोकिलेप्रमाणें, वस्त्र हिरवें, पतीला आडवून त्याच्याशीं शृंगारिक भाषणानें विनोद करीत आहे व मंद हास्य करीत त्याला विंझण्यानें वारा घालीत आहे.

**जाति**-संपूर्ण. धैवत प्रधानस्वर व पंचम न्यास आहे. आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य आहेत. हिचें व सोरठीचें स्वरूप बहुतेक सारखेंच आहे. पण फरक येवढाच कीं सोरठीमध्यें निषाद कोमल येतो व या रागिणींत शुद्ध येतो.

---

१ "ना" या अक्षरावर सम आहे.

२ "ल्या" या अक्षरावर सम आहे.

॥ **देशी**–दीपचंदी ॥

॥ देस कोई संय्याको बतादीजो री[1], मय् लेउंगी जोगनियाको भेस ॥ दे० ॥ कहां जाये कैसी करे कोहुंसे करे पुकार, हकीगत कछु न जानिये, क्युंकर मिले मुरार॥देस०॥

**समय**–ग्रीष्मऋतूंत दिवसा दुसरे प्रहरीं गातात.

मुख्य उपराग–कुंतल व कमल.

### ( ५ ) रागिणी कामोदी ( कमोद ).

**शृंगारस्वरूप**–वर्ण गुलाबी, वस्त्र पिंवळें, कंचुकी लाल, पतिविरहानें व्याकुल होऊन त्याच्या भेटीविषयीं आतुर होत्साती शोक करीत आहे.

**जाति**–ओडव, गांधार व निषाद वर्ज्य. मध्यम तीव्र व शुद्ध दोन्ही. इतर सर्व स्वर शुद्ध. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. मध्यम ग्रह व धैवत न्यास आहे. मध्यम प्रधानस्वर आहे. या रागिणीचें मल्हार रागाशीं बरेंच साम्य आहे.

॥ **कमोदी**–अध्धा ॥

॥ बनमों बसत नाहीं मुरारी, येरी कुंजबिहारी गिरिवर धारी संगसोहे राधा प्यारी बीखभानकी दुलारी ॥ बन० ॥ मोर मुगुट पीतांबर सोहे, कुंडलकी छबन्यारी ॥ बीखभानकी ॥ बन० ॥

**समय**–ग्रीष्मऋतूंत दिवसास तिसरे प्रहरीं करुणरसांत गातात. विरहनिवेदनास ही रागिणी उत्तम आहे.

मुख्य उपराग–कलिंग.

### ५ श्रीराग.

**शृंगारस्वरूप**–तरुण, विलासी, वस्त्र लाल, कंठीं नवरत्नांचा हार धारण केला असून लतामंडपाखालीं सिंहासनारूढ झाला आहे, समोर गायकजन बसले आहेत, एका हातीं वीणा व एका हातीं कमलपुष्प धारण केलें असून मूर्च्छनायुक्त मधुर स्वरानें गायन करीत आहे.

याची उत्पत्ति शेषापासून सांगितली आहे. हा राग आलापमूर्च्छनायुक्त स्वरांनीं शुष्क वृक्षाखालीं बसून गाइला असतां तो वृक्ष प्रफुल्लित होतो अशी प्राचीन आख्यायिका आहे.

---

१ "री" या अक्षरावर सम आहे.

**जाति**—संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल व मध्यम तीव्र आहे. आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य आहेत. पंचम फारसा येत नाहीं. ऋषभ प्रधानस्वर आहे. हा राग गौरी, मारु व टंकल या रागांपासून उत्पन्न झाला आहे. त्याचा स्वरविस्तार येणें-प्रमाणें:—

( टंकल रागाचे स्वर ) ग-री-सा-नी, ( गौरी ) ध-प-ध-नी, ( टंकलमारू ) ध-री-प-म-ध-म-ग-प-म-ग, ( गौरी ) री-ग-री-सा-नी-री-ग-री-ग-सा-प-म-ध-सा ( मारुटंकल ) नी-री-सा-री-नी-ध-सा-प-म-ध-सा, ( मारू ) नी-री-सा-री-नी-ध-प म-ध-सा-नी-सा-म, ( टंकल ) ध-सा-ग-री-सा-नी-ध-म-ध-म-ग-री.

॥ **श्रीराग**—धृपद ॥

॥ हे राजा जहां जहां जावे वहां वहां सुनियत तेरोही नाम ॥ ध्रु०॥ ज्यो हय् नर-नरेंद्र नारी पोहरे प्रताप ओभी तेरे दरसनकी लालसा आस करे, और तू स्तुती श्रवन सुन पावे विश्राम ॥ हे० ॥ ज्यो हय् गुनी गंधर्व कुशल विद्याधर ओभी जपत हय् तेरोही धाम, श्रीराग गावत तानसेनके प्रभु दीनबंधु राजाराम ॥ हे० ॥

**समय**—हेमंतऋतूमध्यें दिवसास चवथे प्रहरीं गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत. वसंती, आसावरी, मालवी, धनाश्री व मालश्री.

( १ ) **रागिणी वसंती** ( वसंत ).

**शृंगारस्वरूप**—वर्ण श्याम, वस्त्र श्वेत, आकृति मर्दानी, मस्तकीं मुकुट, अंग केशराच्या उटीनें चर्चित, कंठीं चंपकपुष्पांचा हार व हातीं आम्रमंजरी धारण केली आहे. सुगंधानें लुब्ध होऊन भ्रमर सभोंवार फिरत आहेत, याप्रमाणें उपवनामध्यें सख्यांसह-वर्तमान नृत्य व गायन करीत आहे.

**जाति**—संपूर्ण. ऋषभ कोमल. मध्यम शुद्ध व तीव्र दोन्ही. बाकीचे स्वर शुद्ध. मध्यम प्रधानस्वर व न्यास आहे. या रागिणींतील स्वर बहार व हिंदोल यांशीं मिळतात परंतु ऋषभ व पंचम स्वरांच्या योगानें भिन्नपणा दिसून येतो. तसेंच, या रागिणींत थोडा मालकंसाच्या छायेचाही भास होतो.

॥ **वसंत**—त्रिताल ॥

॥ बोलन लागी लगीरे कोयलियां बोलन लागी, लागी कुह कुह मधु रुत आई ॥ बो०॥ सुनत कुह जीमो हूक उठत हय् पिया बिन कछु न सोहाई ॥ बोल०॥ बेर परी री कारी भारी, बिरहन को दुखदाई ॥ दास हरी रंग कारे गुन, न जाने प्रीत पराई ॥ बोल०॥

---

१ "ला" या अक्षरावर सम आहे.

**समय**–वसंत अथवा हेमंतऋतूंत दिवसास पहिले अथवा दुसरे प्रहरीं शृंगार-रसांत गातात.

मुख्य उपराग–गुणसागर, कुंभ व गंभीर.

## ( २ ) रागिणी आसावरी.

**शृंगारस्वरूप**–वर्ण श्याम, सुकुमार, गुणवान्, सधवा, ललाट चंदनयुक्त, कंठीं कुसुमांचे हार, वेणी भुजंगाप्रमाणें, अंगास सुगंधद्रव्यांचा परिमळ येत आहे. श्वेत वल्कलें परिधान करून पर्वताच्या शिखरावर शीतल वायु घेत बसली आहे व विचारांत इतकी निमग्न झाली आहे कीं हातपाय सर्पांनीं वेष्टिले असतांही जिला भान नाहीं.

**जाति**–संपूर्ण. गांधार व धैवत कोमल. निषाद दोन्ही. ऋषभ तीव्र. आरोहांत गांधार व निषाद वर्ज्य आहेत. शुद्धमध्यम ग्रह व पंचम न्यास आहे. कित्येकांच्या मतें ऋषभ कोमल असून धैवत न्यास आहे.

॥ **आसावरी**–चौताल ॥

॥ हय् देखी इंद्रलीला इंद्रको सो दरबार, तख्त बैठे हय् अतल मानी ॥ हय्० ॥
दीपनाम जंबूदीप दीपनाम सिंहलदीप, ऐसो दीप हय् जैसो कनक हीरा ॥ हय्० ॥
येकनको दान देत येकनको बुलाय लेत, येकनको बक्षत घर जर कसचीरा ॥ हय्० ॥
तानसेन कहे प्रभु तेहारे राजनमें, गुनीजन गंधर्व करत क्रीडा ॥ हय्० ॥

**समय**–वसंत, हेमंत अथवा शिशिरऋतूंत दिवसास पहिले प्रहरीं शांतरसांत गातात.

मुख्य उपराग–शंकर व बिहागरा.

## ( ३ ) रागिणी मालवी.

**शृंगारस्वरूप**–विलासिनी, सुकुमार, मध्या, रतिप्रसंगीं मुदिता, वस्त्र चित्रविचित्र रंगाचें, अंगावर पुष्पांचे अलंकार धारण केले आहेत, व सर्व शृंगारभूषणें धारण करून पतीची मार्गप्रतिक्षा करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम तीव्र. आरोहांत ऋषभ व पंचम वर्ज्य आहेत. निषाद फारसा येत नाहीं. अवरोहांत धैवत क्वचित् येतो. गांधार ग्रह व धैवत न्यास आहे.

---

१ कित्येकांच्या मतें पर्वताजवळ सरोवरामध्यें वस्त्ररहित बसली आहे.

२ "इं" या अक्षरावर सम आहे.

॥ मालवी—ख्याल ॥

॥ काहेकू रे जलावत प्यारी मोरी धिरज हटावत सारी आली री ॥ काहे०॥ जबथे कपट मनमें, तबहिय छुपाय क्युं तनमें, अब ये बुराई अब ये दुराई मोहेतन सलगत भारी आलीरी ॥ काहे० ॥

**समय**—हेमंतऋतूंत संध्याकाळीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग—माळु.

## (४) रागिणी धनाश्री.

**शृंगारस्वरूप**—विरहिणी. वस्त्र केशरी, शरीर शुष्क, कंठीं मालतीपुष्पांच्या माल धारण करून उपवनामध्यें बकुलवृक्षाखालीं बसली आहे, पतिविरहानें व्याकुल व निराश होऊन रुदन करीत आहे व हृदय श्वासभरित झालें आहे.

**जाति**—संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. मध्यम शुद्ध. कित्येक तीव्र मध्यम घेतात, पण तसें केलें असतां धनाश्रीचें स्वरूप बदलून मुलतानी राग होईल, म्हणून मध्यम शुद्धच घ्यावा. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. गांधार ग्रह व पंचम न्यास आहे. पंचम प्रधानस्वर आहे. या रागिणींतील व भैरव आणि टोडी-मधील गांधाराची कोमलता सारखी आहे.

॥ धनाश्री—चौताल ॥

॥ छत्रनपती दिल्ली मान रावनमुनी हनुमान, देवनमुनी शंकर ॥ छत्र०॥ दीनमुनी सूरज रागमुनी भैरव, गुनियनमुनी तानसेन ॥ छत्र० ॥

**समय**—हेमंतऋतूंत दिवसास दुसरे अथवा तिसरे प्रहरीं शृंगार अथवा वीर-रसांत गातात.

मुख्य उपराग—गौड.

## (५) रागिणी मालश्री.

**शृंगारस्वरूप**—गृहिणी, सुकुमार, वर्ण गुलाबी, वस्त्र लाल, कंचुकी पिंवळी, विरहिणी परंतु वस्त्रालंकार घालून सख्यांसहवर्तमान आम्रवृक्षाखालीं आनंदानें क्रीडा करीत आहे.

**जाति**—षाडव. ऋषभ वर्ज्य, व सर्व स्वर शुद्ध आहेत. गांधार प्रधानस्वर व पंचम न्यास आहे. धैवत व निषाद लुप्त आहेत. कित्येक ही रागिणी षड्ज, गांधार व पंचम हे तीनच स्वर घेऊन गातात.

---

१ "छ" या अक्षरावर सम आहे.

॥ **मालश्री**—ख्याल ॥

॥ प्यारे तुम अनुकुल कहावत, मेरे जानके छन लच्छन और मान ॥ प्यारे० ॥ मुख और, जिया और, कहेते और, किये और ऐसीपरी मन आन ॥ प्यारे० ॥

**समय**—हेमंतऋतूंत दिवसास दुसरे अथवा तिसरे प्रहरीं गातात.

मुख्य उपराग—सिंधु.

## ६ राग मेघ.

**शृंगारस्वरूप**—कामातुर, वर्ण श्याम, शरीर भव्य, हातीं शस्त्र व मस्तकीं मुकुट धारण केला आहे, नाद सिंहाप्रमाणें गंभीर असून वीरांच्या सभेमध्यें छत्रयुक्त सिंहासनावर महावीराप्रमाणें शोभत आहे. याची उत्पत्ति इंद्रापासून सांगितली आहे.

**जाति**—संपूर्ण. गांधार कोमल व निषाद शुद्ध आहे. मध्यम प्रधानस्वर आहे. गांधार ग्रह व न्यास आहे. आरोहांत गांधार वर्ज्य आहे. या रागांत सारंग व गौडमल्हार या रागांच्या छाया लुप्त आहेत.

कित्येक हा राग ओडव जातीचा समजून गांधार व निषाद वर्ज्य करितात. यांत धैवत व गांधार हे स्वर कानड्याचे आहेत. हा राग कानडा, तिलककमोद व सारंग या रागांपासून उत्पन्न झाला आहे. याचा स्वरविस्तार येणें प्रमाणें—

( कानडा—तिलककमोद याचे स्वर ) सा-ध-प-ध-प-सा-नी-सा-नी-री-सानी, ( सारंग-तिलककमोद-कानडा ) ध-सा-री-प-म-प-म-ग-री-सा-नी-प-म-नी-सा-नी-सा-नी-प-नी-सा-नी-सा-नी-री-सा, ( सारंग) ध-प-ध-प-म-ध, ( तिलककमोद-कानडा ) सा-ध-प-म-ध-सा-ध-प-म-ग-री-म-प-सा-नी-सा-ध-प-म-प-म-ग-री-सा.

॥ **मेघराग**—ख्याल ॥

॥ आया मेघा तेरी मोसमकी घटा छांय रही, मेरे मन भाय रही ॥ पपैय्या पीहू पीहू पुकारे, जंगलबीच मोर जिगारे, बागोंमें कोयलियां जैसी जैसी चील किलाय रही ॥ आया मेघा० ॥ राजा इंद्रकी चढाई, पियाकी सुधहु न पायी, कौनसी दूती उसें, जायके समजाय रही ॥ आया० ॥

**समय**—वर्षाऋतूंत दिवसास तिसरे प्रहरीं अथवा उत्तररात्रीं शृंगार अथवा वीररसांत गातात.

या रागाच्या पांच रागिण्या आहेत. टंकल, मल्हारी, गुर्जरी, भूपाली व देशकारी.

### ( १ ) रागिणी टंकल ( टंक ).

**शृंगारस्वरूप**—विरहिणी, वस्त्र श्वेत, दुःखाच्या योगानें पीत वर्ण भासत आहे, चित्त क्षुब्ध झालें आहे, हृदय श्वासभरित झालें आहे, पतिविरहानें तप्त झाल्यामुळें

मनास शांतता वाटावी म्हणून कमलपुष्पशय्येवर निजविलें असतांही मनाचा ताप कमी न होतां शय्येवर जी नागिणीप्रमाणें तडफडत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम तीव्र आहे. ऋषभ ग्रह व न्यास असून प्रधानस्वर आहे. पंचम अंशस्वर आहे.

॥ **टंकल**–ख्याल ॥

॥ मोराजी सुनो तो कहुं मोरे डेरे आवना ॥ आगले पोर मोरी ननंदिया जागे, पिछले पोर जागे मोरी सास, नयनपे सैय्यां छबिया जागे, हैय्यामें जागे मोरी रे आस ॥ ॥ मोरा० ॥

**समय**–वर्षाऋतूंत मध्यरात्रीं गातात.

मुख्य उपराग–जालंधर.

## ( २ ) रागिणी मल्हारी ( मल्हार ).

**शृंगारस्वरूप**–वर्ण गौर, रसिकप्रिया, रतिविचित्रा, विरहिणी, एकांतवासी, वस्त्र मलीन, शरीर शुष्क, गति मंद, अंगावर चंपकपुष्पांचे अलंकार धारण केले आहेत, नेत्र अश्रुयुक्त झाले आहेत व हातीं वीणा घेऊन उदास मनानें गायन करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. पंचम ग्रह व धैवत न्यास आहे. आरोहांत गांधार वर्ज्य आहे, धैवत प्रधानस्वर आहे. मध्यम स्वरावर थांबण्यांत विशेष खुबी दिसते. कित्येक ही रागिणी षाडव जातीची समजून निषाद वर्ज्य करितात.

॥ **मल्हार**–चौताल ॥

॥ इंद्रकी असवारी पपैय्यानें खूब कीनी देसदेस खबर दीनी ॥ इंद्र० ॥ घो घो गरजे नगारे बाजे घोओरवा निशान बाजे, बोदराकी फौजतान भूधराकी तीरकारी ॥ इं० ॥ देवे नीर जोके नीर तोला गोला तोफों छूटे, का करत बिन हनुमान उनहीकी गत न्यारी॥ ॥ तानसेनको प्रभु तुम बहुनायक, जाको पिया परदेस उनहुको जग भारी ॥ इंद्र० ॥

**समय**–वर्षाऋतूंत दिवसास अथवा रात्रीं दोनप्रहरीं वीर अथवा शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–सारंग व नंद.

## ( ३ ) रागिणी गुर्जरी.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गौर, कटि सिंहाप्रमाणें, भाषण मिष्ट, सुकुमार, चतुर, गानकलाप्रविण, रतिविचित्रा, वस्त्र लाल, कंचुकी पीतवर्ण, पतिसुखाच्या अभावानें मनास

---

१ "इं" या अक्षरावर सम आहे.

ताप होत असल्यामुळें शय्येवर तळमळत आहे, व किंचित् निद्रा लागली असतां दचकून उठून वारंवार रुदन करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल आहेत, अवरोहामध्यें कोमल गांधार व शुद्धनिषादही कधींकधीं येतात. निषाद फारसा येत नाहीं. आरोहांत शुद्धगांधार येतो. अवरोहांत मध्यम व निषाद वर्ज्य आहेत.

॥ **गुर्जरी**–ख्याल ॥

॥ रयन उनीदीं नार निस जागी प्रीतम सुरज नवा प्यारे संग॥ रै० ॥ रंग उमंगी अखियां झुकी जात, और मिची जात हय् पलकार ॥ रैन० ॥

**समय**–वर्षाऋतूंत दिवसास अथवा रात्रीं दुसरे प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–शंकराभरण.

## (४) रागिणी भूपाली.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गुलाबी, भाषण मधुर, वस्त्र श्वेत, कंठीं सुगंध पुष्पांचें हार घातले असून अंगास केशराची उटी लाविली आहे, वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन आनंदानें अभिनययुक्त पतीशीं क्रीडा करीत आहे.

**जाति**–ओडव. मध्यम व निषाद वर्ज्य आहेत. धैवत ग्रह व प्रधानस्वर आहे ऋषभापासून गांधारापर्यंत न्यास आहे.

॥ **भूपाली**–ख्याल ॥

॥ डरूंरी नयन ननंदिया सोही बातकी झूटी साची लगावत बिरहन प्यारे ॥ डरूं० ॥ कर जोर मोरा सीर सिजरा आब सावकी न वासो कहां कहिये ॥ डरूं ॥

**समय**–वर्षाऋतूंत संध्याकाळीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–कल्याण व गजधर.

## (५) रागिणी देशकारी.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गौर, भाषण मधुर, हास्य मंद, कपोलावर काळा तीळ शोभत आहे, अंगास अरगजा व चंदन याची उटी लाविली आहे, कंठीं मदनबाण व निशागंध पुष्पांचे हार धारण केले असून पतीशीं अभिनययुक्त आनंदानें क्रीडा करीत आहे.

**जाति**–षाडव. निषाद वर्ज्य आहे. मध्यम फारसा येत नाहीं. सर्व स्वर शुद्ध आहेत. कित्येक ओडव जाति समजून निषाद व मध्यम वर्ज्य करितात.

## ॥ देशकारी-ख्याल ॥

॥ सुंदरी तू कछु समजत नाहींरी, समजे तो समजले सनम प्रेम प्रीत रीत ॥ सुं० ॥
नयन नच कायन अंग लपायन रिझायन छतियन रहे लग नीत ॥ सुंदरी० ॥

**समय**-वर्षाऋतूंत पहिले प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग-गंधार व सूहा.

---

मुख्य सहा राग व तीस रागिण्या यांची सविस्तर हकिकत मागें दिली आहे. त्याशिवाय प्रचारांतील इतर रागांची संक्षिप्त माहिती पुढें दिली आहे.

**१ राग पंचम**-जाति षाडव. ऋषभ वर्ज्य असून मध्यम प्रधानस्वर आहे. कित्येक हा राग ओडव जातीचा समजून ऋषभ व पंचम वर्ज्य करितात, पण तसें केलें असतां हिंदोल व वसंत यांच्याशीं या रागाचें निकट साम्य होईल म्हणून पंचम वर्ज्य करूं नये. हा राग भैरवाच्या ( व कित्येकांच्या मतें हिंदोलाच्या ) शाखेंतील आहे.

**२ देवगंधार**-जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल असून शुद्धमध्यम प्रधानस्वर आहे. यांत भैरव, रामकली व असावरी यांचे स्वर येतात. कित्येकांच्या मतें हा राग टोडी व असावरी यांच्यापासून उत्पन्न झाला असून यांत निषाद कोमल आहे व धैवत न्यास आहे. तसेंच अवरोहामध्यें ऋषभ, गांधार व निषाद वर्ज्य आहेत.

हा राग योगाभ्यास करणारांना फार उत्तम व योग्य आहे.

**३ करनाट**-जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. धैवत ग्रह व न्यास आहे. यांत बिलावलाची छाया येते.

**४ जौनपुरीटोडी**-जाति संपूर्ण. ही असावरी व टोडी यांपासून झाली आहे. शाखा भैरव.

**५ लाचारीटोडी**-जाति संपूर्ण. ही टोडी, असावरी व देवगंधार यांपासून झाली आहे. ऋषभावर मूर्च्छना आहे. शाखा भैरव.

**६ पलाशिका**-जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. मध्यम दोन्ही. कोमल निषाद व शुद्धमध्यम प्रधानस्वर आहे. यांत धनाश्री व पूर्वी यांची संयुक्त छाया आहे. शाखा दीप.

**७ सारंग**-जाति ओडव. गांधार व धैवत वर्ज्य. निषाद दोन्ही ( आरोहांत तीव्र व अवरोहांत कोमल ), मध्यम प्रधानस्वर असून षड्ज किंवा ऋषभ ग्रह व पंचम किंवा निषाद न्यास आहे. कधीं मध्यमही न्यास होतो.

ताप होत असल्यामुळें शय्येवर तळमळत आहे, व किंचित् निद्रा लागली असतां दचकून उठून वारंवार रुदन करीत आहे.

**जाति**–संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल आहेत, अवरोहामध्यें कोमल गांधार व शुद्ध निषादही कधींकधीं येतात. निषाद फारसा येत नाहीं. आरोहांत शुद्धगांधार येतो. अवरोहांत मध्यम व निषाद वर्ज्य आहेत.

॥ **गुर्जरी**–ख्याल ॥

॥ रय्न उनीदी नार निस जागी प्रीतम सुरज नवा प्यारे संग॥ रै० ॥ रंग उमंगी अखियां झुकी जात, और मिची जात हय् पलकार ॥ रैन० ॥

**समय**–वर्षाऋतूंत दिवसास अथवा रात्रीं दुसरे प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–शंकराभरण.

## ( ४ ) रागिणी भूपाली.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गुलाबी, भाषण मधुर, वस्त्र श्वेत, कंठीं सुगंध पुष्पांचें हार घातले असून अंगास केशराची उटी लाविली आहे, वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन आनंदानें अभिनययुक्त पतीशीं क्रीडा करीत आहे.

**जाति**–ओडव. मध्यम व निषाद वर्ज्य आहेत. धैवत ग्रह व प्रधानस्वर आहे ऋषभापासून गांधारापर्यंत न्यास आहे.

॥ **भूपाली**–ख्याल ॥

॥ डरूंरी नय्न ननंदिया सोही बातकी झूटी साची लगावत बिरहन प्यारे ॥ डरूं० ॥ कर जोर मोरा सीर सिजरा आब सावकी न वासो कहां कहिये ॥ डरूं ॥

**समय**–वर्षाऋतूंत संध्याकाळीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग–कल्याण व गजधर.

## ( ५ ) रागिणी देशकारी.

**शृंगारस्वरूप**–वर्ण गौर, भाषण मधुर, हास्य मंद, कपोलावर काळा तीळ शोभत आहे, अंगास अरगजा व चंदन याची उटी लाविली आहे, कंठीं मदनबाण व निशागंध पुष्पांचे हार धारण केले असून पतीशीं अभिनययुक्त आनंदानें क्रीडा करीत आहे.

**जाति**–षाडव. निषाद वर्ज्य आहे. मध्यम फारसा येत नाहीं. सर्व स्वर शुद्ध आहेत. कित्येक ओडव जाति समजून निषाद व मध्यम वर्ज्य करितात.

॥ देशकारी—ख्याल ॥

॥ सुंदरी तू कछु समजत नाहीरी, समजे तो समजले सनम प्रेम प्रीत रीत ॥ सुं०॥
नयन नच कायन अंग लपायन रिझायन छतियन रहे लग नीत ॥ सुंदरी० ॥

**समय**—वर्षाऋतूंत पहिले प्रहरीं शृंगाररसांत गातात.

मुख्य उपराग—गंधार व सूहा.

---

मुख्य सहा राग व तीस रागिण्या यांची सविस्तर हकिकत मागें दिली आहे. त्याशिवाय प्रचारांतील इतर रागांची संक्षिप्त माहिती पुढें दिली आहे.

**१ राग पंचम**—जाति षाडव. ऋषभ वर्ज्य असून मध्यम प्रधानस्वर आहे. कित्येक हा राग ओडव जातीचा समजून ऋषभ व पंचम वर्ज्य करितात, पण तसें केलें असतां हिंदोल व वसंत यांच्याशीं या रागाचें निकट साम्य होईल म्हणून पंचम वर्ज्य करूं नये. हा राग भैरवाच्या ( व कित्येकांच्या मतें हिंदोलाच्या ) शाखेंतील आहे.

**२ देवगंधार**—जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल असून शुद्धमध्यम प्रधानस्वर आहे. यांत भैरव, रामकली व असावरी यांचे स्वर येतात. कित्येकांच्या मतें हा राग टोडी व असावरी यांच्यापासून उत्पन्न झाला असून यांत निषाद कोमल आहे व धैवत न्यास आहे. तसेंच अवरोहामध्यें ऋषभ, गांधार व निषाद वर्ज्य आहेत.

हा राग योगाभ्यास करणारांना फार उत्तम व योग्य आहे.

**३ करनाट**—जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. धैवत ग्रह व न्यास आहे. यांत बिलावलाची छाया येते.

**४ जौनपुरीटोडी**—जाति संपूर्ण. ही असावरी व टोडी यांपासून झाली आहे. शाखा भैरव.

**५ लाचारीटोडी**—जाति संपूर्ण. ही टोडी, असावरी व देवगंधार यांपासून झाली आहे. ऋषभावर मूर्च्छना आहे. शाखा भैरव.

**६ पलाशिका**—जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. मध्यम दोन्ही. कोमल निषाद व शुद्धमध्यम प्रधानस्वर आहे. यांत धनाश्री व पूर्वी यांची संयुक्त छाया आहे. शाखा दीप.

**७ सारंग**—जाति ओडव. गांधार व धैवत वर्ज्य. निषाद दोन्ही ( आरोहांत तीव्र व अवरोहांत कोमल ), मध्यम प्रधानस्वर असून षड्ज किंवा ऋषभ ग्रह व पंचम किंवा निषाद न्यास आहे. कधीं मध्यमही न्यास होतो.

**८ गौडसारंग**—जाति षाडव. निषाद वर्ज्य. मध्यम दोन्ही. बाकीचे स्वर शुद्ध आहेत.

**९ वृंदावनीसारंग**—जाति ओडव. गांधार व धैवत वर्ज्य. निषाद कोमल असून न्यास आहे. मध्यम व निषाद प्रधानस्वर. इतर स्वर सारंगाप्रमाणें.

**१० सामतसारंग**—जाति ओडव. गांधार व धैवत वर्ज्य आहेत पण धैवत घेऊन षाडवही होऊं शकतो. हा सारंग मल्हार व सोरठ यांपासून झाला आहे. सारंगाचा मध्यम प्रधानस्वर आहे.

**११ नूरसारंग**—जाति षाडव. धैवत वर्ज्य. निषाद दोन्ही. गांधार कोमल आहे. यांत सारंग, बरवा व धानी यांची छाया येते.

**१२ देवगिरीसारंग**—जाति संपूर्ण. निषाद दोन्ही व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. हा सारंग देवगंधार व बिलावल यांचें मिश्रस्वरूप होय.

**१३ मेघसारंग**—जाति षाडव. धैवत वर्ज्य. निषाद दोन्ही, व गांधार कोमल आहे. मेघ व सारंग यांचें हें मिश्रस्वरूप आहे.

**१४ लंकदहन**—याचें स्वरूप बहुतेक मेघसारंगाप्रमाणेंच आहे.

**१५ सोरठ**—जाति संपूर्ण. निषाद दोन्ही (आरोहांत तीव्र व अवरोहांत कोमल). आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य आहेत. पंचम न्यास व ऋषभ प्रधानस्वर आहे. कधींकधीं षड्ज, ऋषभ अगर मध्यमही न्यास होतो. देश व सोरठ यांचें बरेंच साम्य आहे.

**१६ गौडमल्हार**—जाति षाडव. निषाद वर्ज्य. गांधार प्रधानस्वर व न्यास आहे. क्वचित् तीव्रमध्यमही येतो. मध्यमावर मूर्च्छना आहे. निषाद घेऊन संपूर्ण जातिही होते.

**१७ मियानीमल्हार**—जाति संपूर्ण. गांधार कोमल. निषाद दोन्ही, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. हा राग मल्हार व कानडा यांचें संयुक्तस्वरूप होय.

सारंगापासून मियानीमल्हारापर्यंत (७ ते १७) सर्व राग मेघ रागाच्या शाखेंत येतात.

**१८ काफी**—जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल असून बाकीचे स्वर शुद्ध आहेत. गांधार अथवा निषाद ग्रह व पंचम न्यास आहे. गांधार अंशस्वर आहे.

**१९ तिलंग**—जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत पण कधींकधीं कोमल गांधार व कोमलनिषादही येतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. तीव्रगांधार ग्रह व कोमलनिषाद न्यास आहे. याचें व खमाच रागाचें स्वरूप बहुतेक सारखें आहे.

**२० जंगला**–जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत, पण कधींकधीं कोमल गांधार, कोमल निषाद व तीव्र मध्यमही येतात. धैवत ग्रह व गांधार अथवा ऋषभ न्यास आहे. धैवत प्रधानस्वर आहे. गांधारावर मूर्च्छना आहे. हा सोरठ व झिंझोटी यांपासून झाला आहे.

**२१ मांढ**–जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. धैवत प्रधानस्वर आहे. षड्ज ग्रह व न्यास आहे. कधींकधीं पंचमही न्यास होतो. आरोहांत गांधार वर्ज्य आहे. निषाद व गांधार यांवर मूर्च्छना आहे.

**२२ पिलु**–जाति संपूर्ण. ऋषभ, गांधार, मध्यम, धैवत व निषाद हे सर्व स्वर ( कोमल व तीव्र ) दोन्ही येतात, पण विशेषेंकरून गांधार, धैवत व निषाद हे कोमल असतात. गांधार प्रधानस्वर व निषाद न्यास आहे. या रागांत सर्व म्हणजे बाराही स्वर येतात.

**२३ हिजाज**–जाति संपूर्ण. गांधार दोन्ही व निषादही दोन्ही येतात. षड्ज ग्रह व न्यास आहे. ऋषभावर मूर्च्छना आहे. यांत सोरठीची छाया येते.

**२४ मधुर**–जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. ऋषभावर मूर्च्छना आहे. धैवत फारसा येत नाहीं.

**२५ देशीजिल्हा**–जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. षड्ज ग्रह व न्यास आहे. मध्यम प्रधानस्वर आहे.

**२६ जेतश्री**–जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल, व मध्यम तीव्र आहे. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. शुद्ध धैवतही कधींकधीं येतो. शाखा दीप.

**२७ बरवा**–जाति संपूर्ण. गांधार दोन्ही व निषादही दोन्ही येतात. पण विशेषेंकरून गांधार कोमल व निषाद शुद्ध घेतात. कधींकधीं ऋषभ व धैवत कोमल असतात. आरोहांत गांधार वर्ज्य आहे. धैवत प्रधानस्वर आहे.

**२८ मारवा**–जाति षाडव. पंचम वर्ज्य आहे. ऋषभ कोमल व मध्यम तीव्र आहे. शुद्धधैवत प्रधानस्वर आहे. ऋषभ ग्रह, व मध्यमापासून धैवतापर्यंत न्यास आहे. गांधार तीव्र आहे. याचें पूर्वीरागाशीं साम्य आहे.

**२९ रायसा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल आहेत. शुद्ध निषादही येतो.

**३० सिंदुरा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल आहेत. आरोहांत शुद्धनिषाद येतो. शुद्धमध्यम प्रधानस्वर आहे.

**३१ सुरपरदा**–जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. आरोहांत ऋषभ वर्ज्य आहे. गांधार ग्रह आहे.

**३२ धानी**—जाति संपूर्ण. गांधार कोमल व बाकीचें स्वर शुद्ध आहेत. कोमल-निषादही येतो. गांधार प्रधानस्वर आहे.

**३३ दीपकी**—जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल, व मध्यम तीव्र आहे. शुद्ध निषाद व कोमल धैवतही येतात. या रागिणीचें धनाश्रीशीं साम्य आहे.

**३४ पूर्वी**—जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल, व मध्यम तीव्र आहे. शुद्ध-धैवतही येतो. अवरोहांत पंचम वर्ज्य आहे. गांधार ग्रह व पंचम न्यास आहे. मारवा व पूर्वी यांचें स्वरूप अगदीं जवळ जवळ आहे, फरक येवढाच कीं पूर्वीमध्यें पंचम फक्त आरोहांत येतो व मारव्यांत तो मुळींच येत नाहीं. शिवाय मारव्यांत अवरोहांत **सम** आहे व यांत आरोहांत आहे. गांधार स्वरावर थोडें थांबलें असतां सोहनीची छाया दिसूं लागते.

**३५ रैनकीपूर्वी**—जाति षाडव. पंचम वर्ज्य आहे. ऋषभ व धैवत कोमल आहेत.

**३६ ललितगौरी**—जाति षाडव. पंचम वर्ज्य. मध्यम शुद्ध आहे. ललित व गौरी यांचें हें संयुक्तस्वरूप होय.

**३७ त्रिवेणी**—जाति षाडव. मध्यम वर्ज्य. आरोहांत निषाद व अवरोहांत धैवत वर्ज्य. धैवत ग्रह व न्यास आहे. मध्यम घेऊन संपूर्ण जातिही होते.

**पूर्वी**पासून **त्रिवेणी**पर्यंत (३४ ते ३७) सर्व रागिण्या **श्री**रागाच्या शाखेंत येतात.

**३८ शुक्लबिलावल**—जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. आरोहांत निषाद वर्ज्य. हा राग मेघरागाजवळजवळ आहे.

**३९ देवगिरीबिलावल**—जाति संपूर्ण. मध्यम दोन्ही असून बाकीचे सर्व स्वर शुद्ध आहेत. यांत कल्याण व गौड यांची छाया आहे.

**४० नटबिलावल**—जाति षाडव. निषाद वर्ज्य आहे. बाकीचे सर्व स्वर शुद्ध आहेत.

वरचे तीन राग ( ३८ ते ४० ) मालकंसाच्या शाखेंत येतात.

**४१ छायानट**—जाति षाडव. निषाद वर्ज्य. धैवत किंवा ऋभष ग्रह व पंचम न्यास आहे. धैवत प्रधानस्वर आहे. कोमल निषाद घेऊन संपूर्ण जातिही होते.

**४२ हमीरनट**—जाति संपूर्ण. मध्यम दोन्ही असून बाकीचे सर्व स्वर शुद्ध आहेत. हमीरकल्याण व नट यांचें हें मिश्रस्वरूप होय.

**४३ केदारनट**—जाति संपूर्ण. मध्यम दोन्हीं, निषाद कोमल, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. गांधार किंवा मध्यम ग्रह व धैवत न्यास आहे. मध्यम किंवा पंचम प्रधानस्वर आहे.

वरचे तीन राग ( ४१–४३ ) दीपरागाच्या शाखेंत येतात.

**४४ झिंझोटी**–जाति संपूर्ण. निषाद दोन्ही, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. धैवत प्रधानस्वर आहे. षड्ज व गांधार यांवर मूर्च्छना आहे.

**४५ कल्याण**–जाति संपूर्ण. मध्यम दोन्ही, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. गांधार प्रधानस्वर आहे.

**४६ यमनकल्याण**–जाति संपूर्ण. मध्यम तीव्र आहे. आरोहांत कधींकधीं मध्यम व निषाद वर्ज्य करितात. गांधार ग्रह, न्यास व प्रधानस्वर आहे.

**४७ हमीरकल्याण**–जाति षाडव. निषाद वर्ज्य. मध्यम दोन्ही. गांधार ग्रह व धैवत न्यास आहे. यांत नट, केदार व कल्याण यांची छाया येते. कित्येक संपूर्णजाति समजून शुद्धनिषाद घेतात. पण तसें केलें असतां यांत केदाराची छाया स्पष्ट दिसते म्हणून निषाद वर्ज्य करावा.

**४८ पूर्वीकल्याण**–जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत शुद्ध आहेत. कोमलऋषभही येतो. कल्याण व पूर्वी यांचें हें संयुक्तरूप आहे. शाखा श्रीराग.

**४९ भूपालीकल्याण**–जाति ओडव. मध्यम व निषाद वर्ज्य. धैवत ग्रह व ऋषभ न्यास आहे. धैवत प्रधानस्वर आहे.

**५० वाघेश्वरी** ( बागेसरी )–जाति संपूर्ण. गांधार कोमल. निषाद ( विशेषेंकरून कोमल परंतु कधींकधीं आरोहांतच ) दोन्ही येतात. अवरोहांत मध्यमावरून ऋषभाचा लाग आहे. षड्ज व धैवत यांवर मूर्च्छना आहे. धैवतावर निषादाची मेंढ घेतात.

**५१ अडाणा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. कधींकधीं शुद्धनिषादही येतो. गांधार फारसा येत नाहीं. ऋषभापासून मध्यमापर्यंत ग्रह आहे.

**५२ शहाना**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. ऋषभ व धैवत तीव्र. मध्यम ग्रह व प्रधानस्वर आहे.

**५३ ब्रह्मावर्त**–जाति संपूर्ण. ऋषभ कोमल. निषाद दोन्ही. आरोहांत गांधार क्वचित् येतो. हा राग योगाभ्यासी लोक शांतरसांत गातात.

**५४ भूप**–जाति ओडव. मध्यम व निषाद वर्ज्य. भूपकल्याणाशीं याचें बरेंच साम्य आहे, पण कल्याणांतील तीव्रमध्यम या दोहोंमध्येंही येत नाहीं. कित्येक शुद्धमध्यम घेऊन संपूर्णजाति मानितात. मध्यम घेतांना झिंझोटी–जंगलाची छाया येते.

**५५ दरबारीकानडा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. धैवत प्रधानस्वर व न्यास आहे.

**५६ अडाणाकानडा**– जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल आहेत, पण शुद्ध निषादही येतो. मध्यम ग्रह आहे. मेघ व कानडा यांचें संयुक्तस्वरूप यांत आहे.

**५७ नायकीकानडा**–जाति षाडव. धैवत वर्ज्य. सारंग व कानडा या रागांपासून याची उत्पत्ति आहे.

**५८ काफीकानडा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. गांधार प्रधानस्वर आहे. काफी व कानडा यांचें हें संयुक्तस्वरूप होय.

**५९ शहानाकानडा**–जाति संपूर्ण. मल्हार, कानडा व सारंग या रागांपासून याची उत्पत्ति आहे.

**६० सुहाकानडा**–सारंग व मियानीमल्हार यांच्या संयुक्तस्वरांपासून हा राग उत्पन्न झाला आहे.

**६१ रायसाकानडा**–जाति संपूर्ण. गांधार दोन्ही येतात. कानडा व सारंग यांचें हें मिश्रस्वरूप होय. यांत धानी व जंगला यांची छाया येते. हा राग शरदृतूंत पौर्णिमेच्या रात्रीं रासक्रीडेंत गातात.

**६२ बहारकानडा**–जाति संपूर्ण. याचें स्वरूप मल्हाराच्या फार जवळ आहे पण यांत नटरागाची छाया विशेष येते.

**६३ कौशिककानडा**–जाति संपूर्ण. गांधार व निषाद कोमल. मध्यम प्रधान-स्वर आहे. यांत मालकंस व वाघेश्वरी यांची छाया आहे.

**६४ गाराकानडा**–जाति संपूर्ण. हा वाघेश्वरी व झिंझोटी यांचें संयुक्तस्वरूप होय.

**६५ सुघराईकानडा**–जाति संपूर्ण. गांधार दोन्ही, व निषादही दोन्ही येतात. मल्हार व कानडा यांचें हें संयुक्तस्वरूप होय. यांत सोरठीची छायाही मिश्र आहे. यांतील मल्हारास सुरमल्हार किंवा सुरदासजीचा मल्हार म्हणतात.

**६६ सिंदुराकानडा**–जाति संपूर्ण. मध्यम ग्रह व प्रधानस्वर आहे. कानडा, वाघेश्वरी व काफी यांपासून हा राग उत्पन्न झाला आहे.

**६७ चांदनीकेदार**–हा राग केदार व शंकरा या रागांपासून उत्पन्न झाला आहे.

**६८ जलधरकेदार**–केदार व मल्हार यांचें हें मिश्रस्वरूप होय.

**६९ कालिंगडा**–जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. षड्ज ग्रह व मध्यम न्यास आहे. मध्यमावर मूर्च्छना आहे.

**७० परजकालिंगडा**–जाति संपूर्ण. परज व कालिंगडा यांचें हें मिश्रस्वरूप होय.

**७१ जोगीकालिंगडा**–जाति संपूर्ण. कालिंगडा व जोगी यांपासून हा राग उत्पन्न झाला आहे.

**७२ शंकरा**–जाति संपूर्ण. मध्यम दोन्ही. गांधार व निषाद तीव्र असून प्रधानस्वर आहेत. गांधारापासून पंचमापर्यंत ग्रह व न्यास आहे. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. अवरोहांत ऋषभ गांधाराबरोबर नकळत घेण्यांत येतो. तीव्र मध्यम व गांधार यांचा मिलाफ **पूर्वी**ची छाया दाखवितो.

**७३ शंकरानंद**–जाति संपूर्ण. ऋषभ, गांधार व पंचम अंशस्वर आहेत. यांतील स्वरांस कंप फार आहे. हा राग शंकराभरणापासून उत्पन्न झाला आहे.

**७४ जयजयवंती**—जाति संपूर्ण. गांधार दोन्ही. निषाद दोन्ही ( आरोहांत शुद्ध व अवरोहांत कोमल ). मध्यम तीव्र आहे. षड्ज, ऋषभ व गांधार यांच्यामध्यें ग्रह व न्यास आहे. यांत सोरठीची छाया येते. तसेंच कोमल गांधार घेतांना कानडा किंवा काफी यांचा भास होतो.

**७५ बहारहिंदोल**—जाति संपूर्ण आहे, तथापि ऋषभ फारसा येत नाहीं.

**७६ परज**—जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम दोन्ही येतात. षड्ज किंवा गांधार ग्रह व धैवत न्यास आहे. यांत वसंत व पूर्वी यांची छाया येते, तसेंच भैरवाचाही भास होतो. हा राग गाण्यांत भक्तिरसप्रधान आहे.

**७७ विहंग**—जाति संपूर्ण. गांधार ग्रह व मध्यम न्यास असून धैवत प्रधानस्वर आहे. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. याचें विहागाशीं बरेंच साम्य आहे.

**७८ सोहनी**—जाति षाडव. पंचम वर्ज्य. ऋषभ व धैवत कोमल. मध्यम तीव्र, व बाकीचे स्वर शुद्ध आहेत. ऋषभ ग्रह व गांधार प्रधानस्वर आहे. कित्येक ऋषभ व पंचम वर्ज्य करून ओडवजाति मानितात.

**७९ बिहाग**—जाति संपूर्ण. सर्व स्वर शुद्ध आहेत. गांधार किंवा निषाद ग्रह आहे. गांधार प्रधानस्वर आहे. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. पंचम ग्रह केल्यास आरोहांत गांधार वर्ज्य करावा. निषाद व मध्यम यांवर मूर्च्छना आहे. ऋषभ व धैवत वर्ज्य करून ओडवरूप होतो, तसेंच ऋषभ किंवा धैवत वर्ज्य करून षाडवरूपही होतो.

**८० षठ**—जाति संपूर्ण. ऋषभ व धैवत कोमल असून बाकीचे सर्व स्वर शुद्ध आहेत. तीव्र मध्यमही कधींकधीं येतो. गांधार ग्रह व धैवत न्यास आहे. धैवत प्रधानस्वर आहे. अवरोहांत ऋषभ वर्ज्य आहे. हा राग भैरव व रामकली यांच्या जवळ जवळ आहे.

**८१ बिभास**—जाति ओडव. मध्यम व निषाद वर्ज्य. गांधार ग्रह व पंचम न्यास आहे. गांधार प्रधानस्वर आहे. याचें भूपकल्याणाशीं बरेंच साम्य आहे.

वर सहा राग, तीस रागिण्या व ८१ इतर राग यांची माहिती दिली आहे, ते एकंदर ११७ राग गाण्याच्या वेळा, त्यांच्या जाती, व त्यांतील वर्ज्यावर्ज्य व कोमल-तीव्रादि स्वर, यांच्या माहितीचें कोष्टक यापुढें दिलें आहे. त्यांत एखाद्या रागांत जे कोमल ( व मध्यमादि तीव्र ) स्वर येतात त्यांचीं मात्र संक्षिप्त नांवें दिलीं आहेत. त्याशिवाय त्या रागांत जे बाकीचे स्वर असतील ते व ज्या रागापुढें मुळींच स्वर दिले नसतील त्या रागांतील सर्व स्वर, हे सर्व शुद्ध आहेत असें समजावें. जेथें एकच

स्वर कोमल व तीव्र या दोन्ही घरांत दिला असेल तेथें ( त्या रागांत ) तो स्वर कोमल व तीव्र या दोन्ही रूपानें घेण्यांत येतो असें समजावें. दिवसाचे तास २४ व प्रहर आठ,* म्हणजे तीन तासांचा एक प्रहर याप्रमाणें वरील रागांचेही आठ भाग करून ज्या प्रहरांत जे राग गाणें योग्य आहे त्या प्रहरांत त्या रागांचीं नांवें व इतर माहिती दिली आहे.

## पहिला प्रहर.

| | रागांचीं नांवें. | जाति. | वर्ज्य स्वर. | कोमलतीव्रादि स्वर. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कोमल. | तीव्र. |
| १ | भैरव | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| २ | भैरवी | संपूर्ण | ... | सर्व स्वर | ... |
| ३ | मधुमाधवी | ओडव | ग-ध | नी | ... |
| ४ | तोडी | संपूर्ण | ... | री-ग-ध-नी | म |
| ५ | जौनपुरीतोडी | संपूर्ण | ... | सर्व स्वर | ... |
| ६ | लाचारीतोडी | संपूर्ण | ... | सर्व स्वर | ... |
| ७ | गुणकली | ओडव | ग-नी | री-ध | ... |
| ८ | रामकली | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| ९ | असावरी | संपूर्ण | ... | ग-ध-नी | नी |
| १० | देशकार | षाडव | नी | ... | ... |
| ११ | पंचम | षाडव | री | ... | ... |
| १२ | देवगंधार | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| १३ | करनाट | संपूर्ण | ... | ... | ... |
| १४ | ककुभ | संपूर्ण | ... | नी | ... |

*१ पहिला प्रहर-सकाळचे सहा वाजल्यापासून नऊ वाजेपर्यंत.
२ दुसरा प्रहर-सकाळचे नऊ वाजल्यापासून दुपारचे बारा वाजेपर्यंत.
३ तिसरा प्रहर-दुपारचे बारा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत.
४ चवथा प्रहर-दुपारचे तीन वाजल्यापासून सायंकाळचे सहा वाजेपर्यंत.
५ पांचवा प्रहर-संध्याकाळचे सहा वाजल्यापासून रात्रीचे नऊ वाजेपर्यंत (रात्रीचा पहिला प्रहर).
६ सहावा प्रहर-रात्रीचे नऊ वाजल्यापासून बारा पर्यंत ( रात्रीचा दुसरा प्रहर ).
७ सातवा प्रहर-रात्रीचे बारा वाजल्यापासून पहांटेचे तीन वाजेपर्यंत (रात्रीचा तिसरा प्रहर).
८ आठवा प्रहर-पहांटेचे तीन वाजल्यापासून सकाळचे सहा वाजेपर्यंत (रात्रीचा चवथा प्रहर).

## दुसरा प्रहर.

| | रागांचीं नांवें. | जाति. | वर्ज्य स्वर. | कोमल स्वर. | तीव्र स्वर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | देशाख्य | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| २ | देशी | संपूर्ण | ... | ... | ... |

## तिसरा प्रहर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वसंत | संपूर्ण | ... | री | म |
| २ | सिंधवी | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ३ | बंगाली | ओडव | री-ध | ... | ... |
| ४ | खंबावती | संपूर्ण | ... | नी | नी |
| ५ | नट | षाडव | नी | ... | ... |
| ६ | कामोदी | ओडव | ग-नी | ... | म |
| ७ | धनाश्री | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ८ | मालश्री | षाडव | री | ... | ... |
| ९ | गुर्जरी | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| १० | पलाशिका | संपूर्ण | ... | ग-ध | ... |
| ११ | काफी | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १२ | तिलंग | संपूर्ण | ... | ... | ... |
| १३ | जंगला | संपूर्ण | ... | ... | ... |
| १४ | मांढ | संपूर्ण | ... | ... | ... |
| १५ | पिलु | संपूर्ण | ... | सर्व स्वर | सर्व स्वर |
| १६ | हिजाज | संपूर्ण | ... | ग-नी | ग-नी |
| १७ | मधुर | संपूर्ण | ... | ... | ... |
| १८ | देशीजिल्हा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १९ | सारंग | ओडव | ग-नी | ... | ... |
| २० | गौडसारंग | षाडव | नी | म | म |
| २१ | वृंदावनीसारंग | ओडव | ग-ध | नी | ... |
| २२ | नूरसारंग | षाडव | ध | ग-नी | ... |
| २३ | सामतसारंग | ओडव | ग-ध | ... | ... |
| २४ | देवगिरीसारंग | संपूर्ण | ... | नी | नी |
| २५ | मेघसारंग | षाडव | ध | ग-नी | नी |
| २६ | लंकदहन | षाडव | ध | ग-नी | नी |

## चवथा प्रहर.

| | रागांचीं नांवें. | जाति. | वर्ज्य स्वर. | कोमल स्वर. | तीव्र स्वर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | गौरी | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| २ | ललितगौरी | षाडव | प | ... | ... |
| ३ | श्री | संपूर्ण | ... | री-ध | म |
| ४ | जेतश्री | संपूर्ण | ... | री-ध | म |
| ५ | त्रिवेणी | षाडव | म | ... | ... |
| ६ | पूर्वी | संपूर्ण | ... | री-ध | म |
| ७ | रैनकीपूर्वी | षाडव | प | री-ध | ... |
| ८ | रायसा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ९ | सिंदुरा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १० | मारू | संपूर्ण | ... | री-ध | म |
| ११ | बरवा | संपूर्ण | ... | ग-नी | ग-नी |
| १२ | धानी | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १३ | सुरपरदा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १४ | मारवा | षाडव | प | री | म |
| १५ | बिलावल | संपूर्ण | ... | नी | नी |
| १६ | शुक्लबिलावल | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १७ | देवगिरीबिलावल | संपूर्ण | ... | म | म |
| १८ | नटबिलावल | षाडव | नी | ... | ... |
| १९ | दीपकी | संपूर्ण | ... | ग-नी | म |

## पांचवा प्रहर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | दीप | संपूर्ण | ... | री-ग-नी | म |
| २ | वैराटी | संपूर्ण | ... | नी | ... |
| ३ | भूपाली | ओडव | म-नी | ... | ... |
| ४ | कल्याण | संपूर्ण | ... | म | म |
| ५ | यमनकल्याण | संपूर्ण | ... | ... | म |
| ६ | भूपालीकल्याण | ओडव | म-नी | ... | ... |
| ७ | हमीरकल्याण | षाडव | नी | म | म |
| ८ | पूर्वीकल्याण | संपूर्ण | ... | ... | ... |
| ९ | छायानट | षाडव | नी | ... | ... |
| १० | केदारनट | संपूर्ण | ... | म | म |
| ११ | हमीरनट | संपूर्ण | ... | म | म |
| १२ | झिंझोटी | संपूर्ण | ... | नी | नी |

## सहावा प्रहर.

| | रागांचीं नांवें. | जाति. | वर्ज्य स्वर. | कोमल स्वर. | तीव्र स्वर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाघेश्वरी | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| २ | सोरठी | संपूर्ण | ... | नी | नी |
| ३ | शहाना | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ४ | अडाणा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ५ | ब्रह्मावर्त | संपूर्ण | ... | री-नी | नी |
| ६ | भूप | ओडव | म-नी | ... | ... |
| ७ | कानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ८ | दरबारीकानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| ९ | अडाणाकानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १० | नायकीकानडा | षाडव | ध | ... | ... |
| ११ | काफीकानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १२ | शहानाकानडा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १३ | सुहाकानडा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १४ | बहारकानडा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १५ | रायसाकानडा | संपूर्ण | ... | ग | ग |
| १६ | कौशिककानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| १७ | गाराकानडा | संपूर्ण | ... | ... | ... |
| १८ | सुघराईकानडा | संपूर्ण | ... | ग-नी | ग-नी |
| १९ | सिंधुराकानडा | संपूर्ण | ... | ... | ... |
| २० | पटमंजरी | संपूर्ण | ... | ग-नी | ... |
| २१ | केदार | संपूर्ण | ... | री-ध-म | म |
| २२ | चांदनीकेदार | संपूर्ण | ... | री-ध | म |
| २३ | जलधरकेदार | संपूर्ण | ... | री-ध | म |

## सातवा प्रहर.

| | रागांचीं नांवें. | जाति. | वर्ज्य स्वर. | कोमल स्वर. | तीव्र स्वर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेघ | संपूर्ण | ... | ग | ... |
| २ | मल्हार | संपूर्ण | ... | ... | ... |
| ३ | गौडमल्हार | षाडव | नी | ... | ... |
| ४ | मियानीमल्हार | संपूर्ण | ... | ग-नी | नी |
| ५ | टंक | संपूर्ण | ... | री-ध | म |
| ६ | शंकरा | संपूर्ण | ... | म | म |
| ७ | शंकरानंद | संपूर्ण | ... | ... | ... |
| ८ | विहंग | संपूर्ण | ... | ... | ... |
| ९ | विहाग | संपूर्ण | ... | ... | ... |
| १० | जयजयवंती | संपूर्ण | ... | ग-नी | ग-नी |
| ११ | परज | संपूर्ण | ... | री-ध-म | म |
| १२ | कालिंगडा | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| १३ | जोगीकालिंगडा | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| १४ | परजकालिंगडा | संपूर्ण | ... | री-ध-म | म |
| १५ | हिंदोल | ओडव | री-प | ... | म |
| १६ | वहारहिंदोल | संपूर्ण | ... | ... | ... |
| १७ | मालकंस | ओडव | री-प | सर्व स्वर | ... |

## आठवा प्रहर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ललत | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| २ | सोहनी | षाडव | प | री-ध | म |
| ३ | षठ | संपूर्ण | ... | री-ध | ... |
| ४ | बिभास | ओडव | म-नी | ... | ... |

रागरागिण्यांचीं नांवें कोणत्या धोरणावर ठेवण्यांत आलीं आहेत याचा खुलासा सांपडत नाहीं. तरी कित्येक रागांचीं नांवें देशांच्या व लोकांच्या नांवांवरून पडलीं आहेत असें दिसतें. मग ते राग त्या देशांत अथवा त्या लोकांत प्रथम उत्पन्न झाले किंवा तेथें त्यांचा विशेष प्रसार झाला हें निश्चयानें सांगता येत नाहीं. अशा कांहीं रागांचीं नांवें येणेंप्रमाणें होत:—

सिंधवी = सिंधप्रांतावरून.
बंगाली = बंगाल.
मारू = मारवाड.
भूपाली = भोपाल.
तिलंग = तैलंगण.
ललित = ललितपूर.
सोरठ = सौराष्ट्र
गंधार = कंदाहार.
कानडा = कर्नाटक.
जौनपुरी= जौनपूर.
मालवा = माळवा.
पूर्वी = पूर्वेकडील प्रांत.
खमाच = हें ढाका शहराचें दुसरें नांव आहे.
श्याम = सयाम देश.
मुलतानी= मुलतान.
वृंदावनी = वृंदावन.
गौड = गौडदेश.
अहिरी = अहीर लोक.
गुर्जरी = गुर्जर लोक.
नट = ( सोंगें घेणारे ) नट.

# प्रकरण चवथें.

## साहित्यविचार.

नायक, नायिका, रस व भाव वगैरे साहित्याचा रागांशीं तंतुपटन्यायानें निकट संबंध असल्यामुळें त्या विषयींची संक्षिप्त हकिकत पुढें दिली आहे.

### नायक.

काव्यामध्यें ज्या मुख्य पुरुषाचें वर्णन केलेलें असतें त्या पुरुषास नायक म्हणतात. त्यांच्या तीन जाती आहेत.

१ **दिव्य**—देवतादिक. जसें, पार्वतीपरिणय नाटकांत शंकर.

२ **अदिव्य**—मनुष्यादिक. जसें, शाकुंतल नाटकांत दुष्यंत.

३ **दिव्यादिव्य**—देव असून मनुष्यावतार घेतलेले. जसें, उत्तररामचरितांत रामचंद्र.

वर्तनावरून नायकांचे चार भेद झाले आहेत.

१ **अनुकूल**—एकाच स्त्रीचेठायीं आसक्त असणारा.

२ **दक्ष**—सर्व स्त्रियांवर सारखी प्रीति ठेवणारा.

३ **शठ**—एका स्त्रीवर प्रीति दाखवून गुप्त रीतीनें अन्य स्त्रीवर प्रेम करणारा.

४ **धृष्ट**—स्त्रीनें धिःकार केला तरी लज्जा न बाळगणारा, आपले दोष खोटें बोलून लपविणारा व अपराधी असूनही निःशंक असणारा.

नायकांच्या स्वभावावरून प्रत्येकाचे आणखी चार प्रकार झाले आहेत.

१ **धीरोदात्त**—आत्मश्लाघा न करणारा, क्षमाशील, गर्व, हर्ष व शोकरहित, व गंभीर. जसें, रामचंद्र व धर्मराज वगैरे.

२ **धीरोद्धत**—आत्मश्लाघा करणारा, धीट, बलिष्ट, गर्विष्ट व चंचल. जसें, भीमसेन.

३ **धीरललित**—चतुर, विलासी, रसिक, गुणी, विनोदी व संगीताभिलाषी. जसें, वत्सराजा.

४ **धीरप्रशांत**—साधारणपणें सभ्य गृहस्थाच्या अंगीं जे गुण असतात त्या गुणांनीं युक्त. जसें, मालतीमाधव नाटकांतील माधव.

**अनुराग**—नायक व नायिका यांच्यामध्यें जें मूळ परस्पर प्रेम उत्पन्न होतें त्याला अनुराग म्हणतात. याचे **दृष्टानुराग** व **श्रुतानुराग** असे दोन प्रकार आहेत.

**दर्शन**—याचे तीन प्रकार आहेत. स्वप्नदर्शन, चित्रदर्शन, व साक्षात्दर्शन.

### नायिका.

काव्यामध्यें ज्या मुख्य स्त्रीचें वर्णन केलेलें असतें तिला नायिका म्हणतात. नायिकेच्या तीन जाती आहेत. १ **स्वीया** (स्वस्त्री), २ **परकीया** (परस्त्री), ३ **साधारणी**

(वेश्या). स्वीया नायिकेच्या नायकास **पति**, परकीयेच्यास **उपपति** व साधारणीच्यास **वैशिक** म्हणतात.

१ **स्वीये**चे तीन भेद आहेत. मुग्धा, मध्या व प्रगल्भा.

( १ ) **मुग्धा**–चार प्रकारची आहे.

१ नवऊढवधु–हिचे आणखी दोन पोटभेद आहेत.

( १ ) नवोढा.

( २ ) विश्रब्धनवोढा.

२ नवयौवना–हिचेही दोन पोटभेद आहेत.

( १ ) अज्ञातयौवना.

( २ ) ज्ञातयौवना.

३ नवलअनंगा.

४ लज्जाप्रिया.

( २ ) **मध्या**–चार प्रकारची आहे.

१ आरुढयौवना.

२ प्रगल्भवचना ( वचनप्रगल्भा ).

३ प्रादुर्भूतमनोभवा ( मनोभामिनी ).

४ सुरतविचित्रा ( रतिविचित्रा ).

( ३ ) **प्रगल्भा**–तीन प्रकारची आहे.

१ धीरा.

२ अधीरा.

३ धीराधीरा.

२ **परकीये**चे दोन भेद आहेत.

( १ ) परोढा ( परस्त्री ).

( २ ) कन्यका (कुमारी ).

३ **साधारणी** अथवा सामान्या ही एकच प्रकारची आहे.

या मुख्य तीन नायिकांचे आणखी तीन तीन प्रकार आहेत.

१ अन्यसंभोगदुःखिता.

२ वक्रोक्तिगर्विता–हिचे तीन भेद आहेत.

( १ ) प्रेमगर्विता.

( २ ) रूपगर्विता.

( ३ ) कामगर्विता.

३ मानिनी अथवा मानवती. हिचेंही तीन भेद आहेत.

( १ ) लघुमानवती.
( २ ) मध्यमानवती.
( ३ ) गुरुमानवती ( दीर्घमानवती ).

**स्वीया** नायिकेचे आणखी आठ शृंगारिक भेद केले आहेत. त्यांना **अष्टनायिका** असें म्हणतात. ते असे—

१ स्वाधीनपतिका.
२ खंडिता.
३ कलहांतरिता.
४ विप्रलब्धा.
५ वासकसज्जिता.
६ प्रोषितभर्तृका.
७ विरहोत्कंठिता.
८ अभिसारिका. ही तीन प्रकारची आहे.
( १ ) दिवाभिसारिका.
( २ ) कृष्णाभिसारिका.
( ३ ) शुक्लाभिसारिका.

या शिवाय नायिकांचे आणखी पुष्कळ ( ३६० ) भेद आहेत.

## नायिकालंकार.

नायिकेला तारुण्यांत २८ प्रकारच्या स्वाभाविक अवस्था प्राप्त होतात त्यांस **अलंकार** म्हणतात (या पैकीं पहिले १० नायकालाही लागू आहेत). ते येणें प्रमाणें:—

१ हाव ( अविकृत चित्ताचे ठायीं प्रथमच उत्पन्न झालेला विकार किंवा मनाचें चांचल्य. याचे १६ प्रकार आहेत ), २ भाव ( भ्रूनेत्रादिकांच्या योगें हावाचें प्रगट होणें, ३ हेला (भावाचा पूर्ण विकास), ४ शोभा, ५ कांति, ६ दीप्ति, ७ माधुर्य, ८ प्रगल्भता, ९ औदार्य, १० धैर्य, ११ लीला, १२ विलास, १३ विच्छति ( " कांती " वर्धक शरीरावस्था ), १४ बिब्बोक ( गर्वानें केलेला अनादर ), १५ किलकिंचित ( हर्षसंभ्रम ), १६ मोट्टायित ( प्रियवस्तुस्मरणजनित विकार , १७ कुट्टमित (आनंद-दायक कृतीचा बाह्यात्कारी प्रतिकार ), १८ विभ्रम, १९ ललित, २० मद, २१ विकृत, २२ तपन, २३ मुग्धता, २४ विक्षेप, २५ कुतूहल, २६ हसित, २७ चकित, २८ केलि.

मागें सांगितलेल्या अष्टनायिकांपैकीं **प्रोषितपतिका** अथवा **विरहिणी**चे ठायीं प्राप्त होणाऱ्या दहा अवस्था:—

१ स्मृति, २ अभिलाष, ३ गुणकथन, ४ चिंता, ५ जडता, ६ उद्वेग, ७ उन्माद, ८ प्रलाप, ९ व्याधी, १० मूर्च्छा.

## भाव.

"रसा"ला साधनीभूत जे मनोविकार त्यांस भाव म्हणतात. याचे **शारीरिक** व **मानसिक** असे दोन प्रकार आहेत. सात्विकभाव हे शारीरिक, आणि स्थायीभाव व व्यभिचारीभाव हे मानासिक होत. एक मुख्य मनोविकार, त्याचीं कारणें, त्याचीं कार्यें व त्यास पुष्टी देणारे इतर मनोविकार ही रस उत्पन्न होण्याची सामुग्री होय. मुख्य मनोविकार हा **स्थायीभाव**, त्याचें कारण हा **विभाव**, त्याचें कार्य हा **अनुभाव**, व त्यास पुष्टी देणारा दुसरा मनोविकार हा **व्यभिचारी** (अथवा **संचारी**) भाव होय. उदाहरणार्थ, "कौरवांनीं अभिमन्युचा वध केला, हें ऐकून अर्जुनास क्रोध आला व त्यायोगें त्याचे नेत्र आरक्त झाले व बाहु स्फुरण पावते झाले, इतक्यांत अभिमन्यु पडला असतां जयद्रथानें त्यास लाथ मारिली हें वर्तमान त्यास कळलें, त्यायोगें त्याचा क्रोधाग्नि फारच भडकला." येथें मुख्य मनोविकार जो क्रोध हा स्थायीभाव, त्याचें कारण जो अभिमन्युचा वध हा विभाव, त्याचें कार्य जें अर्जुनाचे नेत्र आरक्त होणें व त्याचें युद्धास तयार होणें हा अनुभाव, आणि त्यास पुष्टी देणारा दुसरा मनोविकार म्हणजे जयद्रथाच्या नीच कृतीचें स्मरण हा संचारीभाव होय. येथें **रौद्ररस** उत्पन्न झाला आहे.

**स्थायीभाव**—जो प्रधान मनोविकार विभाव, अनुभाव व संचारी भाव यांच्या योगानें परिपुष्ट झाला असतां रसरूप होतो त्यास स्थायीभाव म्हणतात. स्थायीभाव ही अंकुरावस्था व रस ही पल्लवावस्था होय. याचे नऊ प्रकार आहेत व त्या प्रत्येकापासून एक एक रस उत्पन्न होतो. ते असेः—

| स्थायीभाव. | रस. |
|---|---|
| रति | शृंगार |
| हास | हास्य |
| शोक | करुण |
| क्रोध | रौद्र |
| उत्साह | वीर |
| भय | भयानक |
| जुगुप्सा | बिभत्स |
| विस्मय | अद्भुत |
| शम | शांत |

**विभाव**–ज्या योगानें स्थायीभाव अंकुरावस्थेप्रत पावतो व जो रसाचें कारण होय त्याला विभाव म्हणतात. याचे दोन प्रकार आहेत. आलंबन व उद्दीपन.

१ आलंबनविभाव–मूळ वस्तु अथवा बीज, म्हणजे ज्याला अवलंबून रस उत्पन्न होतो तो. जसें, शृंगाररसांत नायक अथवा नायिका ( हे आलंबन विभाव होत ).

२ उद्दीपन–बीजाला सिंचनरूपानें पुष्टी करणारा. म्हणजे ज्याच्या योगानें रस वृद्धिंगत होतो तो. जसें, शृगाररसांत एकांतवास, चांदणें, कोकिलरव वगैरे उद्दीपन होत. याचे चार प्रकार आहेत. गुण, चेष्टा, अलंकार व तटस्थ.

**अनुभाव**–मनांतील भाव ज्या चिन्हांनीं प्रगट होतो अथवा मनोविकाराच्या सूचक अशा ज्या शरीरचेष्टा, अथवा रसाचें जो कार्य होय त्यास अनुभाव म्हणतात.

**व्यभिचारीभाव**–स्थायीभावास अथवा मुख्य मनोविकारास व रसास परिपुष्ट करणारे जे इतर सहायकारी मनोविकार त्यांस व्यभिचारी अथवा संचारीभाव म्हणतात. हे स्थायीभावाप्रमाणें पहिल्यापासून असत नाहींत. तरी एका रसाचे जे स्थायीभाव ते दुसऱ्या रसांत सहायकारी म्हणजे व्यभिचारीभाव होतात. जसें, शृंगारांत हास्य व वीरांत क्रोध. यांचेही विभाव व अनुभाव असतात. व्यभिचारीभाव ३३ आहेत. ते असेः—

१ स्मृति, २ आलस्य, ३ शंका, ४ चिंता, ५ श्रम, ६ ग्लानी, ७ निद्रा, ८ मोह, ९ मद, १० निर्वेद ( निवृत्ति ), ११ असूया, १२ दैन्य, १३ जडता, १४ धृति, १५ व्रीडा ( लज्जा ), १६ गर्व, १७ विषाद, १८ औत्सुक्य, १९ आवेग (भांबावणें), २० हर्ष, २१ चपलता, २२ अपस्मार, २३ सुप्ति, २४ विबोध, २५ वितर्क, २६ अमर्ष ( अहंकारशमनेच्छा ), २७ अवहित्था ( विकारगोपन ), २८ मति, २९ उग्रता, ३० उन्माद, ३१ व्याधि, ३२ त्रास, ३३ मरण.

**सात्विकभाव**–सत्वगुणापासून शरीराचे ठायीं स्थायीभावाचा जो अनुभाव उत्पन्न होतो त्यास सात्विकभाव म्हणतात. याचे आठ प्रकार आहेत. ते असे—

१ स्तंभ ( गतिनिरोध ), २ स्वेद, ३ रोमांच, ४ वैस्वर्य ( स्वर बदलणें ), ५ वेपथु ( कंप ),६ वैवर्ण्य ( वर्ण पालटणें ), ७ अश्रुपात, ८ प्रलय ( चेष्टा निरोध ).

---

१ शृंगाररसांतील आलंबनविभाव जो नायक अथवा नायिका, त्यांचे रूप, गुण, यौवन हे "**गुण**," हावभावादि चेष्टा ह्या "**चेष्टा**," वस्त्रभूषणें वगैरे हे "**अलंकार**," व चंद्र, वायु, उद्यान, व आकाश हे "**तटस्थ**;" हे उद्दीपनाचे चार प्रकार होत.

२ जसें, **स्मृति**. यांत स्मरण होणें हा **विभाव** व तें करण्यासाठीं भिवयांचा संकोच व दृष्टीचें स्थैर्य इत्यादि हे **अनुभाव** होत.

## रस.

मनाच्या वृत्तींचें निरनिराळ्या प्रसंगीं भिन्नभिन्न रूपानें व्यक्त होणें, किंवा मनाचें अथवा चित्ताचें आनंदित किंवा द्रवित होणें याला रस म्हणतात. विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव यांच्या योगानें परिपुष्ट झालेला जो स्थायीभाव तो रस होय. रस हा तर्क्य, वाच्य, लक्ष्य किंवा नित्य नसून मात्र अर्थसंकेताच्या ज्ञानाचा अनुभव आहे. मुख्य रस नऊ आहेत. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बिभत्स, अद्भुत, व शांत.

